# प्रकरण दुसरे : आदिवासी जीवन आणि वाङ्मयीन प्रेरणा

## ।। आदिवासी जीवन आणि वाङ्मयीन प्रेरणा ।।

पहिल्या प्रकरणामध्ये आपण कादंबरी म्हणजे काय ? कादंबरीची वैशिष्टये, कादंबरी वाङ्मयप्रकारातील घटक व कादंबरी या वाङ्मयप्रकाराची वाटचाल यांचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण आदिवासी जीवनाविषयीच्या अभ्यासाची ओढ लोकांना कशी लागली, आदिवासी साहित्य चळवळीस प्रारंभ व तिचा विकास कसा झाला, आदिवासींचे मराठी साहित्य प्रकारातील चित्रण, तसेच मराठी कादंबरी या वाङ्मयप्रकाराद्वारे आदिवासींचे करण्यात आलेले चित्रण याचे विवेचन आदिवासी जीवनावरील काही कादंब-यांच्या आधारे करणार आहोत. तत्पूर्वी आदिवासी जीवनाविषयीचा थोडक्यात परामर्श घेवू.

आदिवासीबद्दल सर्वसाधारण लोकांची कल्पना म्हणजे जंगल द-याखो-यात राहणारे रानटी, जंगली लोक. आदिवासी या शब्दास इंग्रजीमध्ये ' ॲबॉरिजिनीझ ' (आदिवासी), ' प्रिमिटिव्ह ' (अप्रगत, आदिम), सॅव्हेज (मागासलेले) असे अनेक शब्द आहेत. आदिवासींना आदिवासी न म्हणता काही लोक वनवासी म्हणतात. आदिवासी हे नागर संस्कृतीपासून दूर सुरक्षित अशा डोंगराळ भागात, जंगलात, द-याखो-यात, पाण्याने वेढलेल्या बेटांवर राहतात. आदिवासींमध्ये अनेक जमाती आहेत. उदा. वारली, गोंड, भिल्ल, कातकरी, कोरकू, इ. सर्वसाधारणपणे एकाच आदिवासी जमातीचे वास्तव्य समान भूप्रदेशावर असते. आदिवासींच्या समूहाची (पाड्याची) लोकसंख्या शे-दोनशेच्या दरम्यान आढळते. प्रगत समूहाशी त्यांचा संपर्क कमीच येतो.

आदिवासी लोक आपण सर्वजण एकाच पूर्वजाचे वंशज आहोत असे मानतात. त्यामुळे एका जमातीचे सर्व सदस्य एकमेकांचे रक्तसंबंधीत आहेत अशी त्यांची दृढभावना आहे. त्यामुळेच त्यांच्यात एकमेकाविषयी प्रेम, आपुलकी व आपलेपणा दिसतो. आदिवासींमध्ये कुटुंब हा आर्थिक क्रिया करणारा घटक असतो. कुटुंबातील सर्वच लहान थोर स्त्री-पुरूष मिळून आर्थिक उत्पादन करून आपला उदरनिर्वाह करीत असतात.

डोंगरद-यात, रानात राहणारे आदिवासी निसर्गामध्ये मिळणा-या वस्तु व पदार्थांपासून आपल्या मुलभूत गरजा भागवितात. निसर्गामध्ये आढळणारी मोहफुले, काजू, मासे, प्राणी इ. जंगलातील वस्तु खाऊन ते आपले पोट भरतात. कित्येकवेळा तीन-तीन, चार-चार दिवस त्यांना पोटाला काहीही मिळत नाही. उपाशीही राहावे लागते. पोटच भरू न शकणा-या आदिवासींना अंगभर कपडा कोठून मिळणार ? निसर्गामध्ये उपलब्ध असलेल्या वस्तु उदा. लाकूड, वेळू, गवत, बांबू

इत्यादींपासून ते निवारा करतात व ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात.

आदिवासी टेकडयावर, दुर्गम अशा भागांमध्ये निकृष्ट दर्जाची शेती करताना दिसतात. सूत कातणे, दो-या वळणे, टोपल्या व दुरडया तयार करणे, मोहफुलांपासून दारू तयार करणे, पशुपालन यासारखे दुय्यम व्यवसाय करतात. आदिवासींच्या कला त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. आनंद व उदरनिर्वाहाचे साधन म्हणून ते कला जोपसतात.

आदिवासींच्या बहुतेक सर्वच जमातींमध्ये युवागृहे आढळतात. युवागृहांना आदिमांनी वेगवेगळी नावे दिलेली दिसतात. उदा. गोंड-गोटुल, मुंडा व हो - गिटीओरा, कोरकू-युवागृह इत्यादी जमातीतील युवकयुवतींना एकत्र राहण्याची येथे सोय केली जाते. जमातीतील प्रत्येक स्त्री-पुरूषास युवागृहाचे सदस्यत्व अनिवार्य असते. आदिवासींमध्ये सहपलायन, लांबजाना (घरजावई), घरात घुसणे इत्यादी विवाहपध्दती आहेत. त्यांच्या जमातीत मुलाने मुलीला हुंडा देण्याची पध्दत आहे. त्यामुळे नागर संस्कृतीप्रमाणे आदिवासींना मुलगी हे ओझे वाटत नाही. आदिवासींमध्ये स्त्रीस घटस्फोट व पुनर्विवाहास परवानगी असते. परंतु स्त्रिला वधुमूल्यासह (पहिल्या पतीने दिलेला हुंडा) लग्नाचा खर्च द्यावा लागतो. पुरूषांना असे बंधन व अट नसते. त्यामुळे पुरूष पहिल्या बायकोशी फारकत घेवून दुसरी बायको करू शकतो. आदिवासी जमातीत बालविवाह क्वचितच होतात. मात्र विधवाविवाह सर्वमान्य आहे.

आदिवासींमध्ये होळी, दिवाळी, पोळा, रांडभवई यासारखे सण साजरे करतात. बहुतेक आदिवासी जमातीमध्ये कोणताही सण घराघरांमधून स्वतंत्रपणे साजरा होत नाही. सणांचे स्वरूप सार्वजनिक असते. म्हणूनच ते उत्सवरूपी असते. बहुतेक आदिवासी जमातीत संध्याकाळी युवक व युवती एका ठिकाणी जमून एकत्र नृत्य करतात. त्यांच्यात संगीतनृत्याला फार महत्व असते. सर्व लोक त्यात उत्साहाने भाग घेतात. नृत्य करताना ढोल, बासरी, टाळ, टिप-या वाजवतात. ही वाद्ये निसर्गामध्ये मिळणा-या वस्तुंपासून बनविलेली असतात.

आदिवासी, डोंगर, द-या-खो-यात, रानात राहतात. त्यामुळे निसर्गाशी त्यांचे अतूट नाते आहे. ते निसर्गोपासक आहेत. निसर्गात आढळणा-या वृक्ष, प्राणी व अमानवी गोष्टींना ते देव मानतात. त्यांच्या देवदेवतांची नावेसुध्दा वाघदेव, नारायणदेव, गोमाई, हिमाई यासारखी निसर्गाशी नाते सांगणारी आहेत. हे लोक श्रध्दाळू असून रूढी, परंपरांची जपणूक करताना दिसतात. त्यांचा जादूटोणा, मंत्रतंत्र, चेटूक यावर विश्वास दिसतो.

आदिवासी लोकांचा आर्थिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मूलभूत गरजा भागविणे हा असतो. धनसंचय करण्याचा लोभ त्यांना नसतो. सण साजरा करण्यास तर कधी आलेल्या संकटातून बाहेर पडण्यास पुरेसे आर्थिक बळ नसल्याने व सावकार, दलाल यांचेकडून लुबाडले, फसविले गेल्याने हे लोक नेहमीच कर्जबाजारी राहतात.

आदिवासी स्त्रियांना दागिन्यांची विशेष आवड दिसते. स्त्रिया गळयात पोवळयांच्या, कवडयांच्या तसेच रंगीत काचेच्या मण्यांच्या माळा, हातात चांदीचे गोठ, पायात काशाची कडी, जोडवी व बोटात तांब्याची किंवा पितळेची अंगठी, कानात पितळी बाळया घालतात. फुलांच्या सुंदर माळा गुंफून डोक्यावर माळतात. रानफुलांचे तुरेही खोवतात. सणासुदीच्या दिवशी पुरूषही पागोटयात रानफुलांचा तुरा खोवतात.

नागर संस्कृतीपेक्षा आदिवासींच्या गरजा मर्यादित असतात. पोटापुरते पाहण्याची सवय असल्याने त्यांचे अंगी अकारण संग्रही प्रवृत्ती नसते. त्यामुळे ते स्वार्थी नसतात. अज्ञानामुळे, पैशाचा व्यवहार समजत नसल्याने व्यवहारात नफा तोटा पाहण्याची प्रवृत्ती नसते. ते सर्वस्वी निसर्गावर व समूहावर अवलंबून असल्याने दैववादी, स्वच्छंदी असतात. ते अबोल असतात. निसर्गाच्या सानिध्यात राहण्यास, रमण्यात त्यांना आनंद वाटतो.

आदिवासींची न्यायव्यवस्था त्यांच्या आर्थिक, धार्मिक व कौटुंबिक जीवनाशी निगडीत आहे. जातपंचायतीचा निर्णय हा अंतीम निर्णय मानला जातो. त्यामुळे नागर संस्कृतीपेक्षा यांच्यात सामाजिक संघटना भक्कम असल्याचे दिसते.

नागर जीवनाशी संबंध आल्यामुळे तसेच शासनाने आदिवासींना सुधारण्यासाठी पुरस्कृत केलेल्या योजनांमुळे आदिवासींचे जीवनमान सुधारत आहे. त्यांच्यात शैक्षणिक, आर्थिक सुधारणाही होत आहेत.

**आदिवासी जीवनविषयीच्या अभ्यासाची ओढ ...**

रानावनात, डोंगरदऱ्यात, नागर संस्कृतीपासून दूर राहणा-या आदिवासींच्या अभ्यासाची ओढ लोकांना कशी लागली त्याचा आता परामर्श घेवू.

डोंगरद-यात, दुर्गम अशा भागांमध्ये राहणारा, मागासलेला, नागर संस्कृतीपासून दूर राहणारा, अंधश्रध्दाळू असे आदिवासींविषयीचे सर्वसाधारण चित्र नागर समाजात आतापर्यंत होते. त्यांच्याविषयी उपेक्षेची भावना होती. त्यामुळे त्यांच्याशी आपला संबंध नाही या भावनेने या जमातीकडे आतापर्यंत दुर्लक्ष झाले होते. नागर संस्कृतीपेक्षा असणारे त्यांचे वेगळेपण त्यांच्याविषयी

संशोधकांनी संकलित केलेल्या माहितीवरून समजते.

प्राचीन ग्रीक इतिहासकारांनी आदिवासी जमातीविषयीचे काही उल्लेख केले आहेत. ग्रीक इतिहासकार हिरोडिटस याने प्राचीन काळी (इ.स.पू.700 ते 600) ग्रीकमधील प्रवाशांनी लिहून ठेवलेल्या माहितीवरून श्रध्दा व विश्वास यातील विविधतेच्या नोंदीमध्ये आदिवासीविषयी उल्लेख केलेला आहे. तसेच मानव व त्यांचे जीवन हा एक चिंतनाचा विषय आहे. या विचारांच्या लिखाणाविषयी प्लेटो, ॲरिस्टॉटल इ. तत्ववेत्ते प्रेरीत झाले होते. या लिखाणात आदिवासी जमातींविषयीचे उल्लेख आहेत. भारतीय स्मृतिग्रंथातही अशा जमातींचा उल्लेख आढळतो. रामायण, महाभारतासारख्या ग्रंथातही एकलव्य, किरात, शबरी या आदिम जमातीतील व्यक्तींचे उल्लेख आहेत, अशी माहिती मिळते.[1] बाराव्या शतकात मध्ययुगातही लीळाचरित्रात विंध्य पर्वतातील गोंडवनातील ' विंझी गोंडवाडा अवस्थान ' असा या आदिंच्या लीळेचा उल्लेख आहे.[2] अशा उल्लेखांव्यतिरिक्त आदिवासी जमातींच्या जीवनपध्दती संबंधी अधिक माहिती मिळविलेली आढळत नाही. त्यानंतर अनेक शतके या जमातींविषयी अभ्यास झाला नाही. सतराव्या व अठराव्या शतकातील फ्रान्समधील मॉंटेक्यू, इंग्लंडमधील डेव्हीड ह्यूम व ॲडम स्मिथ या विचारवंतांनी ज्ञात समाजाच्या तुलनात्मक अभ्यासाच्या आधाराने मानवी समाजाची प्रगती कोणत्या टप्प्यातून झाली ते सांगून त्यावेळच्या सामाजिक संस्थांचे स्वरूप विशद करण्यास आदिवासी समाजांचे उल्लेख केले आहेत. त्याचे फक्त दाखले (उदाहरणे) दिले आहेत. याचा अर्थ त्यांना या जमातीच्या अभ्यासाचे महत्व समजले असा नाही. मात्र या शतकापासून जिज्ञासा व कुतूहलापोटी तर मानवतावादी भावनेने आदिवासी समाजाविषयी साहित्य निर्माण होऊ लागले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रेंच लेखक व थोर विचारवंत रूसो, लॉक या विचारवंतांनी आपल्या ग्रंथात वन्य लोकांचे जीवनाविषयी विवेचन केले. हे विवेचन (अभ्यास) त्यांनी राज्यशास्त्रीय निमित्ताने केले अशी माहिती मिळते.[3]

थोडक्यात आतापर्यंतचा आदिवासींचा अभ्यास (कोणत्या तरी) निमित्ताने केला गेला. पश्चिम युरोपातील धाडसी प्रवाशी वास्को डी-गामा (हिंदुस्थान), कोलंबस (अमेरिका) इत्यादींनी त्यांना अज्ञात असलेले भूभाग उजेडात आणले. त्यावेळी या प्रवाशांचा तेथील आदिवासींबरोबर या निमित्ताने संबंध आला. त्यावेळी त्यांनी आलेले अनुभव लिहून ठेवले आहेत. अठराव्या शतकातच युरोपातील व्यापा-यांनी आफ्रिका, अमेरिका, आशिया खंडात वसाहती स्थापून आपले व्यापारी व राजकीय उद्‌दीष्ट सफल व्हावे यासाठी आदिवासींविषयी माहिती गोळा केली. या निमित्ताने त्यांनी त्यांचा अभ्यास केला, तर ख्रिश्चन धर्मप्रचारकांनी आदिवासींना ख्रिश्चन बनविण्याआधी त्यांची मने जिंकण्यास

त्यांच्या चालीरीतींची माहिती करून घेतली. उदा. आसाममधील नागा जमात. धर्मप्रचारकांनी आदिवासी लोकांच्या जीवनपध्दतीची अनेक टिपणे केलेली आहेत. अशाप्रकारे वेगवेगळया निमित्तांनी आदिवासींशी संपर्क आल्याने आदिवासी समाजाचा जो अभ्यास आतापर्यंत झाला होता, त्याच्या मर्यादा एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानवशास्त्रज्ञांच्या लक्षात आल्या त्यामुळे आदिवासी समाजाच्या विशेष अभ्यासावर नंतरच्या काळात भर दिला गेला.

थोडक्यात - एकोणिसाव्या शतकात संशोधक, मिशनरी, व्यापारी यांनी शोधलेल्या समाजांकडे राजकीय तत्ववेत्यांचेही लक्ष गेले.. मानवाने निर्माण केलेल्या शासन यंत्रणेपूर्वी मानव कोणत्या अवस्थेत राहत होता याची उत्कंठा त्यांना लागली. ' रुसोनेही अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या ग्रंथात वन्य लोकांच्या जीवनासंबंधी मोठे रम्य चित्र रेखाटले. ते जीवन साधे, स्वतंत्र आणि निश्चिंत आहे, असे तो म्हणतो.' [4] म्हणून त्याने आदिवासी मानवाच्या नैसर्गिक जीवनपध्दतीची स्तुती केली. या विचारसरणीमुळे आदिवासी लोकांच्या जीवनपध्दतीच्या अभ्यासास सुरूवात झाली.

आदिवासी जमाती झपाटयाने नष्ट होत आहेत. नागर संस्कृतीशी, लोकांशी येणा-या संपर्कातून व धर्मांतर झाल्याने नष्ट होत आहेत तर काही मृत्यूमुखी व बळी पडत आहेत. अशावेळी त्या जमाती नष्ट होण्यापूर्वी त्यांचा तातडीने अभ्यास करणे आवश्यक आहे असे मानवशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांना वाटल्याने ते या अभ्यासाकडे अधिक ओढले गेले. मॉर्गन, मॅकलेनान, टायलर इ. मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास सुरू केला. उदा. रेडक्लिफ ब्राऊन व मॅलीनोवोस्की या लेखकांनी अंदमान बेटावरील राहणा-या आदिवासींच्यात दीर्घकाळ राहून त्यांच्या संस्कृतीतील विविध घटकांचे निरीक्षण केले. आदिवासी विश्वाचे महान उद्‌गाते इंग्लंडमधील डॉ.वेरिअर एल्विन यांनी भारतात येवून सातपुडा पर्वतांच्या रांगांमध्ये नर्मदा नदीकाठी राहणा-या गोंड व परधान या जमातींमध्ये प्रत्यक्ष राहून संशोधन व ग्रंथलेखन केले. "Songs of the Forest" या त्यांच्या ग्रंथात आदिवासींच्या लोकगीतांचे नमुनेही आहेत. 1944-46 मध्ये ' छत्तीसगडमधील लोकगीते ' हा बैगा जमीतीवरील ग्रंथ त्यांनी लिहिला.

भारतातील डॉ. डी. एन. मुजुमदार या मानवशास्त्रज्ञाने आदिवासींच्या जीवनाचा अभ्यास केला. आदिवासींच्या अभ्यासलेल्या वैशिष्टयांवरून, लक्षणांवरून आदिवासी कोणास म्हणावे, त्यांची लक्षणे कोणती याविषयी लेखन केले. त्यांचे वर्गीकरण केले. तसेच डॉ. बी. सी. गुहा, डॉ. हटन इ. मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी जीवनाविषयी अभ्यास केला.

आदिवासींचे कल्याणासाठी भारत सरकारने पंचवार्षिक योजनेमधून आदिवासी कल्याण

कार्यक्रम योजले. यात शिक्षण, आर्थिक मदत, वैद्यकीय मदत व इतर काही गोष्टींचाही अंतर्भाव करण्यात आला. समाजसुधारक महात्मा फुले यांनी ' शूर भिल्ल कोळी शरानें तोडीले । हाकलून दिले ।। रानींवनी ।। ' [5] असा आपल्या साहित्यात उल्लेख केला आहे. समाज संशोधकांनी भारतीय आदिवासी जीवन आपल्या ग्रंथसंपदेत चित्रीत केले आहे. डॉ. अंबादास माडगूळकर व प्रा. शशिकांत फडणीस -' आदिवासी समाज ', डॉ. गुरूनाथ नाडगोंडे -' भारतीय आदिवासी ', डॉ. गोविंद गारे - ' आदिवासींची लोकनृत्ये ', ' आदिवासींचे सामाजिक जीवन ', 'सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी ', इ. अनुताई वाघ - ' कोसबाडच्या टेकडीवरून ', भाऊ मांडवकर -' कोलाम ', ' आदिम ' इ. व्यंकटेश आत्राम -' गोंडी संस्कृतीचे संदर्भ ', दुर्गा भागवत - ' धर्म व लोकसाहित्य ', गोदावरी परूळेकर - ' जेव्हा माणूस जागा होतो ', डॉ. शैलजा देवगावकर - ' माडिया गोंडांची बोली ', ' वैदर्भीय आदिवासी - जीवन आणि संस्कृती ', विलास संगवे - ' आदिवासींचे सामाजिक जीवन ' अशा अनेकांनी समाजसेवेच्या भावनेने आदिवासींचा अभ्यास केला तर काही लोकांनी त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे चित्रण आपल्या साहित्यातून केल्याचे आढळते.

आदिवासींच्यात विकास व्हावा, त्यांच्यात सुधारणा व्हाव्यात यासाठी अनेक लोकांनी प्रयत्न केले. त्यातील ठक्कर बाप्पा हे एक होत. त्यांनी ' अखिल भारतीय आदिम जाती सेवा संघ ' स्थापन केला. आदिवासींच्या सेवाकार्यासाठी निरनिराळया राज्यात अनेक संस्था, अनेक कार्यकर्ते निर्माण केले. भारतात मध्यप्रदेश, बंगाल, बिहार, ओरिसा इ. भागांमध्ये प्रवास केला व आदिवासींचे प्रश्न उजेडात आणले. आदिवासींमधीलच कार्यकर्ते तयार करून त्यांनी आदिवासी सेवामंडळाची कामे त्यांचेकडून करून घेतली. आयुष्याच्या अखेरपर्यंत आदिम सेवासंघाच्या कार्यात त्यांनी स्वतः इंजिनियर असूनही काम केले. आजही या संस्थांमधून काम करणा-या कार्यकर्त्यांना व ध्येयवादी तरूणांना ते मार्गदर्शक ठरले आहेत. म्हणून आदिवासींच्या सेवा कार्याचा पाया घालण्याचे मोठे श्रेय अमृत विठ्ठलदास ठक्कर यांना द्यावे लागेल. ' [6] असे गोविंद गारे म्हणतात. सातपुडयाच्या पायथ्याशी असलेल्या खिरोदे या खेडयात शेतकरी कुटुंबात धनाजीनाना उर्फ दादासाहेब चौधरी जन्मास आले. त्यांनी सातपुडा परिसरातील तडवी, वंजारी व पावरा या आदिवासी जमातीतील पडीक जमीनी लागवडीलायक केल्या व आधुनिक पध्दतीने शेती करण्यासंबंधीची माहिती आदिवासींना दिली. त्यांच्याकरता शाळा काढल्या. आदिवासी महिलांची आरोग्यविषयक जाणीव वाढेल असे प्रयत्न केले. आदिवासींमध्ये विकासाच्या विविध कार्यक्रमात सहभागी झाले पाहिजे ही भावना वाढविली. मारेक-यांनी त्यांची निर्घृण हत्या केली. त्यांनी आदिवासींच्या दैन्यमय जीवनात चैतन्य निर्माण केले होते.

कुलाबा जिल्ह्यातील साई या गावी आचार्य शं. रा. भिसे यांचा जन्म झाला. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विभागातच त्यांनी मुख्यतः काम केले. 1959 साली ठाणे येथे झालेल्या अखिल भारतीय आदिवासी परिषदेचे त्यांनी संयोजन केले होते. या कार्यक्रमामुळे आदिवासींचे प्रश्न व त्यावरील उपायांबद्दल मार्गदर्शन झाले. सातपुडा पर्वतात राहणा-या भिल्लांना दारू, सावकार व सरकारी अधिकारी यांच्यापासून त्यांचा बचाव करण्यासाठी भिसे यानी लढे उभारले. ही कामे कायम चालावित म्हणून संस्था स्थापन केली. संमेलने व परिषदा भरवून पुढा-यांना भिल्लांच्या जीवनाची खरीखुरी परिस्थिती दाखविली. याप्रमाणेच नारायण सिंहजी उईके, सांगली जिल्ह्यातील तासगावचे दादासाहेब बिडकर इत्यादींनी आदिवासींच्या विकासासाठी मोलाची कार्ये केली. त्यांना सुधारण्याचे कार्य केले.

एकंदरीत पंचवार्षिक योजना, सामाजिक संस्था, सरकारची विविध धोरणे, समाजसुधारक या माध्यमातून आदिवासींच्या उन्नतीचे सर्व बाजूंनी प्रयत्न होत आहेत.

**आदिवासी साहित्य चळवळीस प्रारंभ ...**

महाराष्ट्रामध्ये मराठी साहित्यातून समाज जीवनाला आकार देणा-या अनेक चळवळी उदयास आल्या. पारलौकिक जीवनाचे भक्तीचे गोडवे गाण्यात रमलेली ' संत साहित्याची चळवळ ' बाराव्या शतकात उदयास आली. शृंगार, प्रेम, विरह, मिलन यांना प्रोत्साहन देणारी ' पंडिती, शाहिरी व बखार साहित्याची चळवळ ' मध्ययुगात निर्माण झाली. तसेच ग्रामीण जीवनाचे चित्रण रेखाटणारी ' ग्रामीण साहित्याची चळवळ ' व दलित, उपेक्षित अशा जीवनातील दुःखाचं, उपेक्षांचं, शोषितांचं चित्रण करणारी ' दलित साहित्याची चळवळ ' उदयास आली. या सर्व साहित्यिक चळवळींनी गावकुसाच्या आतील अंतरंग चित्रीत केले. परंतु गावकुसाबाहेरील डोंगरात, द-याखो-यात, दुर्गम भागांमध्ये जीवन जगणा-या आदिवासींकडे साहित्यिकांचे विशेष लक्ष गेले नाही. दलित साहित्य चळवळ ही दलितांमध्येच गुरफटल्याने आदिवासींविषयी विचार करण्यास ती असमर्थ ठरली. तसेच ती आदिवासी जीवनाला न्याय देवू शकली नाही. दलित व आदिवासी या दोन्ही वर्गांमध्ये भेद आहे, वेगळेपणा आहे. तो वेगळेपणा सांगताना प्रा. गं.बा.सरदार म्हणतात " मागास समाजामध्ये व्यथा ही केवळ एका व्यक्तीची नसून ती त्या त्या जनसमूहाची सामूहिक व्यथा असते. आपल्या विषमतेवर आधारलेल्या प्रत्येक समाज घटकाची व्यथा वेगळी, दुःखं वेगळी, अनुभूती वेगळी. दलितांचा अनुभव वेगळा, आदिवासींचा अनुभव वेगळा. त्यांची संस्कृती वेगळी, त्यांचा इतिहास वेगळा. ते ज्ञानसंपदेला व सांस्कृतिक परंपरेला वंचित राहिलेले. दलित हे गावकीमध्ये राहिलेले, आदिवासी समाजापासून अलग पडलेले. त्यामुळं त्यांचा अनुभव हा वेगळा राहणारच. त्यांचा अविष्कारही वेगळाच असणार.

दलित साहित्याप्रमाणेच आदिवासींच्या साहित्याचं हे वेगळेपण मान्य केलंच पाहिजे." [7] या दृष्टीने दलित साहित्य चळवळीचा पुढील टप्पा म्हणून आदिवासी साहित्य चळवळीकडे पाहता येईल. मराठी साहित्यातील तोच तो पणा झुगारून पुढे आलेल्या चळवळीपैकी आदिवासी साहित्याची चळवळ ही त्यापैकीच एक होय. या चळवळीमुळे मराठी साहित्यात एक नवे दालन उघडले गेले.

मराठी साहित्यामध्ये विविध चळवळींकडून आदिवासींच्या अपेक्षा होत्या पण त्या ते पूर्ण करू शकले नाहीत. त्यामुळे 10 व 11 नोव्हे.1979 या दिवशी भद्रावती या गावी प्रा.तुमराम यांच्या पुढाकाराने व श्रीकृष्णमूर्ति मिरमिरा यांचे अध्यक्षतेखाली ' पहिले आदिवासी साहित्य संमेलन ' घेण्यात आले. विनायक तुमराम, कवी भुजंग मेश्राम, डॉ. रा.गो. देवगावकर इ. या संमेलनात उपस्थित होते. ' हे संमेलन म्हणजे मराठी साहित्यातील एक क्रांतीकारी घटनाच म्हणावी लागेल. कारण येथूनच आदिमांच्या साहित्याचा व पर्यायाने मुक्तीचा प्रवास सुरू झाला. शतकानुशतके अंधारात चाचपडत बसलेल्या, समाजापासून अलग पडलेल्या आदिपुत्रांना एका स्वतंत्र, स्वतःच्या व्यासपीठावर बसून आपल्या वेदना, समाज, संस्कृती, धर्म, पूर्वेतिहास इत्यादी विषयांवर चिंतन करण्याची, आपले अनुभव, भाव-भावना व्यक्त करण्याची संधी पहिल्यांदाच ह्या संमेलनाने प्राप्त झाली '.[8] यादृष्टीने पुढे दुसरे आदिवासी साहित्यसंमेलन 23 व 24 मे 1982 मध्ये वणी, जि. यवतमाळ येथे डॉ. रावसाहेब कसबे यांचे अध्यक्षतेखाली, तिसरे संमेलन 6 व 7 जून 1987 मध्ये किनवट, जि. नांदेड येथे डॉ. गोविंद गारे यांचे अध्यक्षतेखाली, चवथे 27, 28, व 29 जाने. 1989 मध्ये नंदूरबार, जि. धुळे येथे श्री. लक्ष्मण माने यांचे अध्यक्षतेखाली, पाचवे 23, 24 व 25 डिसें. 1990 मध्ये पालघर, जि. ठाणे येथे श्री. वाहरू सोनवणे यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. अशी साहित्य संमेलने आयोजित केली जावू लागली. पहिला आदिवासी साहित्यिक मित्र-मेळावा 18 व 19 फेब्रु. 1989 मध्ये गडचिरोली, जि. गडचिरोली येथे डॉ. सुभाष सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली बोलाविण्यात आला. दुसरा आदिवासी साहित्यिक मेळावा 8 मे 1989 मध्ये पांढरकवडा जि. अमरावती येथे भरविण्यात आला. अशाप्रकारची आदिवासी साहित्य संमेलने व मेळावे यांचे माध्यमातून आदिवासीविषयी चर्चा होऊन त्यांच्या समस्या समजण्यास मदत होऊ लागली आणि आदिवासी साहित्यिकांनाही प्रोत्साहन मिळाले.

मराठी साहित्यात विविध वाङ्मय प्रकारातून आदिवासींचे चित्रण केले गेले आहे ते पुढीलप्रमाणे ...

**कवितासंग्रह** - विनायक तुमराम-'गोंडवन पेटले आहे,' रवि कुरूसंगे-' इंद्रियारण्य,' भुजंग मेश्राम - 'उलगुलान ', ' मोहोळ ', 'आदिवासी कविता ', उत्तम धोंगडे - ' वनवासी' या व इतर

अनेक कविंनी काव्यातून आदिवासींचे जीवन चित्रीत केले आहे. तसेच आदिवासींच्या जीवनाचे चित्रण **कथा वाड्मय** प्रकारातूनही झाले आहे. उदा. आदिवासींच्या जीवनातील अनेक घटनांचे वर्णन करणारी शेख सलीम अहमद यांची ' जाण्याकाका ' ही कथा. त्यांचा ' रानातील माणसं ' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे. या कथासंग्रहात ठाणे जिल्ह्यातील मोरवाड, तलासरी, मनोर इ. ठिकाणच्या आदिवासी जमातीच्या सुखदु:खाचे कथन आहे. आदिवासींमध्येही ब्राह्मणाप्रमाणे वागणारी माणसे आहेत याचं दर्शन देणारी, कुंडलिक केदारी यांची ' आदिवासी सायबाची बायकू ' ही कथा, विजय तेंडुलकरांची ' आक्रोश ' ही कथा. तर डॉ. व्हेरिअर एल्विन यांनी ' भारताच्या ईशान्य सरहद्दीवरील (लोकांच्या) दंतकथा ' नावाचे पुस्तक लिहून आदिमांच्या जीवनातील दंतकथांचे चित्रण केले आहे. पं. गो. गांगल यांनी ' वडाचा डोह ' ही कातकरी मनाचे कथन करणारी कथा लिहिली आहे. अशा अनेक लेखकांनी कथा लिहिल्या आहेत. स्वत:ला आलेल्या अनुभवांचे वर्णनही अनेक लेखकांनी केले आहे. ' जेव्हा माणूस जागा होतो ' या पुस्तकात वारली जमातीमध्ये काम करीत असताना आलेल्या अनुभवांचे चित्रण गोदावरी परूळेकर यांनी, तर कोसबाडच्या टेकडीवर आदिवासी संबंधी काम करताना आलेले अनुभव अनुताई वाघ यांनी ' कोसबाडच्या टेकडीवरून ' या पुस्तकात चित्रीत केले आहेत. **चरित्रात्मक स्वरूपाचे** लेखनही केले गेले आहे. उदा. विनायक तुमराम यांनी ' नारायणसिंह उईके ' यांचे चरित्र लिहिले आहे. **नाटके / एकांकिका** - भुजंग मेश्राम यांची 'औतान,' 'सवारी,' 'मातामाय,' 'सोंग' इ. जगतकुमार पाटील यांची ' आसाचा फेरा ' (एकांकिका), रत्नाकर मतकरी- 'लोककथा 78 ', रमेश कुबल – ' आदिलिला ' इ. अनेक नाटयसंपदाही आदिवासी जीवनावर चित्रीत झाल्या आहेत.

**कादंबरी** - या वाड्मयप्रकारातही अनेक लेखकांनी आदिवासी जीवनाचे चित्रण केले आहे. ते पुढीलप्रमाणे : शं.रा. भिसे - ' जंगलातील छाया ' (1945) श्रीराम अत्तरदे - ' सावलीच्या उन्हात ' (1946), श्री हडप - गोदाराणी (1947), पं.त्रि.सहस्त्रबुध्दे ' पहिली सलामी ' (1948), वा.ब.कर्णिक - ' वाडगीन ' (1951), दुर्गा भागवत - ' महानदीच्या तीरावर ' (1953), गो.नी.दांडेकर - ' जैत रे जैत ' (1965) अनिल बर्वे - ' डोंगर म्हातारा झाला ' (1977), साने गुरूजी - ' शबरी ' (1984), गो. नी. दाण्डेकर - ' भिल्लवीर कालिंग ', मधुकर वाकोडे ' झेलझपाट ' (1988), शरद दळवी - ' एकलव्य ' (1988), जगदीश गोडबोले - ' पारध ' (1989), सुरेश द्वादशीवार -' हाकुमी ' (1989), दीनानाथ मनोहर - ' आंदोलन ' इ. या आदिवासेतरांनी लिहिलेल्या कादंब-या आहेत. काही वेळा केवळ

सहानुभूती म्हणून तर काही वेळा वेगळया जीवनाचे चित्रण केल्याने आपले लेखन लोकप्रिय होऊ शकेल या भावनेने तर काही वेळा या आदिवासी लोकांची संस्कृती, त्यांचे जीवन, त्यांचे दारिद्रय या गोष्टी समाजाच्या समोर आल्या पाहिजेत, समाजजीवनाचा साहित्याशी अत्यंत निकटचा संबंध असतो त्यामुळे कथा-कादंब-यातून ते जीवन आले पाहिजे अशा भावनेने कादंब-या लिहिलेल्या आढळतात. आदिवासेतर लेखाकांनी लिहिलेल्या कादंब-यांचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे हे आपण ' महानदीच्या तीरावर ' आणि ' झेलझपाट ' या दोन कादंब-याच्या आधाराने पाहणार आहोत. तत्पूर्वी इतर काही कादंब-यातून या आदिवासींचे चित्रण कसे आले आहे हे स्थूल स्वरूपात ध्यानात घेता येईल.

आचार्य शं.रा. भिसे यांनी ' **जंगलातील छाया** ' (1945) ही कादंबरी लिहिली आहे. जंगलात राहणारे लोक जंगलाच्या व्यापारी वर्गाकडून कसे नाडले-गांजले याची माहिती वर्णन करणे हा लेखाकाचा ही कादंबरी लिहिण्यापाठीमागचा मूळ हेतू दिसतो.

या कादंबरीत आदिवासींविषयीची भिसे यांच्या अंतःकरणातील अस्वस्थता त्यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील वारली, कातकरी, भिल्ल या आदिवासींमध्ये स्वतः राहून त्यांनी जे ऐकले, अनुभवले, पाहिले त्याचे वर्णन केले आहे. या कादंबरीत आदिवासींचा सावकारांकडून होणारा छळ, सावकारांचे आदिवासींना गुलामाप्रमाणे वागवणे, नागर लोक आदिवासी स्त्रियांच्या अब्रूस कसे किमंत देत नाहीत, वकील पैशासाठी आदिवासींवर होणा-या अन्यायाकडे कसे दुर्लक्ष करतात, जंगलात राहणारे हे लोक व्यापारी वर्गाकडून कसे लुबाडले जातात, त्यांची पिळवणूक कशी केली जाते याचे चित्रण लेखाकानी या कादंबरीत केलेले आहे. या कादंबरीतील स्वतःवर होणा-या अन्यायामुळे चिडलेली रतन ही नायिका स्वतःची अब्रू लुटण्यास प्रवृत्त झालेल्या सावकाराचा खून कशी करते याचे वास्तव वर्णन या कादंबरीत केले आहे.

संपूर्ण कादंबरीत लेखाकाने आदिवासींचे जीवन, त्यांच्या मुलभूत गरजा, त्यांच्या चालीरीती त्यांचे वास्तवचित्रण शब्दांकीत केले आहे. लेखाकाने आशयानुरूप वातावरणनिर्मिती केलेली आहे. डहाणू-उंबरगावसारख्या शहरांची संस्कृती आदिवासींच्या रक्तामांसावर उभी होती. त्या दिखाऊ संस्कृतींना आदिवासींची जाणीवही कशी होत नाही ? हा भेडसावणारा प्रश्न लेखाकाने या कादंबरीत मांडला आहे. आदिवासींविषयी वाटणारी आत्मियता कादंबरीतून प्रकट झाली आहे.

लेखाकाचा कादंबरी लिहिण्याचा हेतू आदिवासी जीवनाचे चित्रण करणे हा नाही. तरीही आदिवासी जीवनाचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत असल्याने ही आदिवासी जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी आहे.

प.त्रि.सहस्त्रबुध्दे यांनी ' **पहिली सलामी** ' (1948) ही कादंबरी लिहिली आहे. लालबावटयाखाली एकवटलेल्या व झुंजणा-या वारली समाजाचे चित्रण करणे या हेतूने ही कादंबरी लिहिली आहे.

उंबरगाव व खत्तलवाडयापलिकडे राहणा-या वारली जमातीचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत सहस्त्रबुध्दे यांनी केले आहे. लेखकाने तेथील पुढा-यांच्या भेटी घेतल्या. वारली कुटुंबियाशी बातचीत केली. तसेच कार्यकर्त्यांनी मिळविलेली माहिती मिळवून लेखकाने ही कादंबरी लिहिली आहे. पालशेट डोंगराच्या उतारावर राहणा-या वारल्यांची भयाण दरिद्री अवस्था होती. सावकारांनी केलेले जुलूम, मारहाण वारल्यांना सहन करावे लागत होते. हे सारे जुलूम, दु:खे नष्ट करण्यास वारली ' हिरव्याचा सण' साजरा करतात. याचे चित्रण लेखकाने केले आहे. या कादंबरीचा नायक जेत्या होय. जेत्याच्या अर्थात वारल्यांच्या दारिद्रयाचे, त्यांच्या पिळवणूकीचे, सावकाराने वारल्यांच्या केलेल्या छळाचे, वारल्यांचा भगतावरील विश्वास, नवससायासावरील अंधविश्वास, त्यांचे ताडी पिणे, वारल्यांना सतत कर्जात ठेवून त्यांना जन्माचे गुलाम बनवणारे सावकार, सावकाराच्या जाचातून मुक्त होवू पाहणा-या गरीब किसानांचे, वारल्यांना छळापासून मुक्त करण्यासाठी केलेले प्रयत्न त्यासाठी झुंजणारे वारली याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत केले आहे.

प्रस्तुत कादंबरीत सहस्त्रबुध्दे यांनी जेत्या, खादीचा पोशाख घालून देशभक्तीचा आव आणणारा परंतु वारल्यांना गुलामाप्रमाणे वागवणारा दाजी, दाजीच्या अशा वागण्याचा तिरस्कार करणारी त्याची एकुलती एक सुशिक्षित मुलगी माई, तिचा जिवलग मित्र भास्कर तसेच मंचरशहा, वाडिया शेठ, विसूना हे सावकार, जेत्याची पत्नी जानी, भूमका, अशी व्यक्तिचित्रणे रेखाटली आहेत. आशयसूत्रास योग्य अशी वातावरणनिर्मिती या कादंबरीत लेखकाने केलेली दिसते. निसर्गचित्रणे थोडीफार परंतु आशयास पूरक अशी केली आहेत. ही कादंबरी लिहिण्यामागचा हेतू जरी लालबावटयाखाली झुंजणा-या वारल्यांचे चित्रण करणे हा असला तरी वारली या आदिवासी जमातीचे चित्रण या कादंबरीत आल्यामुळे ही आदिवासी जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी ठरते.

गो. नी. दाण्डेकर यांची ठाकर या आदिवासी जमातीवरील ' **जैत रे जैत** ' (1965) ही कादंबरी होय. या कादंबरीद्वारे ठाकर जमातीतील अंधश्रध्दा प्रदर्शित करणे हा दाण्डेकरांचा मुख्य हेतू दिसतो.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नाग्या हा या कादंबरीचा नायक. नाग्याचे वडील म्हणजे मोठा भगत. ते नाग्यास भगताची दिक्षा देतात. लेखकाने दिक्षा विधीचा हा कार्यक्रमही तपशीलाने चित्रीत केलेला आहे. भगत ( नाग्या ) ढोल वाजवितो. त्या ढोलाच्या आवाजाने बिळातून बाहेर पडलेल्या उंदराला ठाकर दगडांनी मारतात. मेलेल्या उंदराच्या ढिगातून प्रथम मऊ लुसलुशीत कोवळे असे उंदीर खाण्यास नेण्याचा पहिला मान भगतास असतो. मोराचीही शिकार करून ते मोर खातात. तसेच बेडूक ससे मोहफुले इ. निसर्गामध्ये उपलब्ध असणारे प्राणी व वस्तु खाऊन ठाकर आपले पोट भरतात. अंगावर घालण्यास त्यांना पुरेसा कपडाही मिळत नाही. या सर्व उल्लेखातून दाण्डेकर ठाकरांच्या दारिद्रयाचे चित्रण करतात. तद्वतच ठाकरांच्या लिंगोबा डोंगराविषयी असलेल्या समजुती, लिंगोबावर व झाडदेवावर असलेला त्यांचा अंधविश्वास, भगतावरील श्रध्दा, भगत होण्यास पाळावे लागणारे नियम, अश्विनी अमावास्येला मोहाच्या फुलाची दारू पिवून रात्रभर त्यांचे नाचणे, नागपंचमीचा सण उत्साहाने साजरा करण्याची त्यांची पध्दती, मंत्रतंत्रावरील व मृतात्म्यांवरील त्यांचा विश्वास या सर्व गोष्टींचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत दाण्डेकरांनी केले आहे.

या कादंबरीत नाग्या (छोटा भगत), नाग्याची आई आयशी, नाग्याचे वडील, नाग्यावर मरून-फिरून पडणारी चिंधी, चिंधीचा बाप लखमा, नाग्याचे ठाकर मित्र, सुभा, भगुल्या, भुत्या अशी पात्रे आहेत. दाण्डेकर नाग्या व चिंधी यांच्यातील प्रेमाचे चित्रणही करतात. तसेच ठाकरांमध्ये बायकोने पतीला लग्नात केलेला सारा खर्च परत दिला की त्यांचा एकमेकाशी संबंध राहत नाही, या ठाकरांच्या रूढीवरही लेखक प्रकाश टाकतात.

ठाकरवाडीजवळ असलेल्या लिंगोबा डोंगराचे व तेथील निसर्गाची मोहक वर्णने दाण्डेकरांनी केलेली आहेत. ठाकरांच्या श्रध्दा निसर्गाशी कशा एकरूप, अनुरूप आहेत याचेही चित्रण प्रस्तुत कादंबरीत केलेले आहे.

अनिल बर्वे यांनी **' डोंगर म्हातारा झाला '** (1977) ही कादंबरी लिहिली आहे. एक पेन्शनर व्यक्ती उरलेले आयुष्य निवांतपणे व द-याखो-यांमध्ये शिकार करून घालविण्यासाठी मळकर्णीच्या डोंगरावर राहण्यास व तेथे बंगली खरेदी करण्यास जाते, तेथील ठाकरांवरील अन्यायाचे चित्र पाहते व विषण्ण होते. त्या पेन्शनरने जे पाहिले त्याचे चित्रण करणे हा लेखकाचा कादंबरी लेखनाचा हेतू दिसतो. मळकर्णी डोंगरावरील ही व्यक्ती व ठाकर लोक यांचे चित्रण लेखकाने या कादंबरीत केले आहे.

SHIVAJI UNIV

या कादंबरीत ठाकरांना बाटवून त्यांच्यात फूट पाडण्यास ख्रिश्चनांनी केलेला प्रारंभ, रतुशेठ व मगनशेठ यांनी ठाकरांची जागा फुकटात घेण्याचा केलेला प्रयत्न, वाघाई तळयाजवळ हॉस्पिटल बांधण्याऐवजी फाइव्ह स्टार हॉटेल बांधण्यास ती जागा मिळावी म्हणून रतुशेठ अडवाणीने केलेले प्रयत्न, डांबरी रस्ता बांधण्यास ठाकरांच्या जमिनी त्यांचेकडून जबरदस्तीने घेण्यास केलेले प्रयत्न व त्यासाठी ठाकरांवर होणारा अन्याय व अत्याचार, डी.वाय.एस.पी. सारखे लाचखाऊ अधिकारी या गोष्टीचे चित्रण केले आहे.

या कादंबरीत पेन्शनर मेजर कामा, भोपळया प्रमाणे टुणुक टुणुक चालणारा एक ध्येयवादी व त्यागी कमराद म्हातारा, ठाकरांवर होणा-या अन्यायाविरूध्दच्या लढाईत कामी आलेला कमरादचा मुलगा मुन्ना, मळकर्णीचा प्रतिष्ठीत व स्थानिक रहिवासी डिसोझा मोटेलवाला, मळकर्णीचा फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टर मगनशेठ, सुप्रसिध्द दानशूर उद्योगपती रतुशेठ अडवानी, डिसोझाचा मानलेला पुत्र बॉय डिसोझा, म्हातारपणी उरलेले आयुष्य निवांत घालविण्यासाठी मळकर्णीत येवून राहिलेला पारशी बावाजी रूस्तमजी पेस्तनजी व त्याची बायडी (बायको) आवाबाय, जमादार यासीन पटेल, धर्मरक्षकसंघाचे टगे, मळकर्णीच्या डोंगरातील ठाकरं, गण्या या व्यक्तिरेखांचे चित्रण लेखकाने केले आहे.

ठाकर या आदिवासी जीवनाचे चित्रण करणे हा लेखकाचा ही कादंबरी लिहिण्यामागे हेतू नाही. तरीही ठाकरांचे चित्रण कादंबरीत आले असल्याने ही आदिवासी जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी होय.

साने गुरूजी यांनी भिल्ल जमातीत जन्मास आलेल्या शबरीची कहाणी ' **शबरी** ' (1984) या कादंबरीत रेखाटली आहे. प्रस्तुत कादंबरीमध्ये सानेगुरूजींचा मुख्य हेतू शबरीच्या भक्तीचे चित्रण, वर्णन करणे हाच दिसतो.

प्रस्तुत कादंबरीत साने गुरूजी यांनी मतंग ऋषींच्या आश्रमात व त्यांच्या संस्कारात वाढलेल्या शबरीची कथा सांगितली आहे. ही कथा सांगताना शबरीच्या घराचे, भिल्ल जमातीतील लोकांच्या रितीरिवाजाचे चित्रण केले आहे. शबरी उपवर झाल्यानंतर आपल्या वडिलांकडे जाते. वडील तिचे लग्न ठरवतात. त्यावेळी साने गुरूजी भिल्लांच्या लग्नाच्या वेळच्या पध्दतीचे चित्रण करताना दिसतात. अनेक बोकडांचा बळी लग्नाचेवेळी दिला जातो. यातून भिल्लांच्या हिंसक वृत्तीचा उल्लेख लेखकाने केलेला आहे. या कथानकाच्या आधारे (शबरीच्या माध्यमातून) आदिवासींच्या निरलसतेकडे सानेगुरूजी लक्ष वेधतात.

आदिवासी जीवनाचे उल्लेख निवेदनातून आलेले आहेत. हे उल्लेख समृध्दपणे नाही पण त्यांचे त्रोटक स्वरूपाचे चित्रण कादंबरीमध्ये आलेले आहे. रानटी म्हणून संबोधल्या जाणा-या आदिवासींवर चांगले संस्कार केले, ज्ञानाचा झरा त्यांचेसंबंधी वाहता सोडला तर आदिवासी नागर संस्कृतीतील लोकांप्रमाणे सुसंस्कृत बनु शकतात हे साने गुरूजी यांनी शबरी या व्यक्तीरेखेच्याआधारे दर्शविले आहे. या गोष्टीचे चित्रण करून त्यांनी बोध करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत कादंबरीत साने गुरूजींना शबरीची रामावरील भक्ती, प्रेम विषद करावयाचे आहे. आदिवासी जीवनाचे चित्रण करणे हा या कादंबरीचा मूळ हेतू नाही. त्यामुळे कादंबरीत आदिवासींविषयी केलेले वर्णन ढोबळमानाने केलेले दिसते.

गो.नी.दाण्डेकरांनी ' **भिल्लवीर कलिंग** ' नावाची कादंबरी लिहिली आहे. युध्दकथा चित्रण करणे हा दाण्डेकरांचा मुख्य हेतू दिसतो.

प्रस्तुत कादंबरीत शकांनी भिल्ल जमातीवर केलेला हल्ला, त्यांच्या अबालवृध्द व महिलांना शकांनी पळवून नेणे, त्यांना सोडवून आणण्यास भिल्लांनी केलेले शौर्य यांचे चित्रण केले आहे. भिल्लांच्या शौर्याबरोबर त्यांचे रितीरिवाज, त्यांच्या वागण्याच्या पध्दती, वनदेवावरील त्यांच्या श्रध्दा, भिल्लांचे अन्न, त्यांचे पोशाख, स्वतःची ऐपत नसतानाही आपल्या दारात आलेल्या स्वर्णमयी व शिवदत्त या अतिथींचे आदरातिथ्य करण्याची पध्दती, कालिंगाचे भावुक मन, ससे हे भिल्लांचे अन्न पण त्यांनाही न मारणारा कालिंगा माणसांच्या (शकांच्या) पाशवी वृत्ती पाहून त्यांचा संहार करण्यास कसा तयार होतो याचे चित्रण दाण्डेकरांनी केले आहे.

प्रस्तुत कादंबरीत, कालिंगा त्याचे आईवडील, त्याची बहीण, स्वर्णमयी, शिवदत्त, शक लोक यांची व्यक्तिचित्रणे लेखकाने परिणामकारकपणे व त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यासह चित्रीत केलेली आहेत.

युध्दकथा चित्रीत करणे हा लेखकाचा प्रमुख उद्देश असल्याने भिल्ल या आदिवासी जमातीच्या चित्रणापेक्षा प्रस्तुत कादंबरीमध्ये युध्दवर्णने अधिक आहेत.

चंद्रगुप्त मौर्याच्या कालखंडातील कालिंगासारखी व्यक्ती लेखकास भावली असावी त्याचेच चित्रण लेखकाने केलेले आहे. त्यामुळे कादंबरीत ऐतिहासिक वातावरण असणे स्वाभाविकच आहे. निसर्गाची चित्रणे विशेष करून या कादंबरीत आलेली दिसत नाहीत. आदिवासी जीवनाचे चित्रण करणे हे या कादंबरीचे आशयसूत्र नाही. तरीही भिल्ल या आदिवासी जीवनाचे चित्रण कादंबरीत केलेले असल्याने ही आदिवासी कादंबरी होय.

शरद दळवी यांनी ' **एकलव्य** ' (1988) ही कादंबरी लिहिलेली आहे.

महाभारतातील एकलव्य या पात्राचे आधारे अथवा एकलव्य या कथेच्या आधारे शरद दळवी यांनी आधुनिक काळातही अनेक एकलव्य निर्माण झाले आहेत, तद्वतच द्रोणाचार्यांसारखे लाचार व केविलवाणे गुरूही आज आहेत, आपल्या स्वानुभवाचे, आधुनिक काळाचे चित्रण करणे हा हेतू मनात ठेवून त्यांनी ही कादंबरी लिहिली आहे. अन्यायाचा स्वार्थाचा एकलव्य हा पहिला बळी होय. याचे चित्रण करण्यास शरद दळवी यांनी प्रस्तुत कादंबरीत एकलव्याला झुकते माप दिलेले आहे. त्यासाठी युक्तीवादाची उभारणी केलेली दिसते. . एकलव्याची कथा सर्वांना माहित आहे. या जुन्या कथेला नवा आशय देण्याचा प्रयत्न प्रस्तुत कादंबरीत शरद दळवी यांनी केलेला दिसतो.

शरद दळवींच्या एकलव्य या कादंबरीचा आदिवासी जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी म्हणून उल्लेख केला जातो. परंतु या कादंबरीत एकलव्य हा भिल्ल होता व त्या भिल्लपुत्राच्या कथेचा आधार घेऊन आधुनिक विचार मांडलेला दिसतो. याचाच अर्थ भिल्ल जमातीचे चित्रण करणे हा या कादंबरीचा मुख्य उद्देश दिसत नाही. त्यामुळे आदिवासी जीवनाच्या चित्रणाकडे प्रस्तुत कादंबरीत विशेष लक्ष दिले गेलेले नाही. कादंबरीतील एक घटक म्हणून भिल्ल जमातीचे चित्रण आलेले दिसते. विषयानुरूप ऐतिहासिक वातावरण निर्मिती केलेली दिसते. लेखकाने संस्कृतप्रचुर प्रौढ भाषेचा वापर करून कालमानाशी मेळ घातलेला आहे. अरण्यातील, निसर्गातील वर्णने सांकेतिक व ढोबळच दिसतात.

जगदीश गोडबोले यांनी कुरूसपालच्या अनवट जंगलात राहणा-या कोडिया-कोरिया या जमातीवर ' **पारध** ' (1989) ही कादंबरी लिहिली आहे. आदिवासी जमातींमध्ये राहून संशोधन करणा-या संशोधकांच्या हेतूंचे, उद्देशाचे चित्रण केले आहे. त्याबरोबरच आदिवासी जीवन आता कसे उध्वस्त होत आहे याचेही चित्रण केले आहे. हे चित्रण करणे हा लेखकाचा मूळ उद्देश दिसतो.

या कादंबरीची सलमा ही नायिका होय. ती मानवशास्त्रज्ञ असून कोडिया - कोरिया या आदिवासींचा अभ्यास करण्यास ती कुरूसपालला जाऊन राहते. सलमा आदिवासींच्या रूढी, परंपरा समजुती यांचा अभ्यास करते. त्यांच्या जीवन राहणीचा अभ्यास करते. जीवनदृष्टीचा (आदिवासींच्या) अभ्यास करण्यास ती अनवट जंगलामध्ये राहणा-या कोडिया-कोरिया या जमातीमध्ये जाऊन राहते. परंतु ही जमातच आता उध्वस्त होत आहे याची जाणीव तिला तिचा वर्गमित्र शेखर देतो. या जमातीसाठी तो स्वतः लढतो, अनेक प्रयत्न करतो पण त्याच्या प्रयत्नांना यश येत नाही.

सरकारच्या सागाच्या झाडांनीयुक्त असलेल्या वनराजींच्या जागी कागदाचा कारखाना

काढण्याची योजना, आदिवासी ज्या वनराजीवर आपले जीवन जगतात ती वनराजीच शासनाच्या प्रयोगशील योजनांमध्ये नष्ट होत आहे, जंगलामधून रस्ते काढण्यासाठीही झाडांची कापणी होत आहे, त्यामुळे आदिवासींचे जीवन धोक्यात आले आहे, त्यांची संस्कृतीच नष्ट होत आहे यावर गोडबोले प्रस्तुत कादंबरीत प्रकाश टाकतात.

या चित्रणाबरोबरच गोडबोले या जमातीच्या रूढी, परंपरा, त्यांचे निरागस जीवन याचे चित्रण करतात. कोडिया - कोरिया जमातीची बडया देवावरील श्रध्दा, वंजा पुजा-यावरील त्यांचा विश्वास, त्यांचे नाचगाणे, त्यांचा मंत्रतंत्रावरील व पूजाबळीवरील विश्वास, आदिवासींचे घोटुल, त्यांची शिकारीवृत्ती, पुढा-यांची स्वार्थीवृत्ती व शासनाचे नवनवीन प्रयोग करण्यास आदिवासींच्या राहण्याच्या जागा घेण्यापाठीमागील हेतू या सर्व गोष्टींवर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

या कादंबरीत गोडबोले यांनी आदिवासींचा मुखिया जोबा, अस्वलाच्या हल्ल्यास बळी पडले पुसू व मंगा, त्यांचे साथीदार जग्गा इ. वंजा पुजारी, मुकादम लखमा, ओस्वाल शेठ, दरोगा खुशालचंदजी, वनखात्याचे कॉन्झर्व्हेटर रायसाहेब, रायसाहेबांची मुलगी चारूलता, तिची मैत्रीण व आदिवासींचा अभ्यास करावयास कोडिया - कोरिया जमातीत जाऊन राहिलेली सलमा ( मानवशास्त्राचा अभ्यास करणारी), तिचा वर्गमित्र शेखर शारंगधर, मि. वुल्फ, वनमंत्री धनीरामजी, जंगल ठेकेदारातील एक बडा आसामी बलवंतसिंग, उभी हयात वनखात्याच्या सेवेत घालणारे पांडेसाहेब, डि.एफ.ओ. तलवारसाहेब, मिश्रासाहेब, जोशीसाहेब, वनखात्यात सहा-सात वर्षे नोकरी करीत असलेला संजय पंत, स्पर्धात्मक परीक्षेत सर्व पर्याय उपलब्ध असतानाही वनखात्याची नोकरी आपणहून स्वीकारणारे अवलिया, मंगाराम, प्रोफेसर विद्यापती, वलीसाहेब अशा अनेक व्यक्तींचे चित्रण त्यांच्या स्वभाववैशिष्टयांसह केले आहे.

प्रसंगानुरूप कुरूसपालच्या अनवट जंगलाचे व आजूबाजूच्या परिसराचे निसर्गचित्रणही लेखकाने केले आहे व कथानकास अनुरूप अशी वातावरणनिर्मितीही केलेली आहे. मधुनमधून पात्रांच्या संवादाची भाषा ही त्या जमातीचीच वापरलेली आहे.

कोडिया-कोरिया या जमातीचे, त्यांच्या उध्वस्त होत असलेल्या जीवनाचे, मात्र आपण उध्वस्त होत आहोत याची जाणावही नसणारे निरागस असे आदिवासी त्यांचेही चित्रण लेखकाने प्रस्तुत कादंबरीत केले आहे. म्हणून या कादंबरीस आदिवासी जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

सुरेश द्वादशीवार यांनी गडचिरोली जिल्ह्यातील ' माडिया गोंड ' या आदिवासी जमातीच्या पार्श्वभूमीवर ' **हाकुमी** ' (1989) ही कादंबरी लिहिली आहे.

कन्ना हा या कादंबरीचा नायक आहे. तो माडिया आदिवासी तरूण आहे. पुण्याहून एम.बी.बी.एस. ही पदवी घेवून कांदोडी या आपल्या गावी परत येतो. आपल्या गावात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. कन्नाच्या या प्रयत्नांचे चित्रण या कादंबरीत लेखकाने केले आहे.

कन्ना कांदोडी येथे दवाखाना सुरू करतो, डॉक्टर होण्यासाठी पुण्यात राहतो. तेथे सामाजिक कार्य करणा-या युवकांशी त्याचा संबंध येतो. हे कार्यकर्ते, त्याची बुध्दीमान (हुशार) मैत्रिण अनिता, गोटुमलमधील कन्नाची जोडीदारीण (प्रेयसी) रूपी तसेच तल्लाई व पोचम अवल या ग्रामदेवतेच्या छायेत जीवन जगणारी माडिया कुटुंबे, नक्षलवादी टोळीचा प्रमुख राजय्या ही पात्रे प्रस्तुत कादंबरीत आहेत. हे या कादंबरीचे प्रमुख घटक आहेत.

डॉ. कन्ना गावात दवाखाना, शाळा काढतो. समाजसुधारणा व्हावी अंधश्रध्दानिर्मूलन व्हावे, समाजात जागृती व्हावी, हा या पाठीमागचा मूळ हेतू असतो. माडिया या आदिवासींच्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, समजुती यांचेही चित्रण लेखकाने केले आहे. तल्लाई व पोचम अवल या ग्रामदेवतेवरील त्यांचा विश्वास, लग्नाच्या बाईने अंगात चोळी घातल्यास तिला पोरं होणार नाहीत ही अंधश्रध्दा. शेतात पीक यावं म्हणून माडीया लोक लहान मुलाचा बळी देतात. बळी दिल्यानंतर पीक भरपूर येते अशी त्यांची समजूत असते. डॉ. कन्नास ग्रामदेवतांच्या छायेखाली जगणारे आपले लोक साधे आहेत, ते निरक्षर आहेत पण अडाणी नाहीत, त्यांच्या गरजाच कमी आहेत म्हणून ते समाधानी आहेत हे समजते. तो मुलांचा (नरबळी) बळी जाऊ नये, लग्नानंतरही आपल्या बहिणीने झंपर घालावा, मानेवरील गळूचे ऑपरेशन माडीयांनी करावे यासाठी तो बंड करतो. या त्यांच्या प्रथा, अंधविश्वास घालविण्यास कन्नाला गावातील लोकांशी व आपल्या आईवडीलांनाही तोंड द्यावे लागते. या कामात तो यशस्वी होतो.

अनिता ही कन्नाची पुण्यातील मैत्रीण. तरूण वयात समाजसेवेचे व्रत तिने घेतले आहे. तिचा कन्नाशी सहवास येतो. त्यावेळी त्याचेवर मनोमन प्रेम करणारी निष्ठावान कार्यकर्ती, आदर्शाच्या व सुधारणेच्या गोष्टी बोलणारी अशी ही व्यक्तीरेखा द्वादशीवार उभी करताना दिसतात. तर रूपी ही कन्नाची गोटुलातील मैत्रीण. कन्नावर जिवापाड प्रेम करणारी, आईवडीलांनी दुस-या मुलाशी लग्न ठरवताच कन्ना नाही तर कन्नाचा विवाहीत भाऊ चालेल या उद्देशाने कन्नाचे घरात घुसणारी, कन्नाची वाट पाहून शेवटी नक्षलवाद्यांच्या टोळीत सामील झालेली, काही वर्षांनी कन्ना भेटल्यानंतर

त्याने लग्नाची इच्छा प्रकट करताच त्याला नकार देणारी अशी रूपी लेखक रेखाटतात. नक्षलवादी टोळीचा प्रमुख राजय्या. हा कन्नाचा मित्र. एस्.एस्. सी. पर्यंत शिकलेला, सावकारी मोडून आदिवासींना न्याय मिळवून देणारा,भ्रष्ट अधिका-यांना वठणीवर आणणारा असे राजय्या हे पात्र लेखक चित्रीत करतात. याशिवाय पवरी, जुरू, डोबी, चुक्की इ. पात्रे त्यांच्या स्वभावचित्रणासहित या कादंबरीत लेखकाने चित्रीत केली आहेत.

माडिया लोकांच्या अंधश्रध्देचे, अज्ञानाचे चित्रण कांदबरीत जसे लेखकाने केले आहे. तद्वतच त्यांच्या भावुकतेचेही चित्रण केले आहे. माडिया लोक दरिद्री असले तरी मनाने श्रीमंत, शरीराने धडधाकट, काटक, हसतमुख, समाधानी व निष्कपटी आहेत. माडिया लोकांच्या या वैशिष्टयावरही लेखकाने कादंबरीत प्रकाश टाकला आहे.

सुरेश द्वादशीवार यांनी आदिवासींच्या निसर्गनिष्ठ जीवनाचे चित्रण नागर भूमिकेतून केलेले दिसते. संपूर्ण कादंबरीतून निसर्गवर्णने फारशी आढळत नाहीत. साध्या भाषेत, अलंकारांचा वापर न करता शृंगार रसाचाही मोह टाळून लेखकाने ही कादंबरी लिहिली आहे. माडिया जमातीतील अनेक वास्तववादी पैलू लेखकाने या कादंबरीत चित्रीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

थोडक्यात - आदिवासी हे डोंगरात, रानावनात, द-याखो-यामध्ये, दुर्गम अशा भागांमध्ये व पाण्याने वेढलेल्या बेटांवर राहतात. त्यामुळे प्रगत अशा नागर संस्कृतीशी त्यांचा संबंध क्वचितच येतो. त्यांचे विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य असते. प्रत्येक जमात ज्या भूप्रदेशावर राहते, त्यावर ते आपला हक्क सांगतात. अतिशय कमी लोकांचा हा समूह असतो. त्या एका समूहाची म्हणजे एका पाडयाची लोकसंख्या जास्तीत जास्त शे-दोनशेच्या दरम्यान आढळते. आपण सर्वजण एकाच पूर्वजांचे आहोत हा त्यांचा विश्वास असल्याने त्यांच्यात एकमेकांविषयी प्रेम, आपुलकी, आपलेपणा दिसतो. आदिवासींमध्ये कुटुंबातील सर्व घटक कामे करतात व आपला उदरनिर्वाह भागवितात. आदिवासींच्या बहुतेक सर्वच जमातींमध्ये युवागृहे आढळतात. प्रत्येक जमातीत त्यांना वेगवेगळी नावे आहेत. नागर संस्कृतीपेक्षा जोडीदार मिळविण्याच्या आदिवासींच्या पध्दती वेगळया आहेत. या जमातींमध्ये स्त्रियांना घटस्फोट व पुनर्विवाहास परवानगी असते. स्त्रियांना वधुमूल्यासकट सर्व खर्च पहिल्या नव-यास परत करण्याची अट आहे. पुरूषांना मात्र अशी अट नाही. त्यांच्यात बालविवाह क्वचितच होतात. आदिवासींमध्ये मुलाने मुलीला हुंडा देण्याची पध्दती आहे. निसर्गातील उपलब्ध असलेल्या वस्तुंच्या साहाय्याने आदिवासी आपल्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागवितात. शेती करणे, मासेमारी, शिकार, हस्तव्यवसाय व मजुरी अशाप्रकारचे व्यवसाय ते करतात. त्यांची आर्थिक स्थिती अतिशय

वाईट असते. आर्थिक बळ नसल्याने सण साजरा करण्यास तर कधी आलेल्या संकटातून बाहेर पडण्यास सावकार, दलाल यांचेकडून कर्ज काढतात. सावकार, दलाल यांचेकडून लुबाडले, फसविले गेल्याने ते सतत कर्जबाजारी असतात. त्यामुळे दारिद्र्य हे त्यांच्या पाचवीसच पुजल्यासारखे असते. असे हे आदिवासी होळी, दिवाळी इ. सण मोठया उत्साहाने साजरा करतात. दिवसभर कष्ट करतात व रात्रभर नाचतात. रूढी, परंपरा यांची जपणूक करतात. ते श्रध्दाळू, अज्ञानी, निरागस व नि:स्वार्थी वृत्तीचे आहेत. जादूटोणा, मंत्रतंत्र यावर त्यांचा विश्वास दिसतो. त्यांच्या देवदेवताही निसर्गाशी संबंधीत असतात. त्यांच्या न्यायव्यवस्था आर्थिक, धार्मिक व कौटुंबिक जीवनाशी निगडीत आहेत. जातपंचायतीचा निर्णय हा ते अंतीम निर्णय मानतात. जातपंचायतीचे निर्णयाचे, नियमांचे उल्लंघन केल्यास कडक शासन केले जाते. आदिवासींमध्ये अनेक जमाती आहेत. त्या जमातीमध्ये भाषेचे वेगळेपण आहे.

आदिवासींशी वेगवेगळया निमित्तांनी नागर लोकांचा संपर्क आला. त्यांचा अभ्यास केला जाऊ लागला. एकोणिसाव्या शतकात संशोधक, मिशनरी, व्यापारी यांनी शोधलेल्या समाजाकडे सामाजिक व राजकीय तत्ववेत्यांचे लक्ष वेधले गेले व आदिवासी लोकांच्या जीवनपध्दतीच्या अभ्यासास सुरूवात झाली. अनेक मानवशास्त्रज्ञांनी, समाजशास्त्रज्ञांनी आदिवासींचा अभ्यास केला.

पंचवार्षिक योजनेमधून आदिवासींच्या कल्ल्याणासाठी विविध कार्यक्रम योजण्यात आले. अनेक समाजसुधारकांनी आदिवासींच्या विकासासाठी व कल्याणासाठी प्रयत्न केलेले दिसतात. सद्यस्थितीतही अशा प्रकारचे प्रयत्न होत आहेत असे दिसते. आदिवासी साहित्य संमेलने, मेळावे यांचे माध्यमातून आदिवासींविषयी चर्चा केली जाऊ लागली. त्यामुळे आदिवासींच्या समस्या समजण्यास मदत होऊ लागली व आदिवासी साहित्यिकांनाही त्यामुळे प्रोत्साहन मिळाले. मराठी साहित्यात कविता, कथा, नाटके, एकांकिका, चरित्रे, कादंब-या या विविध माध्यमातून आदिवासींचे चित्रण केलेले दिसते.

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये आपण आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-यांचा अभ्यास करणार आहोत. त्यातील दुर्गा भागवत यांच्या **महानदीच्या तीरावर** व मधुकर वाकोडे यांच्या **झेलझपाट** या दोन कादंब-यांचा विशेष अभ्यास करणार आहोत. आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या पंधरा ते सोळा कादंब-या आहेत. त्यातील काही कादंब-याचा थोडक्यात आढावा घेता असे दिसते की या कांदब-या विशिष्ट हेतू मनात ठेवून लिहिल्या गेलेल्या दिसतात. जसे शं.रा. भिसे यांनी ' जंगलातील छाया ' या कादंबरीत, जंगलात राहणारे लोक जंगलाच्या व्यापारी वर्गाकडून कसे नाडले गांजले जातात याची माहिती दिली आहे. तर सहस्त्रबुध्दे यांनी ' पहिली सलामी ' या कादंबरीत

लालबावटयाखाली एकवटणारा व झुंजणारा वारली समाज चित्रीत केला आहे. गो.नी.दाण्डेकरांनी ठाकर जमातीतील अंधश्रध्दा प्रदर्शित करण्याच्या हेतूने ' जैत रे जैत ' ही कादंबरी लिहिली आहे. अनिल बर्वे यांनी ' डोंगर म्हातारा झाला ' या कादंबरीत ठाकरांवर होणा-या अन्यायाचे चित्रण केले आहे. साने गुरूजी यांनी ' शबरी ' या कादंबरीत भिल्ल जमातीतील स्त्रिच्या (शबरीच्या) भक्तीचे चित्रण करण्याच्या हेतूने भिल्ल जमातीचे चित्रण केलेले आहे. तर युध्दकथा चित्रीत करण्याच्या हेतूने गो.नी.दाण्डेकरांनी ' भिल्लवीर कालिंग ' ही कादंबरी ऐतिहासिक वातावरण निर्माण करून लिहिली आहे. महाभारतातील एकलव्याच्या कथेचा आधार घेवून पौराणिक वातावरण निर्माण करून आधुनिक विचार मांडण्याच्या हेतूने ' एकलव्य ' ही कादंबरी शरद दळवींनी लिहिली आहे. तर आदिवासींचे जीवन आता उध्वस्त होत आहे, नवनवीन योजनांमुळे व प्रयोगांसाठी आदिवासींची क्षेत्रे निवडल्याने आदिवासींची संस्कृती, त्यांचे जीवन धोक्यात आहे याचे चित्रण करण्याच्या हेतूने जगदीश गोडबोले यांनी ' पारधं ' ही कादंबरी लिहिली आहे.

थोडक्यात आदिवासी जीवनाचे चित्रण करावे हा हेतू डोळयापुढे ठेवून आदिवासी जीवनाचे चित्रण करणा-या कादंब-या विशेष लिहिल्या गेलेल्या दिसत नाहीत.

**************

## संदर्भ टीपा


1. स.मा.गर्गे (संपा.), **भारतीय समाजविज्ञान कोश** (खंड 1), संचालक, समाजविज्ञान मंडळ, पुणे, 1986, पृ.220.
2. वि.भि.कोलते (संपा.), **लीळा चरित्र** (पूर्वार्ध लीळा क्र.41), सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, 1982, पृ.39.
3. स.मा.गर्गे (संपा.), उ.नि. पृ.220.
4. तत्रैव, पृ. 220
5. य.दि.फडके (संपा.), **महात्मा फुले समग्र वाङ्मय,** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई (आवृत्ती पाचवी) 1991, पृ.543.
6. गोविंद गारे, **आदिवासी विकासाचे शिल्पकार,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 1991, पृ.1.
7. ग.शा.पंडीत, आदिवासी साहित्याविषयी प्रा. सरदारांची भूमिका, **हाकारा**, रामचंद्र मुटाटकर (संपा.), वर्ष - अकरावे, अंक चौथा, आक्टो - डिसें. 1990, पृ.27.
8. ग.शा. पंडीत, आदिवासी साहित्याची वाटचाल - शोध आणि बोध, **हाकारा,** रामचंद्र मुटाटकर (संपा.), वर्ष बारावे, अंक पहिला-दुसरा, जाने-जून 1991, पृ.55.


*************

# प्रकरण तिसरे : महानदीच्या तीरावर कादंबरीचे विशेष.

## ।। महानदीच्या तीरावर कादंबरीचे विशेष ।।

**प्रस्तावना** ... प्रकरण दोनमध्ये आपण आदिवासींचे जीवन, त्याविषयीच्या अभ्यासाची ओढ साहित्यिकांना कशी लागली, आदिवासी साहित्य चळवळीस झालेला प्रारंभ, मराठी साहित्यात विविध वाङ्मय प्रकारातून केलेले आदिवासींचे चित्रण ह्या गोष्टी पाहिल्या. तसेच आदिवासी जीवनावरील लिहिल्या गेलेल्या काही कादंब-यांचा थोडक्यात परामर्शही घेतला आहे.

प्रस्तुत प्रकरणात दुर्गा भागवत यांनी लिहिलेल्या **महानदीच्या तीरावर** (1953) या कादंबरीचे विशेष पाहाणार आहोत. सातपुडा पर्वतातील रायपूर जिल्ह्यातील पायरी या गावात राहणा-या गोंड जमातीचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत दुर्गा भागवत यांनी केले आहे.

**महानदीच्या तीरावर या कादंबरीची आशयसूत्रे** ...

गोंड जमातीच्या जीवनाचे, त्यांच्यातील चेटूक, भूतबाधांबद्दलच्या अंधश्रध्दा, समजुती, त्यांच्या परंपरा व रूढी यांचे चित्रण प्रस्तुत कादंबरीमधून दुर्गा भागवत यांनी केले आहे. त्याबरोबर फूलिया या गोंड स्त्रीची शोकांतिका लेखिकेने चित्रीत केली आहे. तसेच गोंड या आदिवासी जीवनाचे चित्रणही लेखिकेने येथे केले आहे. त्यानुसार कादंबरीतील घटना प्रसंगांचे चित्रण त्यांनी प्रस्तुत कादंबरीत केलेले दिसते. प्रसंगांमधून, घटनांमधून लेखिका गोंड स्त्री-पुरूषांच्या स्वभावाचे, त्यांच्यातील अंधश्रध्दांचे, समजुतींचे चित्रण करण्याचा प्रयत्न करतात. सातपुडयात हिंडताना दुर्गा भागवतांनी शास्त्रीय जिज्ञासा जागृत ठेवून गोंडांची, आदिवासींची माहिती मिळविली होती. त्यामुळे ते जीवन त्यांना जवळून पाहता आले. त्यांनी त्यांचे जीवन, त्यातील गुंतागुंत, त्यांच्या रूढी-परंपरा, समजूती या गोष्टी नीट समजून घेतल्या. शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करण्या-या दुर्गा भागवतांना ' साधनेसाठीं गोंडांच्या जीवनावर सुंदर असें कांहीं लिहा ' (पृ.3) अशी प्रेरणा साने गुरूजींनी दिली व या प्रेरणेतूनच दुर्गा भागवत यांनी ही कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासींमधून हिंडत असताना आदिवासींच्या कर्मकथा त्यांनी ऐकल्या आहेत. त्या कथांमधील एक कथा प्रस्तुत कादंबरीत चित्रीत केली आहे. पायरी या गावाजवळ स्मशान आहे. स्मशानाजवळ एक डोह आहे. ' त्या डोहांत जे नारळ पडत ते सारे फूलियाच्या नांवानें. तिच्या दगडाजवळ जाणार कोण ? क्रूर जखीण फूलिया कधींहि कुणावर प्रसन्न झाल्याचें कुणीं ऐकलें नव्हतें. ती सदा पेटलेली असे. माणसांवर सूड उगवावा तेवढा थोडाच, असा तिचा बाणा असल्याचें सारे सांगत. कोण ही फूलिया ?

12386
A

कोणाहि मांत्रिकाच्या कह्यांत न राहणारें हें पिशाच्च आहे असा लौकिक मिळवणारी ही फूलिया. कशामुळें ती अशी बनली किंवा तिच्याबद्दलचा असा समज लोकांत पसरला ? मोठी मनोरंजक आणि अति करूण कथा आहे ती. ' (पृ.४) ही कथा लेखिका या कादंबरीत चित्रीत करताना दिसतात. अदृश्य आत्म्यांच्या भितीने त्रस्त झालेल्या गोंडांचे जीवन पाहून दुर्गा भागवतांचे मन कळवळते. तेच गोंड जीवन चित्रीत करताना त्यांचा शास्त्रीय काटेकोरपणा काही ठिकाणी जरी जाणवला तरी ते जीवन, त्यांच्या जीवनातील अद्भुतता, चेटूक, भूतबाधा, मंत्रतंत्र इ. चित्रीत करताना काही एक प्रमाणात वास्तवरूप प्राप्त झाले आहे असे दिसते. दुर्गा भागवतांनी प्रस्तुत कादंबरीत फूलियाची कहाणी सांगत गोंड जमातीचे जीवनचित्रण केले आहे.

**फूलियाच्या कुटुंबाचे स्वरूप ...**

दुर्गा भागवत यांच्या **महानदीच्या तीरावर** या कादंबरीची नायिका फूलिया होय. या फूलियाभोवती कादंबरीचे सर्व कथानक फिरते आहे याची जाणीव ही कादंबरी वाचताच होते. अशा या फूलियाच्या कुटुंबाचे चित्रण दुर्गा भागवत यांनी कसे केले आहे याचा लग्नापूर्वी तिच्या कुटुंबातील माणसे, लग्नानंतर (सासरी) तिच्या कुटुंबातील माणसे, त्यांची आर्थिक स्थिती, तिचा पती, त्याचे वर्तन, बेलाचे (जाव) तिचेशी वागणे या मुद्यांचे साहाय्याने परामर्श घेवू.

सातपुडयाच्या खो-यात रायपूर जिल्ह्यातील पायरी या गावी जी गोंड जमात राहते त्या जमातीतील फूलिया ही गोंड युवती होय. फूलिया दिसण्यास ओबडधोबड, दगडी खांबासारखी व भारदस्त. पायरी या गावातील गोंड जमातीतील घनियाची ती मुलगी. घरात तिचा भाऊ, वडील व आई ही तीन माणसे आहेत. घनिया फूलियाचे लग्न जंगोशी लावते. त्यानंतर फूलियाचे वडील घनियास काडीमोड देतात व दुसरी पत्नी करतात. घनिया तिच्या भावाकडे मडई या गावी जाऊन राहते व तेथेच मरते.

फूलियाला लग्नानंतर दोन-तीन मुले होतात. पण ती जगत नाहीत. नंतर सिंगा नावाचा मुलगा होतो. लग्नानंतर तिचे घरात तिचा पती जंगो, जाव बेला, मोठा दीर भीमा व जावेच्या (बेलाच्या)मुली व सिंगा अशी माणसे होती. फूलियाचा पती घरामध्ये कोणतेही काम करीत नाही. भीमा कुटुंबाची आर्थिकदृष्टया सर्व जबाबदारी सांभाळीत असतो. फूलियाचा पती जंगो बासरी वाजवणे व बेला सांगेल तसे वागणे याशिवाय दुसरे कोणतेही काम करीत नाही. जंगो व बेला यांचे लग्नापूर्वी प्रेम असते. पौषातील पौर्णिमिदिवशी जंगोने फूलियाचे गळयात ढोल घालून तिला नाचावयास सांगितले होते. फूलिया चंद्र अस्ताला जाईपर्यंत ढोल वाजवते व नाचते. फूलिया अशात-हेने जंगोने

रात्रभर नाचावयाचे केलेले आव्हान पूर्ण करून जंगोस पराभूत करते. जमातीचे निर्णयानुसार जंगो व फूलिया यांचे लग्न होते. अशात-हेने जातपंचायतीचे निर्णयानुसार फूलियावर प्रेम नसतानाही जंगोस फूलियाबरोबर लग्न करावे लागते. खरेतर बेलाचे जंगोवर प्रेम असते त्यामुळे बेला डावपेच खेळते. भीमाबरोबर बेला लग्न करते. दोन्ही पुरूषांना (जंगो व भीमा) आपल्या ताब्यात ठेवते. त्यामुळे बेला जसे सांगेल तसेच घरातील सर्व घटक वागत असतात. जंगोस बेला दारूबरोबर वेश्यांकडे जाण्याचा नादही लावते. जंगो दारूच्या व्यसनात डुंबतो व त्यातच मृत्यू पावतो. बेला फूलियाचा शारीरिक, मानसिक छळ करते. फूलियास झालेला मुलगा नाळ-वारीसह आपल्या पदरात घेते. तिचा मुलगाही तिच्याकडून हिसकावून घेते. फूलिया बेलाच्या असूया वृत्तीस बळी पडते. सर्वजण फूलियाला चेटकीण म्हणून संबोधतात. जंगोच्या मृत्यूनंतर फूलियाच्या जीवनाची वाताहत होते. चेटकीण म्हणून संबोधल्या गेलेल्या फूलियाला खरोखरची आत्महत्या करून मरावे लागते. जिवंत होते ते आपले पिशाच्च नव्हते हे दाखवून द्यावे लागते.

थोडक्यात - फूलियाचे घरात तिचे लग्नापूर्वी (माहेरी) तिची आई, वडील व भाऊ अशी तीन माणसे असतात. तिचे लग्नानंतर (सासरी) तिचा पती, मुलगा सिंगा, जाव व जावेचा पती भीमा (दीर), जावेच्या तीन मुली अशी माणसे तिच्या कुटुंबात राहतात. आर्थिक जबाबदारी भीमा सांभाळतो. जंगो मात्र बासरी वाजवणे, दारू पिणे व बेला सांगेल तसे वागणे एवढेच काम करतो. फूलियास पतीकडून प्रेम मिळत नाही. बेला मोठी जाव या नात्याने छळते. फूलियास सर्व चेटकीण म्हणतात. जंगोचे मृत्यूनंतर तिच्या जीवनाची वाताहत होते. शेवटी तिला आत्महत्या करावी लागते.

**जंगोच्या कुटुंबाचे स्वरूप ...**

या कादंबरीतील फूलियेचा पती जंगो होय. जंगोचे कुटुंबात त्याचे वडील, मोठा भाऊ भीमा राहतात. भीमा शेतीची सर्व कामे करून प्रपंच चालवत असतो. जंगो बासरी वादन करतो. त्यामुळे गोटुलातील सर्व स्त्रियांचा तो आवडता असतो. घरातील कोणत्याही कामात तो रस घेत नाही. फूलियाची चेष्टा करण्यात मात्र त्यास धन्यता वाटत असते. पौषी पौर्णिमेला तिच्या गळयात ढोलके अडकवून तिला वाजविण्यास सांगतो. जंगोची ही आज्ञा शिरसावंद्य मानून फूलिया ढोलके वाजवून पहाटेपर्यंत नाचते. त्यामुळे जंगोचा पराभव होतो. जातपंचायतीच्या निर्णयानुसार व बेलाच्या सांगण्यावरून जंगो फूलियाचा पत्नी म्हणून स्वीकार करतो.

लग्नानंतरही जंगो भीमास शेतीच्या कामात हातभार लावीत नाही. बेलास बासरी वाजवून

दाखविणे, फूलियाचा छळ करणे, तिला टोचून बोलणे, दारू पिणे व कलारणींच्या संगतीत वेळ घालवणे एवढाच उद्योग तो करतो. फूलियाकडून सिंगा हा वंशाचा तंतू (मुलगा) मिळताच तो तिच्याकडे ढुंकूनही पाहत नाही. घरी मुलाच्या सोबत व रात्री कलारणींचे घरी दारू पिऊन, धुंद होऊन बासरी वाजविण्यात तो रंगून जातो. दारू पिऊन पिऊन शेवटी आठ एक वर्षांनी जंगो जलोदराने आजारी पडतो. फक्त स्वतःचाच विचार करणारा, स्वार्थी व व्यसनी जंगो लेखिकेने रेखाटला आहे तो खरा कलावंतही आहे. फूलिया आजारपणात त्याची मनापासून सेवा करते. तिने आपल्यावरील केलेल्या एकनिष्ठ प्रेमाची पोहोचपावती शेवटी का होईना तो देतो व बरा झाल्यानंतर स्वतंत्र संसार करण्याची इच्छा फूलियापाशी व्यक्त करतो. शेवटी या आजारपणातच तो मृत्यू पावतो.

थोडक्यात - जंगोचे कुटुंबात त्याचे वडील, पत्नी फूलिया, मोठी भावजय बेला, त्याचा मोठा भाऊ भीमा व त्याच्या तीन मुली व जंगोचा मुलगा सिंगा एवढी माणसे राहतात. जंगोचे प्रपंचामध्ये अजिबात लक्ष नसते. बेला सांगेल तसे वागतो. दारू व कलारणी यांच्या संगतीत दिवस घालवतो. भीमास शेतीमध्ये मदत करीत नाही. त्यामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी एकटा भीमा सांभाळतो. फूलियाचा (पत्नीचा) छळ करतो. शेवटी जलोदराने आजारी पडतो व त्यातच मरतो.

**गोंड लोकांच्या जीवनाचे चित्रण ...**

दुर्गा भागवत यांनी **महानदीच्या तीरावर** या कादंबरीत गोंड जीवनाचे चित्रण केले आहे. गोंडांचे दारिद्रय, गोटुल, विवाहपध्दती, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, जातपंचायत या मुद्यांचे आधारे त्यांनी प्रस्तुत कादंबरीमध्ये गोंड जीवनाचे चित्रण केले आहे.

**दारिद्रयाचे चित्रण ...**

दुर्गा भागवत सातपुडयात शास्त्रीय जिज्ञासा जागृत ठेवून फिरत होत्या. तेव्हा गोंडांच्या अंतरंगाचे दर्शन त्यांना घडले. " पुष्कळ भागांत लढाईपूर्वीच्या त्या ' सुबत्ते ' च्या काळींहि आदिवासी तीन दिवसांतून एक वेळ व तेंहि अर्धपोटीं जेवून जगलेले पिढयानुपिढया मी पाहिले. वरणभाताचें ' 'नवलपरीचें ' अन्न पुष्कळांना चाखायला मिळणें दुरापास्त होतें." (पृ.4) या विवेचनातून आदिवासींना पोटाचे खळगे भरण्यास तीन-तीन दिवस अन्नही मिळत नव्हते, उपाशी रहावे लागत होते हे लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात. जेवायलाच अन्न नाही तर पक्वान्न त्यांना कुठले मिळायला ? यातून लेखिका आदिवासींच्या दारिद्रयावर प्रकाश टाकतात. सातपुडयात फिरतांना ' अंगांत घालायला कपडे नाहींत. म्हणून आईच्या कुशींत तोंड खुपसून रात्रभर शेकोटीकडे पाठ करून निजल्यामुळें भाजून भेगा पडून कोळशासारखी काळी आणि राठ पाठ झालेलें वर्षभराचें अर्भक ' (पृ.3) लेखिकेने पाहिले. यातून लेखिका आदिवासींच्या हालाखीच्या परिस्थितीचा उल्लेख करतात.

तसेच थंडीवा-यापासून संरक्षण होईल असा पुरेसा कपडासुध्दा आदिवासींना मिळत नाही हे त्या निदर्शनास आणतात. या सर्व गोष्टींचा उल्लेख लेखिका कादंबरीपूर्वी ' दोन शब्द ' लिहितांना करतात.

प्रस्तुत कादंबरीमध्ये लेखिका गोंड स्त्रियांच्या पोशाखाचे वर्णन करतात. पौषातील पौर्णिमेच्या दिवशी नृत्य करण्यास गोटुलात सर्व कुमार-कुमारिका जमलेल्या होत्या. तेव्हा त्यांच्या अंगावरील पोशाखाचे वर्णन लेखिका करतात, ' कुमारिका आपलीं मळकीं पण मुळचीं पांढ-या रंगाचीं, गुढघ्यापर्यंत येणारीं लुगडीं नेसल्या होत्या. अंगांत चोळया नव्हत्या. पदर एका खांद्यावरून घेऊन कमरेला खोंचलेले होते. पण त्यांचीं वक्षस्थळें मण्यांच्या जाडजूड सरांनीं झांकून गेलीं होतीं. ' (पृ.११) या वर्णनातून लेखिका गोंड स्त्रियांना स्वतःचे अंग झाकण्यास पुरेसा कपडासुध्दा मिळत नव्हता यावर प्रकाश टाकतात, तसेच गोंडांच्या दारिद्रयाचे दर्शन वाचकांना घडवितात.

थोडक्यात - गोंडाना तीन-तीन दिवस पोटाचे खळगे भरण्यास अन्न मिळत नाही. शरीर झाकण्यास पुरेसा कपडाही मिळत नाही.

**गोटुलाचे चित्रण ...**

दुर्गा भागवत ज्याप्रमाणे गोंडांच्या दारिद्रयाचे चित्रण करतात तद्वतच गोटुलाचे वर्णन करतात.

आदिवासींच्या बहुतेक सर्वच जमातींमध्ये युवागृहे आढळतात. जमातीतील कुमार-कुमारिकांना एकत्र राहण्याची सोय येथे केलेली असते. गोंड जमातीत याला ' गोटुल ' असे म्हणतात. या गोटुलाचे वर्णन लेखिका करतात - ' गावाच्या एका टोकाला ही जागा होती. दोन समोरासमोर प्रशस्त झोंपडया आणि मध्यें स्वच्छ झाडलेली अंगणाची चौरस पट्टी होती. ' (पृ.११) गोटुल जमातीपासून दूर ठिकाणी असते. या विवेचनातून लेखिका गोटुलाचे वर्णन करतातच, शिवाय लग्नापूर्वी गोंड कुमार-कुमारिकांना गोटुलात रहावे लागते या गोंडांच्या रिवाजावरही त्या प्रकाश टाकतात. गोटुलाचा संबंध लग्नापूर्वीच असतो. ' लग्न झाल्यापासून जंगोचें गोटुलांतले बसणें उठणें थांबलें ....... लग्नामुळें त्याची गणना आतां वडीलध्या-या संसारी माणसांत होती. ' (पृ.24) या उल्लेखातून गोंड युवक युवतींना लग्नानंतर गोटुलाशी संबंध ठेवता येत नाही. त्यांना गोटुलात राहता येत नाही. या गोंडांच्या रिवाजावर लेखिका प्रकाश टाकतात.

**विवाहपध्दतीचे चित्रण ...**

आदिवासींमध्ये जोडीदार मिळविण्याच्या अनेक पध्दती आहेत. ' पौषाच्या पौर्णिमेचा उत्सव म्हणजे गोंडांचा मदनोत्सव. तरूण तरूणींनीं आपलीं नवीं नातीं या दिवशीं जोडायचीं आधीं जोडलेलीं

असलीं तर तीं विवाहग्रंथीनें कधीं कायमचीं पक्कीं केलीं जातील याची ओढ तरूण तरूणींना लागलेली असायची. सारीं जोडपीं यावेळीं प्रणयानें धुंद झालेलीं असायचीं. तर काहींच्या मनांत निराशेचीं वादळें उठायचीं. प्रतिपदेच्या पहाटेबरोबर नाच थांबला कीं मग प्रत्येकाला आपल्या परिस्थितीची जाणीव व्हायची. या पौणिमेचा नाच प्रत्येकानें नाचलाच पाहिजे असा जातीचा दंडक होता. आणि मग प्रतिपदेला गांवभोजनांत प्रेमसूत्रानें बध्द झालेल्यांचें शुभ चिंतन गांवचीं वडील माणसें करीत. आदल्या दिवशींच्या सा-या तक्रारींची नोंदहि याचवेळीं होई. ' (पृ.15) या विवेचनातून लेखिका गोंडांच्या विवाहपध्दतीवर प्रकाश टाकतात. पौषातील पौणिमेच्या रात्री होणा-या नाचात युवक युवतींनी भाग घेतलाच पाहिजे. या त्यांच्या परंपरेवर, रूढीवर लेखिका प्रकाश टाकतात. नाचाचेवेळी युवक युवती एकत्र येतात तेथे त्यांचे प्रेमसंबंध जुळून येतात. आधी जुळलेल्या प्रेमसंबंधांना यादिवशी विवाहबध्द केले जाते. प्रतिपदेला म्हणजे पौणिमेच्या दुसरे दिवशी गांवभोजन घातले जाते. गावभोजनाचेवेळी विवाहबध्द झालेल्या जोडप्यांना पुढील वैवाहिक आयुष्य सुखी, समृध्द व्हावे यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जातात.

थोडक्यात - पौषातील पौणिमेरात्री गोंडांचे विवाह जुळतात (ठरतात) व विवाह होतात दुसरे दिवशी विवाहानिमित्त गावभोजन घालतात. अशी गोंडांची विवाहपध्दती लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात.

**अंध्दश्रध्दा, रूढी, परंपरांचे चित्रण ...**

प्रस्तुत कादंबरीमध्ये दुर्गा भागवत यांनी जसे गोंडांचे दारिद्रय, गोटुल तसेच विवाहपध्दती यांचे चित्रण केले आहे. तद्वतच गोंडांच्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरांचे चित्रणही केले आहे.

गोंडांची लिंगोदेवावर श्रध्दा आहे. या लिंगोदेवाचे वर्णन लेखिका करतात. ' लिंगोदेव संगीताचा प्रणेता. वेळूच्या वीतभर तुकडयांत फुंकर मारून बांसरीचें संगीत त्यानेंच निर्माण केलें. नदीकांठच्या झुलत्या लव्हाळयांतूनहि तो सहज जाता जातां गीतें उत्पन्न करायचा. पाखरांच्या आवाजांतलें सारें माधुर्य आणि चढउतार त्याच्या रंगेल बांसरींत असायचे. त्या लिंगोदेवाचा साक्षात्कार गोटुलांतल्या कुमारांना मोठा धन्यतेचा वाटे. ' (पृ.8) बासरीतून विविध प्रकारची धून ज्यास काढता येते, ज्याच्या बासरीतील आवाजातून रंगेल व मधुर सूर बाहेर पडतात, त्याला ही कला लिंगोदेवामुळे प्राप्त होते असा गोंडांचा विश्वास आहे. हा लिंगोदेव आहे केवढा ? व त्याचा साक्षात्कार कोणास होतो याचेही वर्णन लेखिका करतात - ' लिंगोचें रूप बारा वर्षांच्या कुमाराचें. लिंगो बारा वर्षांवरच्या कुठल्याहि माणसाला दिसत नसे. स्त्रीला तर केव्हांच तो दिसायचा नाहीं. स्त्रियांचा तो द्वेष्टा होता.

स्त्रियांच्या प्रेमांत सांपडलेल्या कुमारांनाही तो दिसत नसे. ' (पृ.9) या विवेचनातून लिंगादेवाविषयी गोंडांचे असलेले समज लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात. जंगोस लिंगोदेवाचा साक्षात्कार तो बारा वर्षाचा असतानाच झाला होता. जंगो दुपारी नदीकांठी गुरांना घेऊन गेला होता तेव्हा पाण्यावर अधांतरी नाचत व बासरी वाजवत असणारा लिंगोदेव जंगोस दिसला होता. तेव्हापासून लिंगोदेव रानपाखरांच्या रूपात हितगूज करायचा व बोलायचा. जंगोस बासरी वादनाची कला अवगत होती. ही कला लिंगोदेवामुळेच त्यास प्राप्त झाली आहे, अशी त्यांची समजुत होती व लिंगोदेवावर श्रध्दा होती. लिंगोदेवाच्या नादास जो लागतो त्याचे चांगले होत नाही असाही समज आहे. जंगो जलोदराने आजारी पडतो. त्याचा मुलगा सिंगा वडिलांची बासरी चोरून नेवून वाजवतो. जंगोस हे समजते त्यावेळी तो आपल्या मुलास म्हणतो - ' पोरा, मला तो दिसला आणि माझं वाटोळं झालं. टाक ती बांसरी. भीमाकाका करतो तसं काम तूं कर. तुझ्या सख्ख्या आईला संभाळ. मी या नादाने पिसा झालों. तुझी आई, तिला कसलं सुख म्हणून मिळालं नाहीं. तें तूं तिला दे, पोरा, या नादानें कुणाचं कल्याण झालं नाहीं. त्या नदीवरच्या पोराला विसर. त्याला विसरतो त्याचं कल्याण होतं. त्याच्या मागून जातो, तो गोते खातो. आण ती बांसरी. ज्याचे ओठ या बांसरीला लागतात, ते गाण्याचे मंजुळ स्वर काढतात, पण नेहमींच्या बसण्याबोलण्यांत अपवित्र, उद्दाम शब्दाशिवाय, पोकळ बढायाशिवाय शब्दहि त्यांतून निघत नाही.' (पृ.42) गोंडांची लिंगोदेवावर श्रध्दा आहे. परंतु त्याच्या नादास लागणा-या माणसास गर्व चढतो. त्या गर्वामुळे माणसाच्या बोलण्यात असभ्य भाषा येते. स्वतःच्या स्वानुभवातून जंगो आपल्या मुलास काकासारखा शेतामध्ये काम कर असा सल्ला देतो. कोणताही अती नाद हा वाईटच असतो. गोंडांना हे समजत नाही. जंगो बासरी वाजविण्यातच आपला सर्व वेळ घालवतो. कोणताही धंदा करीत नाही. बासरी वादनाच्या नादातच रमतो. त्यामुळे कोणताही कामधंदा न केल्याने त्याचे कल्याण होत नाही. परंतु गोंड लिंगोदेवाचे नादास लागल्यामुळे अकल्याण होते असे समजतात. यातून त्यांचे अज्ञान व अंधश्रध्दा लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

फूलियास लग्नानंतर मुले होतात. पण जगत नाहीत. तेव्हा बेला तिला म्हणते ' तूझी कूस अपेशी आहे. ' (पृ.34) बेलाला लागोपाठ तिन्ही मुलीच होतात. फूलियाचे पायगुणामुळेच मुली होतात असे तिला वाटते. या उल्लेखातून गोंडांमध्ये पायगुण चांगला, वाईट असणे याप्रकारच्या अंधश्रध्दा दिसतात. बेलाला तीन मुलीच होतात व फूलियाची मुले जगत नाहीत, वंशाला दिवा हवा म्हणून फूलिया गरोदर राहताच बेला सिंगीबाबाला-ऋष्यशृंग मुनींना नवस करते. मुलाचे नांव सिंगा ठेवू असे म्हणते. बेला फूलियास म्हणते, ' आता तरी शहाणी हो.

मुलासाठी मी सिंगीबाबाला नवस केला आहे. तें वाचावंसं वाटत असलं तर माझ्या ओटींत घाल. ' (पृ.34) या विवेचनातून लेखिका गोंडांचा नवससायासावर असलेला विश्वास वाचकांच्या निदर्शनास आणतात. फूलियास मुलगा होतो, त्याला नाळवारीसह बेलाच्या ओटीत टाकते. ' त्यानंतर केवळ पिण्यापुरतेंच तें मूल बेला तिच्या स्वाधीन करी आणि लगेच दृष्ट काढून त्याला तिथून पलीकडे नेई.' (पृ.34) या उल्लेखातून लेखिका गोंडांमध्ये, दृष्ट लागणे व दृष्ट काढणे हे अंधविश्वास आहेत. या गोष्टीवर प्रकाश टाकतात.

जंगलातून पायरी या गावी जाताना एक डोह लागतो. त्या डोहाकडून जाण्यास लोक भरदुपारीसुध्दा भितात. कारण ' कुणी सांगे कीं रात्रीं वेताळाची स्वारी डोहांतून वर येते. कुणी म्हणे अमावास्या पौर्णिमांना नग्न चेटकिणी डोकीवर दिवे घेऊन तिथें नाचतात. या जागेबद्दलचें भय इतकें थरारून उठण्याचें कारण म्हणजे त्याच्या कांठीं असलेलें तें जुनें स्मशान. ' (पृ.6) या स्मशानात फूलिया या चेटकिणीचे भूत आहे. तिने भूतांचा राजा वेताळ यालाही आपल्या कबजात घेतले आहे. 'क्रूर जखीण फूलिया कधींहि कुणावर प्रसन्न झाल्याचें कुणीं ऐकलें नव्हतें. ती सदा पेटलेली असे. माणसांवर सूड उगवावा तेवढा थोडाच, असा तिचा बाणा असल्याचें सारे सांगत. .......... कोणाहि मांत्रिकाच्या कह्यांत न रहाणारें हें पिशाच्च आहे. ' (पृ.8) वरील सर्व उल्लेखावरून लेखिका गोंडांच्या मृतात्म्यावरील विश्वासाचे दर्शन घडवितात. हे मृतात्मे माणसांना त्रास देतात. या मृत आत्म्यांना काही देणे दिल्यास ते आपणास त्रास देणार नाहीत. असाही गोंडांचा समज आहे. म्हणूनच ' 'जंगलांतल्या त्या बाजूनें जो जो वाटसरू जाई तो तो त्याला नारळ, सुपारी कांहींतरी देई आणि मगच पुढें जाई. ' (पृ.6) लेखिका गोंडांच्या या अंधविश्वासावर प्रकाश टाकतात. जीव दिला (आत्महत्या केली) की माणूस भूताचे जन्मास जातो अशी गोंडांची समजूत आहे.

वरील सर्व विवेचनातून गोंडांचा मृतात्म्यावरील विश्वास तसेच मृत आत्म्यांना संतुष्ट करण्यास नारळ, सुपारी इ. देणे या अंधश्रध्दा दिसून येतात.

मृतात्म्यांवरील, भूताखेतांवरील विश्वासाबरोबरच गोंडांचा चेटूकविद्या, मंत्रतंत्र यावरही विश्वास दिसतो. पौषी पौर्णिमेला जंगो फूलियाचे गळयात ढोलके अडकवितो व तिला ते वाजविण्यास सांगतो. फूलिया रात्रभर ढोलके वाजवून नाचते ' फूलियाचा पौषाच्या रात्रींतला तो विक्रम म्हणजे तिच्या चेटूक विद्येंतलीच एक सिध्दी आहे अशी अफवा उठली. कुणीतरी भूतमात्र, चेटकीण प्रसन्न असल्याशिवाय जंगोसारखा हिरा तिला असा मिळवितां आला नसता. एवढेंच नाहीं तर फूलियाचें अंत:करण अति दुष्ट आहे म्हणूनच ती इतकी अबोल आहे, चेटक्यांच्या चेल्यांना मूकव्रतच फार

GARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

कसोशीनें पाळावें लागतें. ' (पृ.31) या उल्लेखातून गोंडांचा चेटूक विद्येवर विश्वास आहे यावर लेखिका प्रकाश टाकतात. शिवाय चेटूक विद्येसाठी मूकव्रत व पातिव्रत्य सांभाळावे लागते या गोंडांच्या समजावरही प्रकाश टाकतात. " प्राण असा घुटमळतो आहे. याला आधींच कुणी तरी करणी केली आहे. त्याशिवाय असं व्हायचं नाहीं. " असे म्हणून गुणियानें एक अर्थपूर्ण कटाक्ष फूलियाकडे टाकला. जंगोचें शेवटल्या दिवसांतलें सारेंच वर्तन इतकें बदललें होतें कीं हा आरोप कुणाला खोटा वाटणार ? चेटकिणी अखेर आपल्या बळीला आपलेसें करून घेतात तसाच फूलियानें जन्मभर त्याचा पिच्छा पुरवून त्याला अखेर आपलेसें केलें होतें. (पृ.47) गोंड लोकांचा चेटूक चेटकीण अशा गोष्टींवर श्रध्दा कशी असते, एखादी कुरूप दिसणारी स्त्री चेटकीण असू शकते, चेटूक करण्याची शक्ती माणसांना प्राप्त होत असते आणि अशाप्रकारचे चेटूक भयानक घातक असते असेही गोंडांना वाटत असते इत्यादी गोष्टींचे चित्रण येथे येते. प्राण घुटमळतो याचा अर्थ गोंड कुणीतरी करणी, चेटूक केले आहे असा घेतात. फूलिया जंगोची आजारपणात सेवा करते. तिच्या आपल्यावरील प्रेमाची कल्पना आल्यानेच जंगो तिचेशी शेवटी खूप प्रेमाने वागतो. ही खरी वस्तुस्थिती असते. परंतु चेटकीण म्हणून संबोधल्या गेलेल्या फूलियाला कोणीही समजून घेत नाहीत. जंगो फूलियाशी चांगला वागला याचा अर्थ चेटकिणीने (फूलियाने) आपल्या चेटूक विद्येनेच त्याला आपलेसे करून घेतले आहे असा गोंड लोक घेतात हे दिसते.

संध्याकाळचे आत प्राण गेला नाही तर ती व्यक्ती भूताचे जन्मास जाते. या गोंडांच्या समजावरही लेखिका प्रकाश टाकतात. जंगोचा जीव संध्याकाळपूर्वी जाण्यासाठी गुणिया भाताची कांजी मंतरतो व त्यात दोन आणेल्या टाकतो. जंगोस पिण्यास देतो हा सर्व भयानक प्रकार पाहून फूलिया बेशुध्द पडते. आणेली घशात अडकून जंगोचा प्राण जातो. ' जंगोचा प्राण गेला त्याचक्षणीं एक चमत्कार घडला. मृत्युदूतच असे छोटे काळे दहावीस चिराल पक्षी कुठूनसे चिरचिर असा आवाज करीत त्या घरांत शिरले. तीन चार फे-या त्यांनीं प्रेताभोंवतीं घातल्या आणि मग आल्याप्रमाणेंच झपाटयानें ते उडून नाहींसे झाले. ' (पृ.48) या घडलेल्या चमत्काराचा अर्थ गुणिया लावतो. बेशुध्द फूलियाकडे पाहून तो म्हणतो - ' आला ना करणीचा प्रत्यय तुम्हाला ? रावणाच्या भोवतीं असेच हे पक्षी फिरले होते........ मंत्रामुळे चेटकाची शक्ति भंगली, हें दाखविण्यासाठींच ते आले होते.... ज्याचं चेटूक त्याच्यावर उलटलं आहे. तेवढं विसरूं नका म्हणजे झालं. ' (पृ.49) या सर्व विवेचनातून लेखिका गोंडांचा मंत्रतंत्रावरील व गुणियावरील विश्वास वाचकांच्या निदर्शनास आणतात. या प्रसंगातून लेखिका अद्‌भुतरम्य, गूढ वातावरण निर्माण करतात.

बेशुध्द पडलेल्या फूलियास ती मेली म्हणून गोंड लोक स्मशानात नेतात. चेटकीण मृत्यू पावल्यानंतर ती भूत बनते असा गोंडांचा विश्वास आहे. ती भूत बनू नये म्हणून गोंडांमध्ये विधी केला जातो. हा विधी केल्याने चेटकीण भूत होत नाही अशी त्यांची श्रध्दा आहे. या श्रध्देमुळेच फूलियाच्या मृत्यूनंतर ती भूत होऊ नये म्हणून मांत्रिकाला भरपूर देणगी (बिदागी) देवून भीमा विधी करतो.

दुर्गा भागवत प्रस्तुत कादंबरीत ज्याप्रमाणे गोंडांच्या अंधश्रध्दांचे चित्रण करतात तद्वतच गोंडांच्या रूढी, परंपरावरही प्रकाश टाकतात.

गोंडांमध्ये गोंड युवक-युवती गोटुलात राहतात. पौषी पौणिमिला ते गोटुलात रात्रभर एकत्र नाचतात. तेव्हा तेथे त्यांचे विवाह जुळतात व जुळलेले विवाह होतात. दुसरे दिवशी प्रतिप्रदेला विवाहबध्द झालेल्यांना शुभेच्छा देवून गावभोजन होते. गोंडांमध्ये गोंड युवक युवतीस फणी भेट देतो. लेखिका लिहितात - गोंड स्त्रियांच्या ' डाव्या कानावर केसांत लांकडी बारीक फणी प्रत्येकीनें खोंचलेली होती. हेंच त्यांचे कौमार्य चिन्ह. लग्नानंतर ही फणी लोखंडी पत्र्यानें मढविली जायची. ' (पृ.11) या सर्व उल्लेखातून लेखिका गोंडांच्या रूढी परंपरांचे दर्शन वाचकांना घडवितात. बेलाचे जंगोवर प्रेम असते. परंतु पौषातील पौणिमिच्या रात्री फूलिया जंगोने दिलेल्या आव्हानानुसार ढोल वाजवून नाचते व जंगोस पराभूत करते. बेला जंगोला फूलियाशी लग्न करण्यास सांगते. ' जातीच्या रिवाजाप्रमाणें मोठया भावजयीचें दिराशीं अघळपघळ वागणें कुणीच खिजगणतींत घ्यायचें नाहीं. धाकटया भावजयीशीं मात्र मोठया दिराची वागणूक सास-यासारखी अलिप्त असली पाहिजे. बेलानें जिंकलें होतें. ' (पृ.23) या विवेचनातून लेखिका बेलाच्या धूर्त व मुत्सद्दी स्वभावावर प्रकाश टाकतात. शिवाय गोंडांमधील नातेसंबंधाविषयी असलेल्या रूढी, पध्दती, रिवाजांचेही दर्शन वाचकांना घडवितात.

मानवाचे मृत्यूनंतर स्मशानात मृत देहाबरोबर नवे कापड, त्या कापडात तांदूळ आणि दोन रूपये ठेवतात. तसेच भात व मडक्यात पाणीही ठेवले जाते. या उल्लेखातून गोंड मृत्यूनंतर स्मशानात कोणकोणत्या वस्तू ठेवतात या गोंडांच्या रूढीवर लेखिका प्रकाश टाकतात.

**जातपंचायतीचे चित्रण ...**

जातपंचायत म्हणजे आदिवासींमध्ये अस्तित्वात असलेली स्वतंत्र न्यायव्यवस्था होय. नागर लोकांपासून दूर जंगलात राहणा-या या लोकांनी स्वत:ची एक न्यायव्यवस्था अबाधित ठेवलेली असते. वस्तीतला पटील मानकरी हा या जातपंचायतीचा प्रमुख असतो. या जातपंचायतीचा मोठा प्रभाव

आदिवासींवर असतो. समाजाच्या प्रत्येक घटकाला जातपंचायतीच्या सांगण्यानुसार वागणे अपरिहार्य असते. अशी जातपंचायत गोंड या आदिवासींमध्ये असल्याचे चित्रण दुर्गा भागवत यांनी प्रस्तुत कादंबरीत केले आहे.

गोंड जमातीमध्ये जातपंचायतीने दिलेला न्याय, केलेला निवाडा हा जमातीतील सर्वांना मानावाच लागतो. पौषी पौर्णिमेच्या रात्री जंगो फूलियाचे गळयात ढोलके अडकवितो ते तिला वाजविण्यास सांगतो. जंगोचे सांगण्यावरून फूलिया रात्रभर ढोलके वाजवून नाचते. बाईमाणसाच्या गळयात ढोल बांधून तिला तो वाजवायला सांगण्याचे कृत्य आतापर्यंत जमातीत कोणीही केलेले नव्हते. बेला जंगोस म्हणते, -' पंचायतींतले म्हातारे या कृत्याचा जाब आपल्याला विचारतील. ' (पृ.17) या उल्लेखातून जमातीमध्ये यापूर्वी कधीही न घडलेले असे काही कृत्य जमातीतील घटकांनी केल्यास, जातपंचायत त्या घटकास त्या कृत्याचा जाब विचारते. त्यावेळी जातपंचायतीने दिलेला निर्णय त्या घटकांना मानावा लागतो. जंगोचे फूलियावर प्रेम नसते. पण जातपंचायतीचे निर्णयानुसार त्याला फूलियाचा पत्नी म्हणून स्वीकार करावा लागतो. गोंड जमातीच्या या वैशिष्टयाचे लेखिका वाचकांना दर्शन घडवितात.

जमातीत राहताना जमातीचे नियमांचे पालन करणे सर्वांना बंधनकारक असते. माठी ही फूलियाची बालमैत्रीण. लछमनबरोबर पळून जाते. लछमन तेल्याचा असतो. ' तेल्याबरोबर पळून आल्यानें जातीनें तिला बाहेर काढलें होतें. ' (पृ.53) या उल्लेखातून गोंड जमातीमध्ये जमातीबाहेरील माणसाशी लग्न केल्यास जातपंचायत त्यास वाळीत टाकते, जातपंचायतीचा निर्णय हा अंतिम निर्णय समजला जातो, या गोष्टी लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

सारांश ... वरील सर्व विवेचनावरून दुर्गा भागवत **महानदीच्या तीरावर** या कादंबरीत गोंड जीवनाचे चित्रण करतात. गोंडांचे दारिद्रय, त्यांची गोटुल पध्दती, त्यांची विवाहपध्दती, त्यांच्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरा मृतात्म्यावरील त्यांचा विश्वास, जमातीतील जातपंचायतीचे निर्णयाचे महत्व या सर्व गोष्टींचे यथार्थ व प्रसंगानुरूप चित्रण करतात. गोंड जीवनाचे वेगळेपण वाचकांच्या निदर्शनास आणतात.

**व्यक्तिचित्रणाचे स्वरूप ...**

**फूलिया ...**

प्रस्तुत कादंबरीतील फूलिया हे प्रमुख स्त्रीपात्र आहे. कादंबरीचे संपूर्ण कथानक याच पात्राभोवती फिरत राहते. त्यामुळे ह्या कादंबरीत फूलिया ही महत्वाची व्यक्तिरेखा आहे.

फूलिया ही पायरी गावात राहणारी गोंड जमातीतील घनियाची मुलगी. अतिशय कुरूप असणा-या फूलियाचे वर्णन दुर्गा भागवत करतात ' फूलियाला ना रूप, ना गळा. मठ्ठ म्हशीसारखा तिचा चेहरा अगदीं निर्विकार दिसायचा. तिचें शरीर मात्र मजबूत होतें. एकाद्या मूर्तिकारानें स्त्रीमूर्ति बनविण्यासाठीं तिच्या मापाची शिळा घ्यावी आणि मग चार घाव घातल्यानंतर तें शिल्प मनासारखें व्हायचें नाहीं असें समजून ती शिळा टाकून द्यावी, तशीच विधात्यानें ही स्त्रीमूर्ति जणूं सोडून दिली होती. नाचतांना तिचीं पावलें नखरेल नाजूक त-हेनें कधींच पडत नसत; पण दणक्यांत ठेक्यावर नाचणारी मात्र तिच्यासारखी दुसरी कुणी नव्हती.. फूलिया जिभेची जड होती. चार शब्द तिच्या तोंडून निघणें मुष्कील होतें. पण तिची ती भव्य ओबडधोबड शरीरयष्टि, एखाद्या दगडी खांबासारखी भारदस्त अशी, पहाणाराच्या मनांत दबदबा निर्माण करणारी होती यांत शंका नाहीं. ' (पृ.9) या वर्णनातून फूलियाचे कुरूपपण व मजबूत शरीर लेखिका वाचकांच्या मनःचक्षूपुढे उभे करतात. तद्वतच तिचा अतिशय अबोल स्वभाव वाचकांच्या निदर्शनास आणतात. फूलियास तिच्या कुरूपपणामुळे व अबोल स्वभावामुळे गोटुलात मित्र, मैत्रिणी नव्हत्या. त्यामुळे शत्रूही नसतात. गोटुलातील जंगो व बेला तिला मगर म्हणून हिणवितात. तरीही ती चिडत नाही. त्यांना प्रत्युत्तर करीत नाही.

जंगोवरील प्रेम व्यक्त करण्याची फूलियाची रीत इतर गोंड युवतींपेक्षा वेगळी आहे. ' इतर मुलींप्रमाणें तिनें जंगोला कधीं फुलें दिलीं नाहींत, कधीं खायचा पदार्थ दिला नाहीं, कधीं नदीकांठीं स्नान करतांना त्याची पाठ चोळली नाहीं. कारण यहि गोष्टींना लागणारें धैर्य किंवा चातुर्य तिच्यांत होतें कुठें ? तिचे मठ्ठ डोळे मात्र सारखे त्याला हेरीत असत. जिथें जंगो, तिथें जवळपास कुठें तरी फूलिया असायचीच. ' (पृ.10) या वर्णनातून फूलियाचे एकांगी व जंगोवरील बळकट प्रेम दिसते. वयाच्या बाराव्या वर्षापासून फूलिया जंगोवर प्रेम करीत होती. तिच्या प्रेमात, कामुकदृष्टीत कोणताही फरक पडत नाही.

अबोल व कुरूप फूलियाची गोटुलातील सर्वजण चेष्टा करीत. तिची चेष्टा करण्यात जंगोला अधिक मजा वाटत असते. पौषातील पौर्णिमेच्या रात्री जंगो तिच्या गळयात ढोलके अडकवितो. तिला ढोलके वाजवता व नाचताही येत नाही हे जंगोस माहित होते व त्यामुळेच तिची फजिती करावी या उद्देशाने तो तिला ढोलके वाजविण्यास सांगतो. फूलियाचे मन या प्रकारामुळे अतिशय दुखावते पण जंगोवरील प्रेमामुळे ती ढोलके वाजवून रात्रभर नाचते. पहाटे नाच थांबताच

तिला स्वतःचा दुःखावेग आवरता येत नाही व ती डोहाच्या दिशेने जीव देण्यास पळत सुटते. भीमा तिला डोहातून वर काढतो व तिचा जीव वाचवितो. भीमा तिला लग्नाची मागणी घालतो पण ती भीमास नकार देते. जंगोवरील प्रेमाशी ती एकनिष्ठ राहते. जातपंचायतीचे निर्णयानुसार फूलिया जंगोची पत्नी होते.

फूलिया मुलगा होताच त्याला नाळवारीसह जावेच्या ओटीत घालते. मुलगा मोठा झाल्यावर त्याचेकडून सुख मिळेल या आशेवर ती जगते. परंतु तिचा मुलगा सिंगा हा देखील घरातील इतरांप्रमाणे फूलियाचा पाणउतारा करतो. बेला तिच्या मुलालाही तिच्यापासून तोडते. शारीरिक व मानसिक छळ झालेली ' फूलिया आतां वाळून कोळ झाली. तिचे डोळे अधिकच मोठे आणि भकास दिसूं लागले. तिचीं दुहेरी पेराचीं हाडें, गालांजवळ, कमरेखालीं, मनगटाजवळ, अधिकच मोठीं आणि उंचावल्यासारखीं - रोडलेल्या म्हशीची दिसतात तशीं - दिसत. दांतहि तोंडाच्या मानाने मोठे दिसूं लागले होते. आणि जसजशी बळकट फूलिया बलहीन होऊं लागली, तसतसा घरींदारीं तिच्याबद्दलचा तिटकारा मात्र वाढूं लागला. ' (पृ.30) या वर्णनातून घष्टपुष्ट, बळकट फूलिया बलहीन बनते व कशी दिसते याचे हुबेहूब चित्र लेखिका वाचकांच्या मनःचक्षूपुढे आणतात. यातून लेखिकेच्या व्यक्तिरेखाटनातील वाङ्मयीन गुणही प्रत्ययास येतो. तसेच फूलियाची सोशीक व सहनशीलवृत्तीही वाचकांच्या लक्षात येते.

जंगो (फूलियाचा पती) बेलाचे सांगण्यानुसार तिला सतत टोचून बोलतो. तिला मारहाण करतो. दारूचे व्यसन व कलारणींच्या नादामुळे जंगो जलोदराने आजारी पडतो. फूलिया त्याची मनापासून सेवा करते. आपण या आजारपणात मरणार याची चाहूल जंगोस लागते. फूलियाच्या खऱ्या प्रेमाची त्यास त्यावेळी जाणीव होते व तो फूलियाशी चांगले वागू लागतो. तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करू लागतो. आजारातून उठल्यावर आपण वेगळा संसार करू असे म्हणतो. त्यावेळी फूलियाचे मनात येते ' जंगोने हे शब्द चौदा वर्षांपूर्वी लग्नानंतरच कां उच्चारले नाहींत ? त्यावेळीं आपला मुखदुर्बळपणा आपल्याला झुगारून देतां आला नसता कां ? नव-यांचें साहाय्य असल्यावर स्त्री काय करूं शकणार नाही ? पण आतां तारूण्य ओसरलें होतें. सारीं स्वप्नें मिटलीं होतीं. आणि आतां मनानें आणि शरीरानें अर्धीं मेलेलीं तीं दोघें, अचानक एकत्र आलीं होतीं. (पृ.38) या वर्णनातून फूलियाची सोशीक व सहनशील वृत्ती दिसतेच परंतु त्याबरोबर तिचे भावूक मनही कळते. आतापर्यंत फूलियावर कोणीही प्रेम केले नव्हते. पतीचे प्रेम तिला लग्नानंतर चौदा वर्षे मिळाले नव्हते. त्यामुळे जंगोने केलेला अपमान जेवढा सहन करण्याची ताकद होती तेवढे त्याचे प्रेम-माया सहन

करण्याची ताकद आता तिच्यात उरली नव्हती. त्यामुळेच त्याने केलेल्या प्रेमाने तिला गुदमरून गेल्यासारखे वाटते. सर्वांकडून अपमान, निर्भत्सना सहन करणा-या फूलियाला, सिंगा जंगोचा अपमान करतो ही गोष्ट सहन होत नाही. सिंगाने केलेला तिचा (स्वतःचा) अपमानही तिने सहन केला होता. जंगो जे सांगतो ते सिंगा ऐकत नाही हे पाहून ती कोपिष्ट होते व सिंगास चपराक मारते. यातून जंगोवरील तिच्या प्रेमाची कल्पना वाचकांना येते.

मृत्यू समीप आलेल्या जंगोचा प्राण लवकर जात नाही. भीमा गुणियास बोलावून आणतो. गुणिया भाताची पेज मंत्रून त्यात दोन-तीन आणेल्या टाकतो व ती पेज जंगोस पिण्यास सांगतो. हा अघोरी, भयानक प्रकार फूलिया पाहू शकत नाही व ती बेशुध्द पडते. दिसावयास कुरूप असलेल्या फूलियाचे मन मात्र कुरूप, कठोर नसते हे लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात.

जंगोच्या मृत्यूवेळी बेशुध्द पडलेल्या फूलियास ती मेली म्हणून सर्वजण तिला स्मशानात नेतात. मृत्यूनंतरचे विधी प्रमाणे गुणिया तिचे तोंडावर पाणी शिंपडतो. बेशुध्द फूलिया शुध्दीवर येते. चेटूक (जखीण) उठले म्हणून सर्वजण पळत सुटतात. जवळ असलेली ताटी, ते दगड व बाकीचे सारे साहित्य पाहून आपण स्मशानात आहोत व आपली स्थिती काय आहे हे तिला समजते. तिथल्याच एका दगडावर डोके ठेवून जंगोला (नव-याला) उद्देशून खूप रडते. जीव द्यावा असा विचार तिच्या मनात येतो. पण जीव दिला तर आपण भूताचे जन्मास जावू असे वाटते म्हणून ती तो विचार सोडून देते. जगायचे ठरवते. यातून तिच्या निश्चयी स्वभावावर लेखिका प्रकाश टाकतात. फूलिया स्मशानातील अदृश्य आत्म्यांना वंदन करते व बाहेर पडते. यातून तिची श्रध्दाळू वृत्ती दिसते.

शरीराने दणकट असलेली फूलिया स्मशानातील भयानक वातावरणाने भिते. मडई या आईचे गावी येते. आईच्या मृत्यूची बातमी तिला समजते. त्याच गावात राहणा-या माठी या बालमैत्रिणीकडे जाते. स्मशानातला प्रसंग सोडून आपली सारी कहाणी ती माठीस सांगते, " दिरानें घालवलें म्हणून आईकडे आलें. " (पृ.54) यातून अबोल व मठ्ठ फूलियास केव्हा काय सांगावे व काय सांगू नये हेही समजते. ती प्रसंगावधान ठेवते. माठीचे घरी राहते. माठीही गरोदर असल्याने तिला ठेवून घेते. ' कृतज्ञतेनें फूलियाचें अंतःकरण भरून आलें. माठीच्या संसारांत ती लवकरच गुरफटून गेली. चूल फुंकावी, मुलांचा उपसा काढावा. त्यांना उरीपोटीं धरावें; भांडीं, धुणीं, पाणी भरणें, बाळंतिणीची शेकशेगडी, रगडणें, मळणें, तान्ह्या बाळाला तेल लावून आंघोळ घालणें, एक ना दोन ! रात्रंदिवस फूलिया या रामरगाडयांत डोकें घालून बसली होती. डोळयांतून टिपूस काढायला तिला फुरसत नव्हती. असे दोन महिने गेले. माठींचीं मुलें मावशीवर बेहद्द खूष होतीं. (पृ.54)

या वर्णनातून तिची कष्टाळू वृत्ती लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतातच शिवाय तिच्यातील मायाळू स्वभावावर प्रकाश टाकतात. माठीचा नवरा लछमन फूलियाशी सलगी करू लागतो. पण ती त्यास दाद देत नाही. पतीच्या (जंगोच्या) मृत्यूनंतरही ती त्याच्याशी प्रामाणिक राहते. या प्रसंगचित्रणातून फूलियाच्या एकनिष्ठ वृत्तीचे दर्शन लेखिका वाचकांना घडवितात. त्याचबरोबर तिच्या करारी स्वभावाचेही चित्रण लेखिका येथे करतात.

माठीचे घरतून बाहेर पडताच फूलियाची पाऊले घराकडे, मुलाकडे वळतात. ती पायरी गावात येते तेव्हां रात्र झालेली होती. चंद्राच्या प्रकाशात ती झोपलेल्या आपल्या मुलास ओळखते. मातृप्रेमाने त्याचे डोक्यावरून हात फिरवू लागते. सिंगा जागा होतो. तो व समाजही तिला भूत समजतो. आपण भूत नाही हे ती सर्वांना पटवून देण्याचा प्रयत्न करते. पण तिचा प्रयत्न निष्फळ ठरतो. शेवटी सिंगाला ती जवळ घेते. त्याचे मुके घेते. दोन रूपये त्याचे हातात देते व म्हणते, " मी जातें बाळ, हे तुला खाऊला पैसे. आम्हां दोघां आईबापांना तुला कधींच दिडकीचं कांहीं देतां आलं नाहीं. फार वाईट वाटनं मला; बेलाआईला सुख दे. ' (पृ.59) यातून तिचे निष्कपटी व उदारमन लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात.

अशात-हेने दिसावयास कुरूप, शरीराने बळकट अशा फूलियाच्या बाह्यांगाचें वर्णन जसे लेखिकेने केले आहे तद्वतच मायाळू, प्रेमळ, निष्कपटी, कष्टाळू, उदार, कोणासही उलटून न बोलणारी, पतीचे प्रेमाचा वर्षाव होताच त्या प्रेमाने गुदमरून जाणारी, कृतज्ञ, पतीवर एकनिष्ठ प्रेम करणारी पण बेलाच्या असूया वृत्तीस बळी पडलेली चेटकीण (जखीण) नसतानाही चेटकीण म्हणून संबोधल्या गेलेल्या अशा फूलियाच्या अंतरंगाचे दर्शन वाचकांना घडवितात.

**जंगो . . .**

जंगो हा प्रस्तुत कादंबरीतील फूलियाचा पती होय. पायरी या गावातील भीमाचा तो धाकटा भाऊ. तो भीमापेक्षा दोन वर्षांनी लहान होता. जंगो दिसावयास नाजूक व हुशार होता. बाराव्या वर्षी तो नदीकाठी गुरे राखावयास गेला होता. तेव्हा त्याला लिंगादेवाचा साक्षात्कार झाला होता. बासरी वादनाची व नाचण्याची कला त्यास लिंगोदेवामुळेच मिळाली होती. ' त्याचें मस्करीचें बोलणें; स्वतः कांहीं न करतां युक्तीनें दुस-याला राबवून घेणें त्याला चांगलें साधे. दुस-याला श्रमविण्याचा हक्क, आपल्याला देवानेंच दिला आहे अशी त्याची समजूत होती. ' (पृ.8) या समजूतीमुळे तो गोटुलातील सर्व युवक युवतींना राबवत असे व तेही राबत. त्याचेवर मरून पडत.

गोटुलातील दिसावयास कुरूप असलेली फूलिया जंगोवर प्रेम करते. जंगो तिची नेहमी

चेष्टा करतो. ' बायकी नख-यांनी परिपूर्ण, स्त्रियांचा अत्यंत आवडता, आणि स्तुतीनें विलक्षण चढून गेलेला जंगो, फूलियाला तोडून बोलण्याची एकहि संधि तो गमावीत नसे. दोन तीन वर्षे फूलियाची चेष्टा करण्याची मौज त्यानें भरपूर लुटली होती. कधीं त्यानें आपल्या मित्रमैत्रीणींच्या समोर पान खाऊन लाल थुंकीची पीक तिच्या अंगावर टाकावी आणि गोड आवाजांत लाल पळसाच्या फुलांवरचे प्रेमकवन गावें. कधीं नाचतांना प्रेम करण्याचें नाटक करून तिच्या केसांच्या बटा तोडाव्या. ' (पृ.10) या वर्णनातून जंगोच्या चेष्टेखोर स्वभावावर लेखिका प्रकाश टाकतात. तद्वतच त्याच्या अंगी असलेल्या संगीताच्या व नाचण्याच्या कलेच्या प्रभुत्वावर त्या प्रकाश टाकतात. फूलियाची चेष्टा करण्यात त्याला अधिक मजा वाटते. यावेळी तो फूलियाच्या मनाचा विचार करीत नाही. ही गोष्ट लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात. जंगोने कितीही चेष्टा केली तरी फूलिया कधीही चिडत नसे. तिचे जंगोवर प्रेम होते. पण जंगोचे तिच्यावर प्रेम नव्हते. फूलियाचे हे एकतर्फी प्रेमही सर्वांच्या चेष्टेचा विषय होतो. जंगो चेष्टेने तिला मगर म्हणत असे.

पौषातील पौर्णिमेच्या रात्री सर्व गोंड युवक युवती गोटुलाच्या मधल्या जागेत जमली होती. ' या पौर्णिमेचा नाच प्रत्येकानें नाचलाच पाहिजे असा जातीचा दंडक होता.' (पृ.15) या रिवाजानुसार फूलियाही तेथे होती. जंगो ढोलकेवाल्याच्या गळयातले ढोलके काढतो व फूलियाच्या गळयात अडकवतो. ते तिला वाजविण्यास सांगतो. या आपल्या कृतीमुळे फूलियाला काय वाटेल याचाही तो विचार करीत नाही. फूलिया रात्रभर ढोलके वाजवून नाचते. या कृतीमुळे जंगो गावातील लोकांच्या मनातून उतरतो. जंगोचे बेलावर प्रेम असते. पण या प्रसंगामुळे जातपंचायतीने दिलेल्या निर्णयानुसार व बेलाचे सांगण्यावरून जंगो फूलियाशी लग्न करतो. बेला धूर्त असते. म्हणूनच ती जंगोला फूलियाशी लग्न करण्याचा सल्ला देते व स्वतः त्याच्या मोठया भावाबरोबर लग्न करते. भीमा व जंगो या दोघांनाही ती आपल्या ताब्यात ठेवते. लग्नानंतर जंगो बेला जसे सांगेल तसेंच वागतो. फूलियास घालून पाडून बोलतो. नवरेपणाचा हक्क फूलियावर गाजवतो. तिला मारहाण करतो. बेलास म्हणतो, 'राणी, ही जखीण मला अशी घारेपडीसारखी कां चिकटून बसली आहे ? ' (पृ.28) अशात-हेने तो फूलियाला टोचून बोलतो. तिच्याकडे पाहून दात ओठ खातो. फूलियास मुलगा झाल्यानंतर मुलामध्ये रमून जातो. 'फूलियाशीं असलेला त्याचा संबंध ज्या वंशाच्या तंतूसाठीं होता तो आतां मिळाल्यामुळें जंगो तिच्या वा-यालाहि उभा राहीनासा झाला. त्याची बांसरी फिरून निनादूं लागली. ' (पृ.35) या विवेचनातून त्याच्या स्वार्थी स्वभावावर लेखिका प्रकाश टाकतात.

दारूमध्ये डुंबलेला जंगो जलोदराने आजारी पडतो. अंथरूणाला खिळतो. बांसरी वाजवताना त्याची बोटे भरून येवू लागतात. 'बांसरी गळून पडली आणि आपली जीवनज्योति विझत आहे याची भयानक जाणीव जंगोला झाली. ' (पृ.36) या उल्लेखातून त्याची लिंगोदेवावरील श्रध्दा व दैववादी वृत्ती यावर लेखिका प्रकाश टाकतात. या दैववादी वृत्तीमुळे आपले जीवन म्हणजे दैवी करणी होय असे त्यास वाटते. त्याचा अहंकार नाहीसा होतो. आतापर्यंत बेलाने दिलेल्या शिकवणीने आपण वागलो. त्यामुळेच आपला घात झाला. हे त्यास समजते व खऱ्या बेलाची त्यास ओळख पटते. भीमास शेतामधील कामास कधी हातभर लावला नाही, याचीही जाणीव त्यास होते. त्यामुळे भीमाशी वागताना तो पडतेपणाने वागू लागतो. रात्रंदिवस आपल्या आजारपणात आपली सेवा करणाऱ्या फूलियाच्या प्रेमाची ओळख त्यास पटते. फूलियास तो लहान पोराप्रमाणे बिलगू लागतो. फूलियास म्हणतो - " मी लवकर बरा होईन, फूलिया. मग आपण वेगळे राहूं. भीमाच्या जवळच पण वेगळे. सिंगा असूं दे त्यांचा. तुला मी आणि मला तूं. " (पृ.38) अशात-हेने फूलियाविषयी त्याचे प्रेम वाढत जाते. तिच्याविषयीची द्वेषाची व मत्सराची भावना जाऊन मरतेसमयी तो पूर्णपणे बदलतो.

ज्या बासरीने आपले जीवन बरबाद केले तीच बासरी आपला मुलगा सिंगा वाजवतो हे ऐकताच त्याला अतिशय राग येतो. नेहमीप्रमाणे त्यास न दरडावता त्याचेशी समजुतीचे स्वरात बोलतो. लेखिका लिहितात - ' अपार देहदंड, मनोदंड भोगून आयुष्याच्या शेवटच्या चार घटकांत, जीवनाची शुध्दता चाखण्यास पात्र झालेला तो विनम्र जीव, पोटच्या पोराला शहाणपणा शिकविण्यासाठीं धडपडत होता. ' (पृ.42) या वर्णनातून पूर्णपणे बदलेला जंगो लेखिका चित्रीत करतात.

चौदा वर्षात एकदाही जंगोने फूलियाचे अंगावर मायेने, प्रेमाने हात फिरवला नव्हता. मात्र आज फूलियाच्या एकनिष्ठ प्रेमाची जाणीव होताच तो तिला जवळ घेतो. ' त्याचीं तीं अशक्त बोटें, बांसरीवर ज्या कोमलतेनें फिरत त्याहिपेक्षां अतिशय हळुवारपणें फूलियाचा चेहरा कुरवाळूं लागलीं. ' (पृ.45) स्वतःचे हाताने फुलियाच्या डोळयातील अश्रू पुसतो. झोपलेल्या फूलियास पांघरूण घालण्यास बेलाला सांगतो व म्हणतो - ' रागावूं नको, राणी. नवराबायको कधीं ना कधीं तरी एक व्हायचींच. ' (पृ.46) अशात-हेने त्याचे भावूक मन पत्नीच्या एकनिष्ठ प्रेमामुळे तिच्याकडे ओढले जाते. या आजारपणातच तो मृत्यू पावतो.

थोडक्यात - दिसावयास देखणा, बासरी वाजविण्यात तरबेज असा जंगो लेखिका चित्रीत करतात. बासरी वाजविण्याची कला लिंगोदेवाने आपणास दिली आहे. आपला जन्मच देवाच्या कृपेमुळे झाला आहे असे त्यास वाटते. त्यामुळे अहंकारी स्वार्थी व कामुकवृत्तीचा स्तुतीप्रिय असा जंगो लेखिका

चित्रीत करतात. लिंगोदेवाचा साक्षात्कार त्यास होतो. अशात-हेचे कल्पनेचे रंग लेखिका या चित्रणात रेखाटतात. या साक्षात्कारामुळेच जंगो बासरीतून मधुर सूर काढू शकतो अशात-हेचे चित्रण लेखिका करतात. बासरी वादन ही कला आहे. त्यास परमेश्वराच्या साक्षात्काराची काय गरज ? यामुळे हे चित्रण वास्तव वाटत नाही. परंतु लेखिका या पात्रातून कोणत्याही एका गोष्टीचा नाद वाईटच हे ही दर्शविताना दिसतात. जंगो हा कलाकार आहे त्यामुळे कलाकाराचे मृदू व कोमल मन सत्य जाणून घेते व तद्नंतर आपण वागलो ते वाईट वागलो हे त्या मनास कळते. त्यामुळे तो मानसिकदृष्टया ढासळतो. सत्यता पटल्यानंतर जंगोची अहंकारी स्वार्थीवृत्ती कशी लोपते याचे चित्रण लेखिका अतिशय परिणामकारकपणे करतात. बासरी भंगली जळाली, आता आपल्याला हवे तसे जगता येणार नाही यातून जंगोचे श्रध्दाळू व भावूक मन लेखिका चित्रीत करतात. या श्रध्देमुळेच खचलेले मन शेवटी त्याच्या मृत्यूस कारणीभूत होते. शिवाय जलोदरासारखा रोग त्याचा मृत्यू ओढून आणतो. सिंगा बासरी वाजवतो हे जंगोस कळते. सिंगास समजुतीचे स्वरात सर्वकाही सांगणे, सिंगाचे बापास उलटून बोलणे, फूलियाने मातृत्वाचा हक्क दाखवून त्यास मारणे, बासरी हिसकावून घेणे, जंगोने फूलियास बासरी जाळात टाकण्यास सांगणे, बासरी जळतच आता आपण जगू शकणार नाही असे जंगोस वाटणे त्यातच त्याचा मृत्यू होणे, मुळात मनाने चांगला पण बेलाच्या नादी लागून बिघडलेला जंगो इत्यादी चित्रणे कादंबरीत आली आहेत. मानवी प्रवृत्ती ह्या सर्वत्र सारख्याच असतात. जंगोसारखा आदिवासी माणूस कसा वागतो आणि त्याचे हे वागणे मानवी स्वभावप्रकृतीशी सुसंगत वाटावे अशाच स्वरूपाचे कसे आहे हे या व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून लेखिकेने दाखविले आहे.

**बेला** ...

बेला ही पायरी गावातील गोटुलात राहणारी गोंड युवती होय. दिसावयास नाजूक असणा-या बेलाचे जंगोवर प्रेम होते. स्वतःव्यतिरिक्त जंगोवर कोणी अधिकार गाजविलेला तिला आवडत नसतो. फूलिया जंगोवर प्रेम करते हे तिला आवडत नसते. त्यामुळे फूलियाचा तिला राग येतो. ती जंगोस फूलियाविषयी दररोज नवीन कागाळया सांगते. फूलियाची चेष्टा करण्यास जंगोस साथ देते. दिसावयास सुंदर असलेली बेला गाण्यातही तरबेज होती. त्यामुळे ती गोंड युवकांची आवडती असते. बेला जंगोशी गोड बोलते व लग्नानंतरही आपले संबंध असेच राहतील असे वचन देवून, जंगोस फूलियाबरोबर लग्न करण्यास राजी करते. दुसरीकडे भीमाशी गोड बोलते व स्वतः त्याच्याशी लग्न करते. ' बेला डोळे मिटून बसली कीं तिला आपण आई झालों आहोंत असें दिसे. तिचा पति, प्रियकर जंगो असायचा पण मुलें मात्र थेट भीमासारखीं गुटगुटित कणखर दिसायचीं. ' (पृ.20) हे तिचे स्वप्न असते व ते साकार करण्यास ती अचूक डाव टाकते. जातीच्या रिवाजानुसार मोठी भावजय धाकटया

दिराशी अघळपघळ संबंध ठेवू शकते. मात्र मोठया दीराने धाकटया भावजयीशी वडिलकीचे नात्याने वागावे हे धूर्त बेलास माहीत होते व म्हणूनच ती भीमाबरोबर लग्न करते. हा तिचा धूर्त, मुत्सदी, प्रसंगावधानी स्वभाव लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात.

जंगोवर प्रेम करणा-या फूलियाचा बेलास प्रथमपासूनच राग होता. धूर्त बेला भीमाशी लग्न करते व दीर या नात्याने जंगोशीही संबंध ठेवते. फूलियासारखी दणकट स्त्री तिला घरकामास मिळते. जंगोचे मनात फूलियाविषयी द्वेष, तिटकारा निर्माण होईल असे घरात बोलते. जंगोचा व फूलियाचा संबंध येवू नये यासाठी जंगोभोवती सारखी घुटमळते. भीमा व जंगो या दोघांनाही आपल्या मुठीत ठेवण्यास सतत धडपडते. घरातील सर्व कामे फूलियावर सोपवून स्वतः निवांत राहते. फूलियाला टोचून बोलून हैराण करते. अशात-हेने ती फूलियाचा शारीरिक व मानसिक छळ करते. जंगोदेखत फूलियाशी गोड बोलते व जंगो जाताच तिचा पाणउतारा करते.

जंगो भीमाला कोणत्याही कामात मदत करीत नसतो. त्यामुळे भीमा जंगोवर चिडतो. तो चिडला की मुत्सद्दी बेला त्यास म्हणते - ' मनासारखी बायको असती तर त्यानेंहि असे हात पाय गाळले नसते. राहूं दे त्याला असाच. एक माणूस का आपल्याला जड आहे ? ' (पृ.25) असे बोलून मोठया भावजयीचे कर्तव्य पार पाडल्याचा आव आणते. तिन्हीही मुलीच झाल्याने असंतुष्ट असणा-या भीमाची समजूत घालताना म्हणते - " मुली माझ्या कशा नक्षत्रासारख्या आहेत. तुमच्यासारख्या सशक्त आणि माझ्यासारख्या रूपवान आहेत. त्या धाकटीसारख्या मठ्ठ थोडयाच आहेत ? देज घेतांना बरं वाटेल कीं नाहीं तुम्हाला ? " (पृ.26) भीमा बरोबर फूलियासंबंधी बोलताना ती अतिशय हुशारीने बोलते, पण एक गोष्ट तिच्या सारखी मनात येते ' भीमाला आपण जिंकला, पण धूर्ततेनें. गांवांतल्या मुलींत सर्वांत सुंदर व चतुर मुलगी मिळाली एवढाच अर्थ या त्याच्या वागण्याला आहे. त्याच्या गर्वाला मिळालेलें तें खत आहे. पण उपेक्षित, मठ्ठ फूलियाच्या बाबतींत कापसाच्या बोंडाप्रमाणें सहज फुलून अतीव मृदु झालेलें त्याचें मन, एकदांच काय तें तसें फुललें आणि कायमचें मिटलें.' (पृ.27) या विचारांनी फूलियाविषयीची तिची मत्सराची, द्वेषाची भावना अधिक वाढे. फूलिया चेटकीण आहे, दुष्ट आहे असे शेजा-यापाजा-यांच्या मनात ती बिंबवते व जमातीत तिची जितकी निर्भत्सना करता येईल तेवढी करते.

भीमा व जंगो यांना स्वतःच्या ताब्यात ठेवण्यासाठी ती अनेक युक्त्या करते. जंगोस स्वतःच्या ताब्यात ठेवण्यास ती त्याला कलारणींचे व दारूचे व्यसन लावते. त्यास कुंटनखान्याकडे जाण्यास प्रवृत्त करते. जंगोस फूलियापासून अलिप्त ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करते.

फूलियाला जंगोचे प्रेम तर मिळू देत नाहीच, उलट त्याचे मनात तिच्याविषयी द्वेषाची भावना वाढेल असाच प्रयत्न करते. बेलास तिन्ही मुलीच होतात. फूलियाची मुले जगत नसत याचेही खापर ती फूलियाच्या माथ्यावर फोडते. फूलियास मुलगा होतो. मी केलेल्या नवसामुळे फूलियाला मुलगा झाला आहे असे बेला म्हणते. फूलियास तुझी कूस अपेशी आहे असे सांगून तिचा नाळवारीसह मुलगा ओटीत घेते. बेला फूलियास पतीचे प्रेम व सुख असे मिळू देत नाही तद्वतच तिला मुलाचेही प्रेम मिळू देत नाही.

जंगोच्या मृत्यूची कल्पनाही तिला करावीशी वाटत नाही. परंतु ते सत्य पाहून तिच्या डोळयातून अश्रू वाहतात. जंगोच्या मृत्यूनंतर बेशुध्द फूलियास सर्वजण ती मेली म्हणून स्मशानात नेतात. या प्रसंगानंतर दोन महिन्यांनी फूलिया घरी येते. तेव्हांही बेला फूलियास तिचा मुलगा तिला मिळू देत नाही.

थोडक्यात - दिनावयास देखणी, सर्व गोंड युवकांची आवडती, मुत्सद्दी, चतुर, धूर्त, हुशार, प्रसंगावधानी, द्वेषी, मत्सरी, स्वार्थी, स्वतःचे स्वप्न साकार करण्यास व जंगोवर विवाहानंतरही प्रेम करता यावे म्हणून सूड बुध्दीने व अ्सूयावृत्तीने फूलियाशी वागणारी बेला दुर्गा भागवत चित्रीत करतात.

फूलिया व बेला अशा दोन परस्परविरोधी स्वभावाच्या स्त्रियांचे चित्रण येथे दुर्गा भागवत करतात. हे केवळ सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीचे चित्रण म्हणून येत नाही, तर ढोबळ संघर्षाचे चित्रण करून वाचकांचे रंजन कसे करता येईल हा विचार केल्याने कादंबरीतील ह्या व्यवितरेखा कृत्रिम वाटू लागतात.

**भीमा** ...

पायरी गावातील भीमा हा गोंड युवक होय. तो जंगोचा मोठा भाऊ असूनही त्या दोघांच्यात कोणत्याही बाबतीत साम्य नसते. भीमा शरीराने धिप्पाड, बळकट व स्वभावाने गंभीर होता. शिकार व अचूक तिरंदाजीत त्याचा हात धरणारा गावात दुसरा कोणीही नव्हता.

भीमा जंगोप्रमाणे फूलियाची कधीही चेष्टा करीत नसे. उलट फूलियास सर्वजण चेष्टा करून छळतात. हे त्याला आवडत नसे. त्याला तिच्याविषयी सहानुभूती वाटते. पौषी पौर्णिमेला जंगो फूलियाचे गळयात ढोलके अडकवतो व तिला नाचावयास सांगतो. हे जंगोचे कृत्य त्यास आवडत नाही. बेला चेष्टेने म्हणते या मगरीच्या झपाटयाने ढोलके फुटले तर भरून कोण देणार ? या तिच्या प्रश्नास भीमा अतिशय शांतपणे व निश्चयी स्वरात उत्तर देतो, " मी देईन ". जमातीचे रिवाजानुसार फूलिया रात्रभर ढोलके वाजवून नाचते. जंगो व बेलावर ती मात करते. ते पाहून भीमास अतिशय आनंद होतो. तो तिच्याजवळ प्रेमाने जातो. तिच्या गळयातील ढोलके काढतो व आपल्या खांद्यावरील

फडक्याने तिच्या तोंडावरील घाम पुसतो. द्रोणातून मद्य पिण्यास देतो. मद्य पिवून डोहाकडे फूलिया धावते. ' फूलियाचें तें धांवणें पाहून त्याच्या काळजांत चर्र झालें. डोहाच्या दिशेनें ती धांवत होती. मुखादुर्बळ भीमाच्या मुद्रेवरच्या भावानें फूलियाबद्दल वाटणारें प्रेम आज असें व्यक्त केलें होतें. मठ्ठ आणि मजबूत फूलियाबद्दल भीमाला नेहमीं सहानुभूति वाटत असे. पण मगर म्हणून गणलेल्या स्त्रीवर उघड कुठला तरूण प्रेम करण्यास धजेल ? पण आज सारे बांध फुटले. फूलियाच्या मागोमाग त्या डोहाकडे भीमा धांवला. ' (पृ.15) या विवेचनातून भीमाचे कुरूप फूलियावर प्रेम असते. पण प्रत्यक्ष तसे तो दाखवू शकत नव्हता. आज मात्र त्याने ते व्यक्त केलेच. डोहात उडी मारलेल्या फूलियास तो वर काढतो व तिच्याबरोबर लग्न करण्याची आपली इच्छा प्रकट करतो. फूलिया त्यास नकार देते. तिच्या नकाराने तो दुःखी होतो. तेवढयात बेला तेथे येते. बेला त्याच्याशी गोड बोलते. तिच्या बोलांनी तो भारावून जातो व तिच्याशी तो लग्न करतो.

भीमा नेहमी कामात असतो. जंगोचा ऐतखाऊपणा पाहून त्यास त्याचा राग येतो. राग अनावर झाल्यावर तो जंगोस कष्ट होत नाहीत तर भीक माग असेही म्हणतो. पण बेलाने समजूत काढताच त्याला आपणच चुकलो असे वाटते. लेखिका लिहितात - ' भीमा सर्वस्वी बायकोच्या मुठींत. मान वर करूनसुध्दां तो फूलियाकडे पहात नसे. दिवसभर काम, काम, काम. तेंच काय तें त्याला माहीत. ' (पृ.26) या वर्णनातून लेखिका भीमाच्या कष्टाळू स्वभावावर प्रकाश टाकतात. नेहमी कष्ट करणा-या भीमास बेलाचे डावपेचाचे वागणे कधीही कळत नाही यावरून त्याच्या सरळ स्वभावाची कल्पना येते.

आजारी पडलेल्या जंगोची अवस्था पाहून भीमाही अस्वस्थ होतो. त्यालाही झोप लागत नाही. धीर, गंभीर, स्वभावाचा भीमा बेलाचे मन जाणतो. त्यामुळे तिच्या डोळयातील आसवे पाहूनही न पाहिल्यासारखी करतो. जणुकाही तिला डिवचण्यापेक्षा गप्प राहणेच योग्य असे त्याला वाटते. जंगोचे मृत्यूनंतर कर्त्यापुरूषास साजेशे असे वागतो. तो म्हणतो " मी सारं श्राध्द खूप खर्च करून करीन. ज्या भावाला मी आजपर्यंत पाळलं, पोसलं, त्याला शेवटीं मी कसा सोडीन ? " (पृ.49) या त्याच्या उद्गारातून त्याच्या जंगोवरील प्रेमाची कल्पना येतेच. त्याचबरोबर त्याची कर्तव्यबुध्दीही लक्षात येते.

जंगोचा जीव जास्तकाळ घुटमळू नये म्हणून भीमा मांत्रिकास बोलावून आणतो. स्मशानात फूलिया उठून बसताच जखीण उठून बसली असे इतरांप्रमाणे त्यालाही वाटते. मेलेल्या फूलियाने पुन्हा त्रास देवू नये म्हणून मांत्रिकाकडून ताईत मंत्रून आणतो. दर महिन्याला पिंडदान करतो. यातून तो श्रध्दाळू दिसतो. मृतात्म्यावरील त्याचा विश्वास प्रत्ययास येतो. भूतांच्या खोडीही त्यास माहित आहेत

असे दिसते. म्हणूनच दोन महिन्यांनी परत आलेल्या फूलियास तो म्हणतो, " भूत आहेस म्हणून तर झाडाचा आसरा मागतेस . " (पृ.58). फूलिया या प्रकारानंतर सिंगास घेवून डोहाकडे पळत सुटते. फूलियाचे पाठोपाठ भीमाही पळतो. यावेळी तो फूलियासाठी पळत नाही तर वंशाचा दिवा असणा-या सिंगासाठी पळतो. फूलियाने डोहात उडी मारताच - ' क्षणभर भीमाच्या डोळयांत चौदा वर्षापूर्वी उमटलेला दयेचा भाव उमटला आणि नाहींसा झाला. ' (पृ.59) फूलिया ही माणूस होती की डाकीण? हे कोडे मात्र शेवटपर्यंत तो सोडवू शकत नाही.

थोडक्यात - शरीराने बळकट, कष्टाळू, धीर गंभीर वृत्तीचा, शांत स्वभावाचा असा भीमा लेखिका चित्रीत करतात तद्वत्च त्याचा प्रेमळ, मायाळू स्वभावही लेखिका चित्रीत करतात. कुरूप फूलियाची सर्वजण चेष्टा करतात परंतु तो तिची चेष्टा करीत नाही. पौषी पौर्णिमेचा नाच थांबताच तो स्वतःच्या अंगावरील कापडाने फूलियाच्या तोंडावरील घाम पुसतो. अतिशय सरळ, निरागस व निष्पाप, निष्कपटी असा भीमाचा स्वभावही लेखिका चित्रीत करतात. या स्वभावामुळेच लग्नानंतर तो फूलियाकडे पाहात नाही. धूर्त बेलाचे डावपेचही तो ओळखू शकत नाही. श्रध्दाळू पण कष्टाळू, कर्तव्यतत्पर अशा स्वभावाच्या भीमाचे लेखिका चित्रण करतात.

**इतर पात्रे ...**

वरील प्रमुख पात्रांबरोबर या कादंबरीत इतर गौण पात्रेही आलेली आहेत.

**धनिया** ... धनिया ही फूलियाची आई होय. पौषी पौर्णिमेला जंगोचे आज्ञेवरून फूलिया ढोल वाजवत रात्रभर नाचते. जंगोचा पराभव करते. धनिया फूलियास जातपंचायतीकडून न्याय मिळवून देते. फूलियाचे जंगोशी लग्न लावते. कुरूप फूलियाची सर्वच चेष्टा करीत परंतु तिची बाजू घेणा-यांपैकी धनिया ही एक होय. धनिया फूलियाचा संसार थाटते. पण स्वतःच्या संसारास तिला मुकावे लागते. फूलियाचे लग्नानंतर तिचा पती तिला काडीमोड देतो. शेवटी धनिया माहेरी मडई या गावी जाते व तेथेच मरते.

**माठी व लछमन** . . माठी ही फूलियाची बालमैत्रिण. गोंड स्त्री असते. लछमन हा तेल्याचा असतो. त्याचेबरोबर ती विवाह करते. त्यामुळे गोंड जमात तिला वाळीत टाकते. लग्नानंतर ती सातव्यांदा गरोदर असते. आपली गरज ओळखून फूलियास घरात ठेवते. लछमन (नवरा) तिच्याशी सलगी करू पाहात आहे हे लक्षात येताच तिचा छळ करते. बेलाप्रमाणे तिला टोचून बोलते. शेवटी दोघेही फूलियास नवरा बायकोत बेघाड करणारी कुल्टा म्हणून हाकलून देतात. अशात-हेने स्वार्थी, गरज संपताच फूलियाशी कृतघ्न होणारी, तोंडाळ अशी माठी दुर्गाबाई चित्रीत करतात.

या पात्रांव्यतिरिक्त मडई गावात फूलियास तिची आई मेल्याची वार्ता सांगणारी, तिला माठीचे घर दाखविणारी व तू दुसरा घरोबा कर असा फूलियास सल्ला देणारी **म्हातारी** आहे. जंगोचे प्राण जाताना, फूलियास स्मशानात नेल्यानंतर व पुन्हा दोन महिन्यांनी घरी परत आलेल्या फूलियास भूत म्हणून मंत्र पुटपुटणारा **गुणिया** आहे. तसेच फूलियाविषयी जमातीतील अपसमज पसरविण्यास बेलाला मदत करणा-या फूलियाच्या **सावत्र आईचा** उल्लेखही प्रस्तुत कादंबरीत दुर्गा भागवत यांनी केला आहे.

थोडक्यात - प्रस्तुत कादंबरीमध्ये दुर्गा भागवत यांनी पात्रांचे स्वभाव, त्यांचे अंतरमन व पात्रांचे बाह्यवर्णनही केले आहे. फूलिया हे या कादंबरीतील प्रमुख स्त्रीपात्र होय. निष्कपटी पतीवर एकनिष्ठ प्रेम करणारी, उदारमनाची, सहनशील वृत्तीची, मायाळू, प्रेमळ, कृतज्ञ असे फूलिया हे पात्र लेखिकेने रेखाटले आहे. जंगो श्रध्दाळू, भावूक, अहंकारी, स्वार्थी, कामुकवृत्तीचा परंतु नंतर हे सर्व स्वभाव जाऊन प्रेमळ मायाळू बनलेला जंगो लेखिकेने चित्रीत केला आहे. तर चतुर, धूर्त, हुशार, मत्सरी, स्वार्थी अशा स्वभावाची बेला दुर्गा भागवत चित्रीत करतात. धीर, गंभीर, शांत, प्रेमळ, मायाळू असा भीमा, फूलियावर - आपल्या मुलीवर - जीवापाड प्रेम करणारी धनिया, स्वार्थी, कृतघ्न अशी माठी, अशी विविध स्वभावाची पात्रे लेखिकेने चित्रीत केली आहेत. या सर्व स्वभाव चित्रणांमधून मायाळू, अहंकारी, स्वार्थी अशा मानवी स्वभावाचे चित्रण लेखिकेने केलेले आहे. दिसावयास कुरूप, ओबडधोबड मजबूत शरीरबांध्याची, अबोल अशा अतिमानवी प्रवृत्तीच्या फूलियात मायाळू, उदार, निःस्वार्थी असे मानवी स्वभावही लेखिकेने चित्रीत केले आहेत. आदिवासी जमातीतील लोक हे देखील मानवच होत त्यामुळे मानवी भावभावना वृत्तिप्रवृत्ती या आदिवासींमध्ये इतर मानवांप्रमाणेच दिसतात. आदिवासींच्या रूढी, परंपरांना योग्य अशीच ती पात्रे वर्तन करताना दिसतात. त्यामुळे आदिवासी जीवनाशी ही पात्रे अनुरूप वाटतात.

**स्त्री-पुरूष संबंधाचे चित्रण ...**

प्रस्तुत कादंबरीमध्ये दुर्गा भागवत यांनी ज्याप्रमाणे गोंडांच्या जीवनाचे, व्यक्तिरेखांचे चित्रण केले आहे तद्वतच स्त्री-पुरूष संबंधाचे चित्रणही केले आहे. गोंड स्त्री-पुरूषांचे संबंध कशा प्रकारचे असतात याचा आता परामर्श घेवू.

गोंड जमातीमध्ये युवक-युवतींना एकत्र राहण्यास गोटुलाची व्यवस्था केलली असते. तेथे युवक युवती एकत्र राहतात, नाचतात व गातात. आदिवासींमध्ये गोटुलाची सोय जमात करते. पौषातील पौर्णिमेरात्री सर्व युवकयुवती गोटुलाचे प्रांगणात जमा होतात. ' पौषी पौर्णिमेचा नाच प्रत्येकानें नाचलाच पाहिजे असा जातीचा दंडक होता. ' (पृ.15) या उल्लेखातून लेखिका गोंडांच्या रितीरिवाजावर प्रकाश

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

टाकतात. शिवाय गोंड युवक युवती एकत्र नाचतात, गातात म्हणजेच त्यांच्यात खेळीमेळीचे संबंध असतात. यातूनच युवकयुवती जोडीदार शोधतात.

जंगो व बेला गोटुलातील सर्वांचे आवडते होते. बेला अनेक तरूणांशी सलोख्याने वागते. ' सर्व तरूणांना तिनें झुलवलें होतें, पण ती कुणाचीच नव्हती. ' (पृ.18) या उल्लेखातून लेखिका गोंड स्त्रीपुरूषांचे संबंध खेळीमेळीचे असतात हे दर्शवितात. तसेच आवडत्या युवकाशी (प्रियकराशी) उघड संबंध ठेवणे गैर समजले जत नाही. फूलियाचे जंगोवर प्रेम होते पण ' इतर मुलींप्रमाणें तिनें जंगोला कधीं फुलें दिलीं नाहींत, कधीं खायचा पदार्थ दिला नाहीं. ' (पृ.10) पौषातील पौर्णिमेच्या रात्री जंगोचे सांगण्यावरून फूलिया रात्रभर नाचते. जंगोवर मात करते. दुसरे दिवशी बेला जंगोजवळ जाते तेव्हां ' तिने लाडिकपणें दोन्ही हात त्याच्या गळ्यांत टाकले. त्याची चुंबनें घेतलीं. असा प्रकार पूर्वी अनेकदां झाला होता. जंगोनेंहि कैक मुलींच्याबरोबर असे खेळ केले होते. पण कुठल्याहि मुलीला त्यानें मागणी घातली न्व्हती. तिच्यावर अकृत्रिम प्रेम केलें नव्हतें. ' (पृ.18) वरील उल्लेखांमधून लेखिका गोंड युवक युवतींच्या स्वैर आचरणावर प्रकाश टाकतात. गोंडांमध्ये विवाहापूर्वी चुंबन घेणे हे अनैतिक मानले जात नाही. यावरही लेखिका प्रकाश टाकतात. युवक युवतींना असे वागण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. ही गोष्टही लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात.

बेलाचे जंगोवर प्रेम होते. दिसावयास देखणा, बासरीतून मधूर स्वर वाहेर काढणारा जंगोही तिला हवा असतो व शरीराने दणकट, कष्टाळू असा भीमाही हवा असतो. आपले हे स्वप्न साकार करण्यास ती जंगोच्या मोठ्या भावाशी-भीमाशी लग्न करते. कारण ' जातीच्या रिवाजाप्रमाणें मोठया भावजयीचें दिराशीं अचाळपघळ वागणें कुणीच खिजगणतींत घ्यायचें नाहीं. धाकटया भावजयीशीं मात्र मोठया दिराची वागणूक सास-यासारखी अलिप्त असली पाहिजे. ' (पृ.23) या उल्लेखातून गोंडांमध्ये मोठया भावजयचे धाकटया दिराशी व मोठया दिराचे धाकटया भावजयशी संबंध कशाप्रकारचे असतात ही गोष्ट लेखिका वाचकांच्या निदर्शनास आणतात. तसेच त्यांच्या रूढीवरही प्रकाश टाकतात.

गोंडांच्या स्वैर आचरणाचे चित्रण करीत असतानाच लेखिका, जंगो व फूलिया या पती-पत्नीमध्ये अचानक निर्माण झालेल्या प्रेमाच्या ओलाव्यात जो कोणी येईल त्याची अवस्था झाड व साल यांच्यात सांकटण्यासारखी होईल असे म्हणते. यातून पती पत्नीमधील संबंध कशाप्रकारचे असतात यावर लेखिका प्रकाश टाकताना दिसतात.

माठीने घरातून हाकलून दिल्यानंतर फूलिया आपल्या आईचे भेटीस मडई येथे जाते. तेव्हा तिला विधवा म्हातारी भेटते. फुलियाचा नवरा मेला आहे हे समजताच म्हातारी म्हणते - " विधवापण मोठं वाईट. माझं ऐक, अजून तुझं वय गेलं नाहीं. दुसरं लग्न कर तूं. मला अनुभव आहे. धनिया बिचारी तशीच तडफडत मेली झालं. " (पृ.53) फूलिया म्हातारीस मी दुसरे लग्न करणार नाही म्हणते तेव्हा म्हातारी तिला म्हणते - " तूं नवी आहेस म्हणून असं म्हणतेस. मीहि तसंच म्हटलं होतं, पण मग मी तीन घरोबे केले. म्हणून आतां पोरगा तरी विचारायला आहे. " (पृ.53) या उल्लेखातून लेखिका तत्कालीन समाजामध्ये विधवांना जीवन जगणे किती कठीण होते या गोष्टीवर प्रकाश टाकतात. शिवाय गोंडांमध्ये वैधव्यानंतर अनेक घरोबेही करता येतात. विधवा स्त्री ही सर्वांना आपली मालमत्ता वाटते, त्यामुळे तिला जीवन जगणे असह्य होऊन जाते. या प्रसंगातून लेखिका गोंड विधवा स्त्री व जमातीतील पुरूष यांचे संबंध कशाप्रकारचे असतात या गोष्टी वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

माठी या गोंड युवतीने लछमनशी (तेली जातीच्या व्यक्तीशी) लग्न केल्यामुळे जमातीने त्यांना वाळीत टाकले होते. या उल्लेखातून गोंड स्त्री पुरूष आपल्या जमातीतीलच स्त्री पुरूषाशी संबंध ठेवू शकतात यावर लेखिका प्रकाश टाकतात.

धनिया ही फूलियाची आई. फूलियाचे लग्नानंतर तिचे वडील धनियांस काडीमोड देतात व दुसरा विवाह करतात. या उल्लेखातून लेखिका गोंड स्त्री पुरूषांचे विवाहानंतर विशेषतः काडीमोड दिल्यानंतर संबंध कशाप्रकारचे असतात यावर प्रकाश टाकतात.

प्रस्तुत कादंबरीची नायिका फूलिया, ही या जमातीतील अपवादात्मक गोंड स्त्री म्हणून दुर्गा भागवतांनी रेखाटलेली दिसते. फूलिया शरीराने दणकट, मजबूत पण दिसावयास कुरूप होती. तिचे देखण्या व बासरी वादनात कुशल असणा-या जंगोवर प्रेम असते. इतर गोंड स्त्रियांप्रमाणे ती नदीवर गेल्यानंतर त्याच्या अंगाला साबण लावणे, त्याला फुले देणे इ. प्रकार करीत नाही. जंगो जिथे तिथे ती असे. जंगोचे फूलियावर प्रेम नसते. त्यामुळे फूलियाचे एकतर्फी प्रेम हा सर्वांच्या चेष्टेचा विषय होतो. पौषातील पौर्णिमेच्या रात्री जंगो चेष्टेने फूलियाचे गळयात ढोलके अडकवितो व तिला ते वाजविण्यास व नाचावयास सांगतो. जंगोच्या या कृतीमुळे फूलियाचे मन दुखावते पण दृढनिश्चयाने व जंगोवरील प्रेमामुळे ती नाचते. परिणाम, जमातीचे रिवाजानुसार फूलिया व जंगो विवाहबध्द होतात. बेलाचे जंगोवर प्रेम असते. जंगोवर कोणी अधिकार गाजविलेला तिला आवडत नसतो. त्यामुळे फूलियाचा तिला राग येतो. अतिशय धूर्तपणे, चतुराईने ती जंगोच्या मोठया भावाबरोबर लग्न करते. जंगो व भीमा या दोन्ही पुरूषांना ताब्यात ठेवते.

थोरली जाव या नात्याने व सूडबुध्दीने फूलियाचा बेला अतोनात छळ करते. घरातील सर्व कामे तर तिला करावयास लावतेच शिवाय नेहमी घालूनपाडून बोलते. जंगोचे प्रेम तिला मिळू देत नाही. तिला झालेला मुलगा, तुझी कूस अपेशी आहे म्हणून नाळवारीसह आपल्या ओटीत घेते. सूडबुध्दीने पेटलेली बेला फूलियाचा मुलगाही तिच्यापासून तोडते. ती चेटकीण आहे, दुष्ट आहे असे सर्वांना सांगते. बेलाने केलेल्या शारीरिक व मानसिक छळांमुळे दणकट फूलिया अशक्त होते. जंगोसाठी ती सर्वकाही सहन करते. जंगोचे मृत्यूवेळी बेशुध्द पडलेल्या फूलियास, ती मेली म्हणून सर्वजण स्मशानात नेतात. तेथे ती शुध्दीवर येते. जखीण उठून बसली असेच सर्वांना वाटते. त्यानंतर फूलिया मडई या गावी माठीकडे जाते. दोन-तीन महिन्यांनी माठीही तिला घरातून हाकलून देते. पुत्रप्रेमाच्या ओढीने फूलिया पुन्हा पायरी या आपल्या गावी येते.तेव्हा बेला तिला चेटकीण म्हणते व ती सिंगास नेईल म्हणून त्याला घेऊन शेजारणीकडे जाते. अशात-हेने निष्कपटी जंगोशी एकनिष्ठ राहणा-या फूलियास बेला पतीप्रेम व पुत्रप्रेम मिळू देत नाही. जमातीतही ती चेटकीण आहे असाच प्रसार करते. त्यामुळे जमातीच्या मनातूनही ती उतरते. या सर्व गोष्टीस बेलाची सूड व असूया वृत्ती कारणीभूत ठरते. शेवटी फूलियास आपण मेलो नव्हतो हे सिध्द करून दाखविण्यास आत्महत्या करावी लागते.

थोडक्यात - वरील विवेचनातून गोंड या आदिवासी जमातीतील स्त्री-पुरूषांचे संबंध खोळीमेळीचे असतात. विवाहापूर्वी गोंड तरूण तरूणी एकत्र राहतात. त्यांना एकमेकांशी संबंध ठेवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. मोठी भावजय धाकटया दिराशी अघळपघळपणे वागू शकते. परंतु धाकटया भावजयीशी मोठया दिराची वागणूक सास-यासारखी अलिप्त असते. पती पत्नीमध्ये सलोख्याचे, प्रेमाचे संबंध असतात. गोंड स्त्री पुरूषातील परस्परसंबंध हे मुक्त स्वरूपाचे असतात. या सर्व विवेचनातून गोंड या जमातीमध्ये स्त्री-पुरूष संबंधामध्ये नागर संस्कृतीपेक्षा वेगळेपणा दिसतो.

**वातावरणनिर्मितीचे स्वरूप ...**

प्रस्तुत कादंबरीमध्ये दुर्गा भागवत यांनी फूलिया या गोंड स्त्रीची शोकांतिका चित्रीत केलेली आहे. दंतकथेमध्ये ज्याप्रमाणे अद्‌भुतता, अतिशयोक्ती, घटना व प्रसंगांमध्ये तर्कहीनता रंजनप्रधानता असते, त्यादृष्टीने वातावरणनिर्मिती केलेली असते. तशी वातावरणनिर्मिती दुर्गा भागवतांनी केलेली दिसते.

फूलियाची शोकांतिका चित्रीत करण्यापूर्वी दुर्गा भागवत गूढ, अद्‌भुत वातावरण निर्माण करताना दिसतात. महानदीच्या तीरावरील डोह लेखिका पाहातात. आणि त्यांच्या मनात येते -

' तो डोह ओठ मिटून बसलेला वाटे. कांहींतरी रहस्य सांगण्यासाठीं तोंड उघडावें आणि मग तें न सांगतां आल्यानें फिरून ओठ घट्ट मिटून घ्यावे अशी तिथें पाण्याची हालचाल वाटे. कारण कांठावर कांहींतरी तरंग उठतांना दिसत पण मध्यावर सगळें अगदीं शांत निश्चल होतें. खोलीमुळें मध्यावरच्या डोहाचें तें पाणी किती काळेंभोर दिसत असे ! त्या डोहाचें तें गांभीर्य, तो काळेपणा पाहून एक प्रकारची उदासीनता मनाला आली. जणूं कांहीं हजारों वर्षं नदीकांठीं राहिलेल्या माणसांच्या जीवनांतल्या सा-या दुःखांच्या आठवणी त्या डोहानें आपल्या अंतरांत खोल खोल जतन करून ठेवल्या होत्या. ' (पृ.6) या वर्णनातून नदीकाठी राहणा-यांच्या जीवनातील गूढता, अद्भुतता लेखिका सूचित करतात. अद्भुत व गूढ वातावरण निर्माण करतात.

डोहाविषयीच्या समजुतीचे चित्रण करताना लेखिका लिहितात - ' पायरी गांवच्या लोकांना या डोहाचें फार भय वाटे. जंगलांतल्या त्या बाजूनें जो जो वाटसरू जाई तो तो त्याला नारळ, सुपारी कांहींतरी देई आणि मगच पुढें जाई. एकटा दुकटा भर दुपारींहि त्या बाजूनें जायला धजायचा नाहीं. मग पहाटे किंवा संध्याकाळीं या बाजूनें कोण येणार ? कुणी सांगे कीं रात्रीं वेताळाची स्वारी डोहांतून वर येते. कुणी म्हणे अमावास्या पौर्णिमांना नग्न चेटकिणी डोकीवर दिवे घेऊन तिथें नाचतात. या जागेबद्दलचें भय इतकें थरारून उठण्याचें कारण म्हणजे त्याच्या कांठीं असलेलें तें जुनें स्मशान. ' (पृ.6) या जुन्या स्मशानाचे वर्णन करून लेखिका वातावरणनिर्मितीत अद्भुतता वाढवितात. 'जुनें असलें तरी परित्यक्त होतें म्हणूनच अधिक भेसूर झालें होतें. झुल्यापाळण्याप्रमाणें मृत्यूनंतरच्या पुनरूज्जीवनाची कुठलीच साक्ष त्या स्मशानांत नव्हती. लोक म्हणत कीं, त्यांतल्या सा-या आत्म्यांना वेताळानें आपल्या कबजांत घेतलें आहे. चेटकिणींच्या पूर्ण आधीन ते आहेत. ' (पृ.7) याच स्मशानातील फूलियाचे पिशाच्च सर्वांना छळते. ही फूलिया कोण ? ती माणसांवर सूड कां उगवते ? याचे चित्रण कादंबरीत लेखिकेने केले आहे.

अद्भुत व गूढ वातावरण निर्माण होईल अशी अनेक वर्णने लेखिकेने केलेली दिसतात. जसे - ' लिंगोदेवाची बांसरी ऐकून स्त्रिया भुलत, पण लिंगोदेवानें त्या पाशांत स्वतःला गोंवून घेतलें नाहीं. ब्रह्मचारी राहिला तो. आपली बांसरी व वीणा यांच्याखेरीज दुस-या कशाला स्पर्श केला नाहीं त्यानें. पण लिंगादेव मोठा मत्सरी आहे. आपल्यासारखें थोडें जरी कौशल्य कुणामध्यें दिसलें तरी तो ताबडतोब स्त्रियांचा आणि दारूचा मोह त्या माणसाभोवतीं उत्पन्न करून त्याचा बळी घेतो.' (पृ.37) जंगो जलोदराने आजारी पडतो तेव्हा त्याचा जीव जास्तवेळ घुटमळू नये व संध्याकाळचे आत मरण यावे म्हणून गुणिया निर्वाणीचा उपाय करतो - ' भाताची कांजी मांत्रिकानें बनवली. ती मंत्रून तिच्यांत दोन चार आणेल्या त्यानें टाकल्या.

आणि मग ती कांजी जंगोला बसतें करून त्यानें त्याच्या घशांत ओतली. " गीळ, जोराने गीळ " तो म्हणाला. ' (पृ.48) यासारखी अद्भुतता, गूढता लेखिका प्रस्तुत कादंबरीत चित्रीत करतात. तसेच बेशुध्द फूलियास ती मेली म्हणून सर्वजण स्मशानात नेतात. ' सूर्य त्यावेळीं पश्चिमेला कलंडला होता. स्मशानांतल्या विधींत गुणियानें वेताळाच्या सर्व गोतावळयाला जोराजोरांत तंबी भरण्यास सुरवात केली. ताटीवरच्या फूलियाच्या भोवतीं आवळलेल्या दो-या सोडून तिच्या तोंडांत त्यानें पाणी मंत्रून घातलें. आणि मग शिजविलेल्या भाताचा, गुलालानें भरलेल्या भाताचा घांस तिच्या तोंडांत तो कोंबूं लागला. इतक्यांत त्याच्या बोटांवर तिचा जबडा बळकट मिटला. दांत बोटांत घुसले. गुणिया ठो ठो बोंबलूं लागला : " जखिणीनें मला धरलं हो धरलं " असें ओरडत त्यानें कसाबसा रक्तबंबाळ हात तिच्या तोंडांतून काढून घेतला. इतक्यांत " हा " असा आवाज तिच्या तोंडून निघाला आणि तो हवेंत घुमला. सा-यांची भयानें बोबडी वळली. ' (पृ.50) स्मशानांत फूलिया शुध्दीवर येते. सर्वजण स्मशानातून पळून जातात. त्यावेळी ' संध्याकाळीं नदीच्या पाण्यावर धुकें सांचलें. गारठा वाढला. काळोख पसरूं लागला आणि फूलियाच्या अंगावर भयानें कांटा उभा राहिला. " जगायचें, जगायचें काय वाटेल तें झालें तरी जगायचें " हीच भावना तिच्या मनांत प्रबळ झाली आणि स्मशानांतल्या भुतांच्या भयाने फूलिया तिथून धडपडत उठली, बाहेर पडली आणि तिनें भिरीभिरी आजूबाजूला पाहिलें. नव्या कापडाचा मोठा तुकडा तिथें पडला होता. फूलियानें तो उचलला. त्या कापडाच्या एका टोकाला एक गांठोडें केलेलें होतें. फूलियानें तें घाईघाईनें सोडलें. डाळ, तांदुळ आणि दोन रूपये त्यांतून निघाले. जन्मांत पहिल्यांदा एवढे धन तिनें हातांत धरलें होते. ती मोटली कमरेला खोंचून आणि तें कापड अंगवर घेऊन फूलिया तिथल्या अदृश्य आत्म्यांना वंदन करून बाहेर पडली.' (पृ.51)

वरील सर्व उल्लेखातून लेखिका अद्भुतरम्य व गूढ वातावरणनिर्मिती त्या त्या प्रसंगांना साजेशी अशी करतात व कादंबरी गूढ व अद्भुत अशी चित्रीत करतात. वातावरणात भयानकता चित्रीत करतात.

जंगोचे मृत्यूवेळी फूलिया बेशुध्द पडते. नंतर ती मेली म्हणून सर्वजण तिला स्मशानात नेतात. ही अतिशयोक्ती वाटते. लेखिका एकीकडे फूलिया दिसावयास अतिशय कुरूप, काळी व ओबडधोबड होती असे वर्णन करतात, तर दुसरीकडे फूलिया मडई या गावी जाते तेथे माठीचा नवरा व गावातील लोक आकर्षित होतात असे वर्णन करतात. या प्रसंगामध्ये घटनांमध्ये कार्यकारणसंबंध दिसत नाही. या कादंबरीतील पात्रे लेखिका विशिष्ट पध्दतीने रेखाटताना दिसतात जसे -

जंगो व भीमा हे भाऊभाऊ. जंगो देखणा, बायकी वागणारा, युवतींशी अघळपघळपणे वागणारा, फूलियाची चेष्टा करणारा, ऐतखाऊ. तर भीमा कष्टाळू, तिरंदाजीत कुशल, फूलियाविषयी सहानुभूती वाटणारा. तसेच बेला व फूलिया या दोन परस्परविरोधी स्वभावाच्या स्त्रीव्यक्तीरेखा लेखिका चित्रीत करतात. यांच्यातील संघर्षाचे चित्रणही ढोबळ स्वरूपात करतात. या वर्णनांमधून कार्यकारण संबंध दिसत नाही. फूलिया स्मशानातून उठते व आपले आईचे गावी मडईला जाते. माठीचे घरी दोन महिने राहते. माठीने हाकलून देताच पुन्हा आपले घरी पायरी या गावी येते. स्मशानातून उठल्यानंतर ती आपल्या घरी कां जात नाही ? दोन महिन्यांनी पुन्हा आपल्या घरी जाण्याची इच्छा तिला कां होते ? यासारखे प्रश्न वाचकांच्या मनात उभे राहतात. लेखिका या गोष्टी कल्पनेने रंगवतात व कथानक रंजक करताना दिसतात. बेला व जंगो पौषी पौर्णिमेच्या दुसरे दिवशी एकत्र येतात, त्यावेळी जंगो तिला म्हणतो " बघ बेला, जणूं तूंच लांबून माझ्याकडे पाहून हंसते आहेस. आणि हातांत हात धरल्यावर मात्र हा बहाणा कां ? सरळ वागणं तुला आजहि वावडं आहे वाटतं ? " (पृ.16) तसेच ' तिनें लाडिकपणें दोन्ही हात त्याच्या गळयांत टाकले. त्याचीं चुंबनें घेतलीं. ' (पृ.19) यासारख्या उल्लेखांमधून लेखिका कादंबरीची रंजकता वाढवितात.

थोडक्यात - प्रस्तुत कादंबरीमध्ये गोंड या जमातीतील लोकांच्या अंधश्रध्दा, त्यांचे अंधविश्वास, त्यांच्या रूढी परंपरा, त्यांचा चेटूक, भूतबाधा व मृतात्म्यावरील विश्वास चित्रीत करणे हाच लेखिकेचा मूळ हेतू आहे. या हेतूस अनुरूप अशी अद्‌भुत, गूढ वातावरणनिर्मिती दुर्गा भागवतांनी केलेली दिसते.

**निसर्गाचे चित्रण** ...

दुर्गा भागवत **महानदीच्या तीरावर** या कादंबरीत ज्याप्रमाणे अद्‌भुतरम्य, गूढ व रंजनप्रधान वातावरणनिर्मिती करताना दिसतात. तद्‌वतच निसर्गाचे चित्रणही करताना दिसतात. हे निसर्गचित्रण रंजनासाठी येते कां? कादंबरीशी सुसंगत, अपरिहार्य म्हणून येते कां ? या निसर्गचित्रणामुळे कादंबरीच्या वाङमयीन वैशिष्टयात कोणती भर पडली आहे ? निसर्गचित्रणातून लेखिकेच्या लेखनाची कोणती वैशिष्टये प्रकट होतात ? या दृष्टीने प्रस्तुत कादंबरीत दुर्गा भागवतांनी केलेल्या निसर्गचित्रणांचा आता परामर्श घेवू.

कादंबरीच्या सुरूवातीसच दुर्गा भागवत रायपूर जिल्ह्याच्या आग्नेय भागांत असलेल्या महानदीच्या तीरावरील गिरीमालांचे व महानदीचे वर्णन करतात - ' रायपूर जिल्ह्याचा आग्नेय भाग. त्या भागांत सिहावाची गिरिमाला ऐसपैस पसरलेली आहे. विशाल महानदीच्या उदार आस-यानें

तिथली वृक्षसृष्टि घष्टपुष्ट होऊन अनुपम शोभा मिरवीत सदैव उभी असते. महानदीच्या प्रवाहाचें वर्णन काय करावें ? कधीं ती सागराप्रमाणें शांत रूप धारण करते; तर कधीं दरडींतून घों घों आवाज करीत गर्जत जातें; कधीं तिचें पात्र एखाद्या तळयाप्रमाणें लाघवी भासतें. कमळांची पखारण अशा ठिकाणीं विलक्षण नाजुकपणें पहाणाराचें अंत:करण आपलेसे करून घेतें. अरण्य नेहमीं दूरचें वाटतें. त्याच्या भव्य, कराल रूपामुळें तें नेहमीं एक प्रकारचा दबदबा पहाणा-याच्या मनांत निर्माण करतें पण हीं तळीं, किंवा ते शांत डोह मत्र पहातांक्षणींच एक प्रकारची सलगीची भावना मनांत निर्माण करतात.'

(पृ.5) असे निसर्गचित्रण कादंबरीत अपरिहार्य म्हणून येते. लेखिका महानदीच्या तीरावरील व महानदीचेही चित्रण वाचकांच्या मन:चक्षुपुढे उभे करतात. त्याबरोबर निसर्गातील भयानकता, गूढता ही वर्णिताना दिसतात. निसर्गाकडे एका विशिष्ठ दृष्टिकोनातून पाहाताना त्या दिसतात. निसर्ग पाहाताच तो जसा आपल्याला आपलासा करून घेतो तद्वतच त्या (निसर्गा) विषयी मनामध्ये दबदबा निर्माण करतो. तसेच महानदीच्या तीरावरील डोहाचे चित्रण लेखिका करतात - ' एकदां मी महानदीच्या तीरीं हिंडत होतें. त्यावेळी एक असाच कडांवर लव्हाळयांची झालर असणारा, आणि कांठाजवळ थोडींशीं कमळें फुललेला विशाल डोह मीं पाहिला. अगदीं खोल खोल होता तो डोह. इतर डोहांपेक्षां कितीतरी वेगळा. त्याच्यांत भोंवरे नव्हते, पण त्याचें तें काळेंभोर पाणी आणि नदीच्या पात्राची त्या ठिकाणची विशालता, दोन्ही कांठांवरची ती गर्द आणि कुबट वास येणारी वनराजी यांचा माझ्या मनावर चमत्कारिक परिणाम झाला. विशाल रात्रीच्या तमोमय सौंदर्याप्रमाणें, हिरव्या काळया वनराईनें वेढलेला तो डोह गूढ काळया लावण्यानें भरलेला वाटला मला. त्याच्या सौंदर्यानें मी मुग्ध झालें आणि धास्तावलें पण. निसर्गातल्या अवर्णनीय शोभेनें नटलेल्या दृश्यांत मला नेहमींच कांहीं तरी विषण्ण असें प्रतीत होतें. जबरदस्त ओढ निर्माण करणारें पण तितकीच जरब बसविणारें कांहीं तरी त्यांत असल्याचा भास होतो. तसाच तो याहि ठिकाणीं पण आणखी तीव्रतेनें झाला. तो डोह ओठ मिटून बसलेला वाटे. कांहीं तरी रहस्य सांगण्यासाठीं तोंड उघडावें आणि मग तें न सांगतां आल्यानें फिरून ओठ घट्ट मिटून घ्यावे अशी तिथें पाण्याची हालचाल वाटे. कारण कांठावर कांहींतरी तरंग उठतांना दिसत पण मध्यावर सगळें अगदीं शांत निश्चल होतें. खोलीमुळें मध्यावरच्या डोहाचें तें पाणी किती काळेंभोर दिसत असे ! त्या डोहाचें तें गांभिर्य तो काळेपणा पाहून एक प्रकारची उदासीनता मनाला आली. जणूं कांहीं हजारों वर्षें नदीकांठीं राहिलेल्या माणसांच्या जीवनांतल्या सा-या दु:खांच्या आठवणी त्या डोहानें आपल्या अंतरांत खोल खोल जतन करून ठेवल्या होत्या. पावसाळ्यांत निसर्गनियमानें तो घोष करायचा. पण एरवीं शांत. परंतु त्या डोहाची ती गर्जना आणि तो शांतपणा

यांनींच एक बोलकें विश्व त्याच्याभोंवतीं निर्माण केलें होतें. '(पृ.5) प्रस्तुत कांदबरीत लेखिका फूलिया या गोंड युवतीच्या जीवनाची गूढ, गंभीर कथा सांगतात. हे कथानक मनात अगोदर ठरवूनच लेखिका त्यादृष्टीने निसर्गाचे चित्रण करताना दिसतात. त्यामुळे निसर्गाचे चित्रणही कादंबरीच्या आशयास सुसंगत असे वाटते. डोहाच्या वर्णनातून लेखिका फूलियाच चित्रीत करीत आहेत असे वाटते. ही कादंबरी लेखिका दंतकथा सांगितल्याप्रमाणे चित्रीत करतात. त्यामुळे कादंबरीतील कथेस योग्य, सुसंगत होईल असे निसर्गचित्रण लेखिकेने केले आहे.

जंगो जलोदराने आजारी पडतो. त्याचे मरण जवळ आल्याची चाहूल फूलियास लागते. ' अशा अवघड स्थितींत कांहीं घटका गेल्या. पहाटेला फिकी चंद्रकोर पूर्वेच्या क्षितीजावर दिसूं लागली आणि त्याचवेळी फूलियाच्या आक्रोशानें घर भरून गेलें. ' (पृ.47) या निसर्गचित्रणातून लेखिका फूलियाच्या जीवनातील सुखद, शीतल अशा क्षणांचा लय होत आहे याची जाणीव करून देतात. निसर्ग हा देखील फूलियाच्या जीवनातील पुढील घटनांची जाणीव करून देत आहे असे निसर्ग वर्णन लेखिका करतात.

जंगोचे मृत्यूवेळी फूलिया बेशुध्द पडते. सर्वजण तिला मेली म्हणून स्मशानात नेतात. तेथे ती शुध्दीवर येते सर्वजण जखीण उठून बसली म्हणून पळत सुटतात. त्यावेळी ' संध्याकाळीं नदीच्या पाण्यावर धुकें सांचलें. गारठा वाढला. काळोख पसरूं लागला आणि फूलियाच्या अंगावर भयानें कांटा उभा राहिला. ' (पृ.51) कादंबरीतील कथानकास आवश्यक असलेले अद्‌भुत वातावरण लेखिका या निसर्गचित्रणातून करतात. तद्‌वतच फूलियाच्या पुढील जीवनातील दाट काळोखाची जाणीवही या निसर्गचित्रणातून करून देतात. फूलिया स्मशानभूमीतून भूतांच्या भितीने पळत सुटते. त्यावेळी ' अंधारी रात्र होती. रस्त्यावर काळोख होता. दोन्ही बाजूंच्या झाडांची दाट काळी छाया भेसूर दिसत होती. पायाखालचें दिसत नव्हतें (पृ.52) रात्रीच्या भयानकतेचे वर्णन करून कादंबरीची अद्‌भुतता, गूढता यात भर घालतात.

स्मशानभूमीतून निघण्यापूर्वी आपण आत्महत्या करावयाची नाही. आपण जगायचे या निश्चयाने फूलिया बाहेर पडते. नदीच्या काठी पाणी पिते. नदीच्या मऊ वाळूत झोपी जाते. ' सकाळीं फूलिया जागी झाली तो चांगलें ऊन पडलें होतें. वाळू तापूं लागली होती. नदीवर गुरें पाणी प्यायला आलीं होतीं. माणसांचीं बोलणीं चालू होतीं. ' (पृ.52) या वर्णनातून फूलियाच्या जीवनाची पहाटच जणू सूचित करताना लेखिका दिसतात.

दुर्गा भागवत कादंबरीत काही ठिकाणी निसर्गाचे चित्रण रंजकता वाढविण्यासाठीही करताना दिसतात जसे ' पहांटेच्या गार झोंब-या वा-यानें तिचें शरीर कांपत होतें. ओठांचे कोपरे असहाय्यतेनें दुमडले गेले होते. ' (पृ.16) .

थोडक्यात - वरील सर्व विवेचनातून लेखिकेने कादंबरीत केलेले निसर्गचित्रण कथेच्या आशयास सुसंगत असेच केलेले दिसते. कादंबरीची अद्‌भुतता, गूढता वाढविण्यास ही निसर्गचित्रणे परिणामकारकपणे लेखिकेने चित्रीत केलेली दिसतात. निसर्गाकडे विशिष्ट भूमिकेतून पाहून त्याचे चित्रण कादंबरीत केलेले आहे. दंतकथेस अनुरूप अशी निसर्गचित्रणे लेखिका कादंबरीत करताना दिसतात.

सारांश - दुर्गा भागवत यांनी **महानदीच्या तीरावर** या कादंबरीत फूलिया या गोंड स्त्रीच्या जीवनातील गूढता, अद्‌भुतता चित्रीत केली आहे. फूलियाची शोकांतिका चित्रीत करीत असताना लेखिका फूलियाच्या व जंगोच्या कुटुंबाचे स्वरूप चित्रीत करतात. फूलियाच्या सासरी तिचा दीर घरातील सर्व जबाबदारी सांभाळतो. पती ऐतखाऊ असतो. घरातील सर्व कामे एकटया फूलियालाच करावी लागतात. जंगो, भीमाला घरातील कोणत्याही कामात मदत करीत नाही. बांसरी वाजविण्यात व दारू पिण्यात आपले आयुष्य (वेळ) घालवितो. शेवटी जलोदराने आजारी पडतो व त्यातच मरतो.

गोंडांना तीन तीन दिवस अन्न मिळत नाही. शरीर झाकण्यास पुरेसा कपडाही मिळत नाही. गोटुलाचे व जोडीदार मिळविण्याच्या गोंडांच्या पध्दतीवर प्रकाश टाकून दुर्गा भागवत गोंडांचे जीवनातील वेगळेपणा दाखवितात. गोंडांच्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरांचे चित्रणातून लेखिका गोंडांच्या अद्‌भुत व गूढ जीवनाचे दर्शन घडवितात. गोंडांचा मृतात्म्यावर विश्वास असतो. त्यामुळे त्यांच्या जीवनाला वेगळेपणा आलेला दिसतो. अंधश्रध्दांमधून त्यांचा अज्ञानीपणा, अडाणीपणाही लक्षात येतो. गोंड जमातीमध्ये जातपंचायतीचा निर्णय हा अंतिम निर्णय समजला जातो. यातूनही गोंड जीवनाचे वेगळेपण दृष्टीस पडते.

दुर्गा भागवत यांनी प्रस्तुत कादंबरीत पात्रांचे स्वभाव, त्यांचे अंतरमन व बाह्यवर्णनही केले आहे. फूलिया हे या कादंबरीतील प्रमुख स्त्रीपात्र होय. निष्कपटी, मायाळू, कृतज्ञ, सहनशील, उदारमनाची व पतीशी एकनिष्ठ राहणारी परंतु दिसावयास कुरूप, ओवडधोबड व मजबूत शरीर बांध्याची, बेलाच्या मत्सरी, मुत्सद्दी व सूड बुध्दीस बळी पडलेली अशी फूलिया लेखिका चित्रीत करतात. श्रध्दाळू, भावूक, अहंकारी, स्वार्थी परंतु नंतर मायाळू व प्रेमळ बनलेला जंगो तर चतुर धूर्त,

मुत्सद्दी, मत्सरी, स्वार्थी, सूड बुध्दीची व दिसावयास देखणी अशी बेला, धीर गंभीर, शांत, प्रेमळ, श्रध्दाळू, असा भीमा, फुलियावर जीवापाड प्रेम करणारी फुलियाची आई धनिया, स्वार्थी व कृतघ्न अशी माठी व लछमन अशी विविध स्वभावाची पात्रे चित्रीत केली आहेत. या सर्व पात्रांचे चित्रणातून आदिवासी जमातीतील लोक हे देखील मानवच होत. त्यामुळे मानवी भावभावना वृत्तिप्रवृत्ती या आदिवासींमध्ये इतर मानवांप्रमाणेच दिसतात. आदिवासींच्या रूढी, परंपरांना योग्य असेच ती पात्रे वर्तन करताना दिसतात. त्यामुळे आदिवासी जीवनाशी ती पात्रे अनुरूप वाटतात.

आदिवासी जमातीतील गोंड स्त्री पुरूषांचे संबंध खेळीमेळीचे असतात. विवाहापूर्वी गोंड तरूण तरूणींना एकमेकांशी संबंध ठेवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. मोठी भावजय धाकटया दिराशी अघळपघळपणे वागू शकते. परंतु धाकटया भावजयीशी मोठया दिराची वागणूक सास-यासारखी अलिप्त असते. पतीपत्नीमध्ये सलोख्याचे, प्रेमाचे संबंध असतात. गोंड स्त्री पुरूषातील परस्परसंबंध हे मुक्त स्वरूपाचे असतात.

गोंड या जमातीतील अंधश्रध्दा, त्यांचे अंधविश्वास, त्यांच्या रूढी-परंपरा, त्यांचा चेटूक, भूतबाधा व मृतात्म्यावरील विश्वास चित्रीत करण्यास दुर्गा भागवत यांनी अद्भुत, गूढ अशी वातावरणनिर्मिती कादंबरीत केली आहे.

कथेच्या आशयास अनुरूप अशी अद्भुतता व गूढता निर्माण करण्यास व ती वाढविण्यास निसर्गचित्रणे केलेली आहेत.

दुर्गा भागवत यांनी कादंबरीचे कथानक अगोदर ठरवून मग ही कादंबरी लिहिलेली दिसते. कल्पकता, अद्भुतता, अतिशयोक्ती व रंजकप्रधानता ही वैशिष्टये कादंबरीमध्ये दिसतात. दंतकथेचे हे सर्व विशेष कादंबरीमध्ये जाणवतात. कादंबरीचा आशय ठरवून ही कादंबरी लिहिल्याने ती वास्तवापासून दूर गेली आहे असे निदर्शनास येते.

xxxxxxxxxxxxxx

# प्रकरण चौथे : झेलझपाट कादंबरीचे विशेष

## ।। झेलझपाट कादंबरीचे विशेष ।।

तिस-या प्रकरणात आपण दुर्गा भागवत यांनी लिहिलेल्या ' महानदीच्या तीरावर ' या कादंबरीचा अभ्यास केला. या कादंबरीत फूलिया या गोंड युवतीची शोकांतिका दुर्गा भागवत यांनी सांगितली आहे. ती सांगताना ' गोंड ' या आदिवासी जमातीच्या अंधश्रध्दा, रुढी, परंपरा तसेच त्यांच्या समजुती यावर त्यांनी कसा प्रकाश टाकला आहे, याचा आपण परामर्श घेतला आहे.

प्रस्तुत प्रकरणात मधुकर वाकोडे यांनी लिहिलेल्या ' **झेलझपाट** ' (1988) या कादंबरीचा अभ्यास करणार आहोत. या कादंबरीमध्ये वाकोडे यांनी अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील कोरकू जमातीचे चित्रण केले आहे. ते कसे केले आहे, याचा आता परामर्श घेऊ.

**झेलझपाट या कादंबरीची आशयसूत्रे ...**

कोरकू जमातीच्या जीवनाचे, तेथील दारिद्रयाचे, नागर लोकांकडून होणा-या त्यांच्या शोषणाचे, नागर जीवनाशी संबंध आल्याने त्यांच्या जीवनात होत जाणा-या बदलाचे चित्रण प्रस्तुत कादंबरीमधून मधुकर वाकोडे यांनी केले आहे. त्याचबरोबर केरू आणि फुलय ह्या आदिवासी तरूणतरूणीच्या प्रेमकथेचे चित्रणही या कादंबरीत आले आहे. प्रेमकथेचे चित्रण करणे हे काही ह्या कादंबरीचे प्रमुख आशयसूत्र नाही. त्यामुळे ह्या कादंबरीत इतरही अनेक आशयसूत्रे आलेली आढळतात. या आशयसूत्रांनुसार कादंबरीतील घटना प्रसंगांचे चित्रण मधुकर वाकोडे यांनी मांडलेले दिसते. कादंबरीतील सर्व घटना-प्रसंगांमधून कोरकू लोकांच्या जीवनाचे समग्र दर्शन घडविण्याचा प्रयत्न, ह्या कादंबरीत करण्याचा प्रयत्न वाकोडे करतात. वाकोडे यांनी प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला आहे. त्यांच्यात सुधारणा व्हावी, त्यांचा आर्थिक, शैक्षणिक विकास व्हावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले आहेत. ते करीत असताना त्यांचा आदिवासी जीवनासी जवळून संबंध आला. तसेच त्यांना कोरकू लोकांच्या जीवनाची उत्तम त-हेने माहिती झाली, यामुळे कादंबरीतील चित्रणाला काही एक प्रमाणात वास्तव रूप प्राप्त झाले आहे असे दिसते. वाकोडे यांनी कोरकूंचे जीवन-चित्रण प्रस्तुत कादंबरीतून कसे केले आहे त्याचा परामर्श घेऊ.

**फुलयच्या कुटुंबाचे स्वरूप ...**

प्रस्तुत कादंबरीची नायिका फुलय ही कोरकू तरूणी होय. या कोरकू तरूणीच्या कुटुंबाचे स्वरूप वाकोडे यांनी चित्रित केले आहे. ते स्वरूप माहीत असणे प्रथम आवश्यक होय. यामध्ये

तिची झोपडी, तिच्या कुटुंबातील माणसे, फुलयची कुटुंबाची जबाबदारी, तिच्या झोपडीत येणा-या व्यक्ती, कुटुंबाची आर्थिक स्थिती याचा परामर्श घेऊ.

सलोन्याला जाणारा तारूबांदा दोन ढाण्यात विभागला आहे. एक गवळी ढाणा व दुसरा कोरकू ढाणा. कोरकू ढाणा दोन रांगात विभागला आहे. त्यातील डाव्या रांगेत केरूच्या झोपडीपासून फुलयची झोपडी सातवी आहे. कुडाच्या बांधलेल्या झोपडीत ती राहते. तिच्या झोपडीत फाटकी तुटकी अंथरुणं, बांबूच्या चटईच्या दोन खाटा, शिंके, चारदोन पितळेची भांडी, एक मातीची कणगी, चार दोन मातीची भांडी व चूल आहे.

मोपा हे तिचे वडील. मोपा सतत दारूच्या नशेत अंगणात पडून राहतो. तो कोणताही धंदा करीत नसतो. मोपाविषयी मधुकर वाकोडे लिहितात - ' गाईच्या थानाला गोचिड चिपकून बसतो तसा झोपडीच्या अंगणाला संध्याकाळपासून तो चिकटला होता.' ( पृ.5 ) या वर्णनावरून लेखक मोपाच्या निरोद्योगीपणावर प्रकाश टाकताना दिसतात.

फुलयची आई एकदा वैराटच्या रानात पहाटे मोहफुलं वेचायला गेली होती. तिची मैत्रिण जासो तिच्याबरोबर होती. त्यावेळी अस्वलाने फुलयच्या आईवर हल्ला केला होता. ती त्यातच मरते. रानातून तिचे प्रेतच घरी आणावे लागते. त्या दिवसापासून मोपा अधिकच दारू पिऊ लागतो. आदिवासींमध्ये घरातील ( कुटुंबातील ) सर्वच घटक काम करतात व पोट भरण्याचा प्रयत्न करतात. कुटुंब चालविण्यास सर्वच अशा प्रकारे मदत करतात. फुलयच्या कुटुंबात मात्र मोपाचा दारूडा स्वभाव व निरोद्योगीपणामुळे कुटुंबाची सर्वच जबाबदारी फुलयवर पडते. त्यामुळे आर्थिकदृष्टया हे कुटुंब खूपच दुर्बळ असते. या कुटुंबात फक्त दोनच माणसे आहेत. एक फुलय व दुसरा मोपा.

फुलय, मोपाचे व स्वतःचे पोट भरण्यास डोंगरातून मोहफुलं वेचून आणते. लाकडाच्या मोळया डोंगरातून आणून विकते. रस्त्यावरील कामास जाते. एकटीच कमवत असल्याने रात्री झोपडीमध्ये दिवा ( चिमणी ) लावण्यासही रॉकेल नसते. त्यामुळे चुलीतील ज्वाळेतून जेवढा प्रकाश पडतो, तेवढाच प्रकाश झोपडीत असतो. चूल विझल्यानंतर झोपडीला अंधार घेरतो. या चित्रणातून कोरकूंच्या दारिद्रयाचे प्रातिनिधीक स्वरूपाचे चित्रण लेखकाने केले आहे असे म्हणता येईल.

या दोघांच्या व्यतिरिक्त गौलखेडच्या बाजारला जाणारा कासम मण्यारीवाला फुलयचे झोपडीत येत असतो. फुलयशी लगट करण्यासाठी तो मोपाशी गोड बोलतो. त्याला मटण, दारूचे आमिष दाखवतो. कधी जेवण्याचे निमित्ताने, तर कधी पैसे मागण्याचा बहाणा करून झोपडीत येत असतो. फुलय तरूण आहे. तिला कोणाचाही आधार नसतो. अशा निराधार स्त्रिच्या असाहाय्यतेचा

फायदा उठविणारे कासम येथे खूपच असतात. हे आदिवासी जीवनातील वास्तव लेखक चित्रीत करतात.कोरकू ढाण्यातील केरू फुलयला लाकडं फोडून देण्यास मदत करतो. मासळया पकडण्यास बरोबर नेत असतो. फुलयचे केरूवर प्रेम असते.

थोडक्यात - फुलयच्या कुटुंबात फुलय व तिचा बाप अशी दोनच माणसे आहेत. बाप कोणतेही काम करीत नाही. त्यामुळे कुटुंबाची सर्व जबाबदारी एकटया फुलयवरच असते.

**केरूच्या कुटुंबाचे स्वरूप ...**

प्रस्तुत कादंबरीचा केरू हा नायक होय. वाकोडे यांनी त्याच्या कुटुंबाचे स्वरूप कादंबरीत चित्रीत केले आहे. या चित्रणा आधारे केरूची झोपडी, कुटुंबातील माणसे, त्यांचे उद्योग, कुटुंबाची आर्थिक स्थिती या मुद्यांचा परामर्श घेऊ.

केरू हा कोरकू ढाण्यात राहणारा कोरकू तरूण आहे. कोरकू ढाण्यात झोपडयांच्या दोन रांगा आहेत. त्यातील डाव्या रांगेत फुलयच्या झोपडीपासून सातव्या झोपडीत केरू राहतो. त्याच्या वडिलांचे नाव तुमला पटेल. केरूपेक्षा लहान भाऊ भिमला व बहीण सुंदन आणि त्याची आई अशी पाच माणसे या कुटुंबात राहतात. भिमला कोरकू ढाण्यातील अंगणवाडीत इयत्ता चौथीमध्ये शिकतो आहे. सुंदन ही इयत्ता दुसरीत शाळेत जाते. केरू आपल्या वडिलांपासून अनेक हरहुन्नर (कला) शिकला आहे. गुल्लरचा अचूक मारा करणे, बासाच्या कमच्यांपासून वस्तू तयार करणे, विविध प्रकारांनी मासे पकडणे या गोष्टीत तो तरबेज आहे. केरू मॅट्रिकपर्यंत शिकलेला असतो. त्यास पुढे शिकण्याची इच्छा असते. पण पुस्तके कोरकू भाषेत नसल्याने त्याचे मन शाळेत रमत नाही. मॅट्रिक नापास होतो व शिक्षण सोडतो. कोरकू ढाण्यात तो एकटाच एवढा शिकलेला आहे. या उल्लेखातून कोरकूंना शिक्षण घेण्याची आवड निर्माण होण्यास त्यांच्या बोलीभाषेतून शिक्षणाची सोय होण्याची गरज आहे. ही समस्या लेखक वाचकांच्या निदर्शनास आणून देतात. तसेच कोरकू आता शिक्षण घेवू लागले आहेत यावरही ते प्रकाश टाकतात.

केरूचे फुलयवर प्रेम आहे. तो तिला जमातीचे रिवाजानुसार पळवूनही नेऊ इच्छित नाही व त्याला लांबजाना होण्याची इच्छा नसते. आदिवासी समाजात मुलाने मुलीला हुंडा द्यावा लागतो. हुंडा देण्याची ऐपत नसल्यास, मुलीचे घरी म्हणजेच सासुरवाडीत जातपंचायतीने ठरविलेला हुंडा फिटेपर्यंत कष्ट करावयाचे, यास आदिवासींमध्ये लांबजाना होणे असे म्हणतात. केरू हुंडा देण्याची ऐपत

SHIVAJI KOLHAPUR

आल्याशिवाय फुलयशी लग्न करणार नसतो. या त्याच्या सुशिक्षित विचारावर वाकोडे प्रकाश टाकतात.

केरूच्या कुटुंबात कोंबडया पाळणे, बांबूच्या कमच्यापासून वस्तु तयार करणे, मासळया पकडणे हे उद्योग करून, कुटुंबाचे पोट भरण्याचा प्रयत्न केला जातो.

लेखकाने केलेल्या वर्णनावरून केरूच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती इतर कुटुंबियांपेक्षा बरी असावी असे दिसते. त्यामुळे इतर कोरकू कुटुंबाप्रमाणे उपासमारीची वेळ त्यांचेवर येत नसावी असे म्हणण्यास हरकत नाही. इतर कोरकूंपेक्षा जास्त शिकलेल्या केरूस, अर्थात कोरकूंना, रहिमशेठ, कासम मण्यारीवाला इ. जांगडी ( नागर लोक ) कसे लुबाडत आहेत. त्यांच्या अज्ञानाचा कसा फायदा घेत आहेत हे त्यास समजते. त्यामुळे तो बेचैन होतो. केरू चौकस बुध्दीचा आहे. त्याच्या चौकस बुध्दीचे चित्रण वाकोडे अनेक प्रसंगातून करतात. उदा. आदिवासी सहकारी सोसायटीतुन अंगठा उठवून दोन रुपये घेवून जाणा-या बायका तो पाहतो. त्याची आईही त्यात असते. हा प्रकार काय आहे हे जाणून घेण्याचा तो प्रयत्न करतो.

थोडक्यात-केरूच्या कुटुंबात एकूण पाच माणसे आहेत. तसे हे कुटुंबही लहान आहे. या कुटुंबातील पुरूषांचे अंगी अनेक कला दिसतात. कोंबडया पाळण्याचा दुय्यम व्यवसायही ते करताना दिसतात. शिक्षण घेण्याजोगी अनुकूल परिस्थिती दिसते. त्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बरी आहे हे एकूण वर्णनावरून दिसते. केरूच्या कुटुंबाचे चित्रणावरून कोरकूंमध्ये शिक्षण घेत असलेली सुशिक्षित कुटुंबे आहेत, अनेक उद्योग व कलाकुसर करून जीवन जगणारी कुटुंबे आहेत, यावर वाकोडे प्रकाश टाकतात. केरूचे फुलयवर प्रेम असते. जमातीचे रिवाजानुसार तो तिला पळवून नेवू शकतो. पण तो तसे करीत नाही. लांबजानाही होवू इच्छित नाही. यावरून केरूला कुटुंबामध्ये वैचारिक स्वातंत्र्य आहे, असे दिसते.

**कोरकू लोकांच्या जीवनाचे चित्रण ...**

मधुकर वाकोडे यांनी ' **झेलझपाट** ' या कादंबरीत कोरकू जीवनाचे चित्रण केले आहे. कोरकूंचे दारिद्र्य, कृषीजीवन, मासेमारी, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, सणसमारंभ, विवाहपद्धती, जातपंचायत या मुद्यांचे आधारे वाकोडे यांनी प्रस्तुत कादंबरीमध्ये कोरकू जीवनाचे चित्रण कसे केले आहे याचा परामर्श घेऊ.

BARR. BA... LIBRARY
SHIVAJI ... KOLHAPUR

**दारिद्रयाचे चित्रण ...**

मधुकर वाकोडे प्रस्तुत कादंबरीमध्ये अनेक प्रसंगाद्वारे कोरकूंच्या दारिद्रयाचे दर्शन वाचकांना घडवितात. आदिवासी आपले पोट निसर्गामध्ये मिळणारी फळे, फुले खाऊन भरतात. माघ महिन्यात मोहफुलांचा हंगाम असतो. ही मोहफुले कोरकू गोळा करतात, वाळवून ठेवतात, ती महिनाभर खातात. त्यावेळी कोदो, कुटकी यासारखी धान्ये त्यांना मिळत नाहीत. याचवेळी होळीचे वेध त्यांना लागतात. महिनाभर मोहफुलांशिवाय त्यांना दुसरे अन्न खावयास मिळत नाही. या त्यांच्या दारिद्रयाचे वर्णन करताना वाकोडे लिहितात - ' कोरकूंच्या बहुतेक झोपडीत ज्वारी दळण्यासाठी दगडी जातं रोवलेलं असतं पण त्याच्या तोंडात महिनोगणती घास पडत नाही. कोदो, कुटकी, सावाही गवती धान्ये दळण्यासाठी हलकीफुलकी मातीची घट्टी. चिकनमाती, गवत आणि शेण याच्या मलिद्याची चांगली मरम्मत करून ह्या घट्टया बायांनी तयार केलेल्या असतात. याच मलिद्यापासून तयार केलेल्या कणग्या तर फारच देखण्या असतात. पण कोरकूंच्या पोटासारख्याच रिकाम्या.' ( पृ.9 ).

या वर्णनावरून कोरकूंच्या कलात्मकतेचे, सर्जनशीलतेचे, सौंदर्यदृष्टीचे दर्शन आपणास घडते. तद्वतच त्यांच्या दरिद्री जीवनाची ओळख पटते. चार चार दिवस उपास काढणे हा त्यांच्या सवयीचा भाग होऊन गेलेला असतो. फुलय मोहफुलं वेचण्यासाठी डोंगरात जाते. त्यावेळी फडक्यांत शिदोरी बांधून घेते. या शिदोरीत फुलयने ' मिर्च्यासोबत दोन भाकरी फडक्यात बांधून डालकीत टाकल्या होत्या.' (पृ.4). अशा प्रकारे लेखक कोरकूंच्या गरिबीवर प्रकाश टाकतात. ' भाजलेल्या वांग्यावर मीठमिरच्या टाकून जेवली. ' ( पृ.38 ) या गोष्टीवरून कोरकूंच्या विपन्नावस्थेचे दर्शन वाचकांना घडते. या भाकरीही कित्येकवेळा त्यांना मिळत नाहीत. अशावेळी फक्त भात शिजवून पोट भरावे लागते. तोही पुरेसा नसतो. बापाने भात मागताच रात्रीचा भात फुलय त्याच्यापुढे ठेवते व आपण उपाशी बसते. या उल्लेखावरून लेखक कोरकूंना पोट भरण्यास पुरेसे अन्न मिळत नाही, उपाशीही रहावे लागते. याचे दर्शन वाचकांना घडवितात. गवताचा भारा घेवून केरू घराकडे गेलेला फुलय पाहाते व तेवढयात ' झोपडीतील धान, कोदो, सावा कुटकी सफा झाली होती. दोन ओंजळी भरतील एवढं ज्वारीचं पीठ शिल्लक असल्याचं तिला आठवलं.' (पृ.54) या वर्णनातून लेखक कोरकूंच्या दारिद्रयाचे चित्रण अधिक स्पष्ट करतात.

कोरकूंना पुरेसे कपडेही मिळत नसल्याचा उल्लेख या कादंबरीत वाकोडे यांनी वारंवार केला आहे. फुलय डोंगरातून मोहफुलं वेचून येते. डोंगरावर जातानाच डोमकावळयाने तिच्या शिदोरीवर झडप घातलेली होती. त्यामुळे दिवसभर मोहफुलांशिवाय तिच्या पोटात कांहीही नव्हते. त्यावेळी अंगणात मोपा तिची वाट पाहात बसलेला होता. त्याने पाण्याचा गुंडही भरून ठेवलेला नव्हता. फुलय रागाने दोर, बकेट व गुंड घेवून विहीरीवर जाताना मोपाकडे रागाने बघते. त्यावेळी लेखक वाचकांचे लक्ष मोपाकडे वेधतात व लिहितात - ' पन्नाशी उलटलेल्या मोपानं डोक्यावरील टोपीचं शिपतर काढून गुढघ्यावर ठेवलं. त्या फाटक्या टोपीचा वास त्याच्या नाकाला झोंबल्यानं त्यानं ते शिपतर पुन्हा डोक्यावर ठेवलं, अंगात फाटलेला ढगळ खमीस. पोटात फाळ घुसलेल्या रानडुकराची जशी आतडी लोंबकळतात तशी त्याच्या धोतराची चिरगुटं झाली होती.'(पृ.5) मोपाच्या या वर्णनावरून कोरकूंना अंगावर घालण्यास नीटसा धडका कपडाही नसतो. एकच कपडा असल्याने तो कित्येकवेळा धुतलाही जात नाही. या गोष्टीवर लेखक प्रकाश टाकतात. त्याचबरोबर अंगावरील फाटक्या कपडयाचे वर्णन करून त्यांच्या दारिद्रयाचे दर्शन वाचकांना घडवितात. अंग झाकण्यास कपडा नसणा-या कोरकूंना अंथरूण कुठले ? नेसत्या अंगावरचा कपडाच अंथरूण म्हणून ते वापरताना दिसतात. लेखक लिहितात - ' नेसत्या लुगूचा पदर जमिनीवर अंथरून ती दाराशी डोकं करून लवंडली. ' (पृ.38) या वर्णनावरून लेखक कोरकूंच्या दारिद्रयाचे दर्शन घडविताना दिसतात. अंगावरील कपडा धुवायचा झाला तर अर्धा अंगावर ठेवायचे, अर्धा धुवायचे, वाळवायचे, ते वाळले की नेसून राहिलेला वस्त्राचा अर्धा भाग धुवायचा व मग नेसावयाचा. फुलय केरूने आणलेल्या साबणाने स्वतःचे लुगडे या पध्दतीने धुते. असा उल्लेख लेखक करतात. नदीवर कोणी नसेल तर कोरकू स्त्रिया अंगावरील लुगडे कसे धुतात, याचेही वर्णन लेखकाने परिणामकारक शब्दात केले आहे. केरूसोबत लुगडे धुण्यास आलेल्या फुलयच्या मनात येते - ' केरू नसता तर नागडयानं आंघोळ करता आली असती आणि काठावरचं लुगडं सुकेपर्यंत पाण्यात बसून लाज झाकता आली असती. ' (पृ.39). या उल्लेखावरून वाकोडे कोरकूंना लाज राखण्यास एकच वस्त्र असते यावर प्रकाश टाकतात. वरील सर्व वर्णनावरून कोरकूंना पुरेसे कपडेसुध्दा मिळत नाहीत ही गोष्ट लेखक वाचकांच्या निदर्शनास आणतात.

उघडया निसर्गाच्या सानिध्यात कुडाने बांधलेल्या घरात कोरकू आपला निवारा शोधताना दिसतात. खावयास पुरेसे अन्न नाही, अंगावर धडसे वस्त्र नाही अशा कोरकूंच्या घरात आवश्यक तेवढयाच वस्तू असणार । त्यांच्या झोपडीतील वस्तुंचे वर्णन लेखक करतात. फुलय पहाटेच

रानातून लाकडाची मोळी घेवून घरी येते. निवांत मधल्या खांबाला टेकून ढाण्यातील हालचाली पाहात बसते. त्यावेळी वाकोडे ढाण्यातील हालचालींबरोबर तिच्या घरातील वस्तुंचे वर्णन करताना लिहितात - ' तिच्या झोपडीत लाकडी ठुण्यांच्या घडवंचीवर फाटकी तुटकी अंथरूणं ...... बांबूच्या चटईच्या दोन खाटा....... आढयाला टांगलेले शिंके....... चारदोन पितळी भांडीकुंडी....... एक मातीची कणगी........ कोप-यात चार दोन मडक्यांचा पसारा आणि चुलीचा खंडारा. ' (पृ. 52) या वर्णनावरून लेखक कोरकूंच्या गरिबीवर प्रकाश टाकताना दिसतात. अशा या कोरकूंजवळ चिमणी (दिवा) असते. पण त्यात घालण्यास रॉकेल नसते. अशी एकूण परिस्थिती असते.

वरील तपशीलांवरून अन्न, वस्त्र, निवारा या तीन प्राथमिक गरजाही भागविण्यासारखी कोरकूंची स्थिती कशी नव्हती हे लेखकाने वाचकांचे निदर्शनास आणून दिले आहे.

त्यांच्या जीवनातील या दयनीयतेमुळे व्यसनाधीनतेसारख्या ज्या इतर गोष्टी येतात त्यांचे वर्णन लेखकाने परिणामकारकतेने केलेले दिसते. व्यसनाधीनता हा त्यांच्या जीवनाचा इतका स्वाभाविक भाग बनून गेला आहे की, दारू पिणे कोरकू निषिद्ध मानत नाहीत. दारूच्या मोहापायी सर्व कुटुंबाची, त्यांच्या आरोग्याची वाताहात कशी होते, याचे चित्रण वाकोडे करताना दिसतात. ' दारूच्या मोहापायी घरातील मोह....धान.....तूर.....मिरची गेली होती. इंधनाच्या मोळया वाहणा-या सा-या बायकांची पेकाटं झिलप्यागत झाली होती. दिवसभर पोरं सश्याची बिळं..... मधमाशांची पोळं हुसकत होती.' (पृ.61) या विवेचनावरून कोरकूंचे घरात अगोदरच काही नसते आणि जे आहे ते सुध्दा दारूच्या नशेपायी घालवून बसतात. पाणथरीसारखे रोग त्यांना होतात. यावर लेखक प्रकाश टाकतात. घरात कांहीच नसल्यामुळे घराला कुलूप लावून ज्याचे संरक्षण करावे असे कांही घरात उरतच नाही. झोपडीचे वर्णन करताना लेखक लिहितात - ' माथ्यावरचा कोरकू ढाणा म्हणजे तीसचाळीस गवती झोपडयांच्याअमोरासमोर दोन रांगा, मधोमध खूप रूंद रस्ता, सागाची पानं.... गवत यांनी शाकारलेल्या झोपडयांना मागेपुढे अशी दोन दोन दारं होती. झापांनी बंद करता येण्यासारखी. कडीकोयंडा.....कुलूपकिल्ली यांचा विटाळ झोपडयांना असल्यानं माणसावरील भरोसा कायम होता. ' (पृ.4) लेखकाने कुलूप न लावण्याच्या या कल्पनेतून त्यांचा मानवतेवर असलेला विश्वास प्रकट केला असला तरी वस्तुस्थिती अशी दिसते कीं, कुलूप लावण्याइतके मौल्यवान असे त्यांच्या घरातच काही नाही. खाण्या पिण्याचे पदार्थ सुध्दा उरलेले नाहीत. गवत व पाने यांनी बांधलेल्या घराला कडी व कोयंडा लावयाचा तरी कोठे ? म्हणजेच मुळात कुलूप लावण्याजोगे घरही

नाही. आणि कुलूप घेण्याजोगी परिस्थितीही नसते. म्हणून त्यांच्या घराला कुलूप नाही ही खरी वस्तुस्थिती दिसते.

थोडक्यात - कोरकूंच्या अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजाही नीट भागतील अशी त्यांची परिस्थिती नसते. त्यातच दारू सारखे व्यसन त्यांच्या दारिद्र्यामध्ये अधिकच भर घालीत असते. दारिद्र्य हा त्यांच्या जीवनाचा एक भागच बनून गेलेला दिसतो.

**कृषी जीवनाचे चित्रण ...**

वरील प्रमाणे एकूण दारिद्र्यावस्थेत जगणारे कोरकू, आपला उदरनिर्वाह जेमतेम असलेली डोंगर कपारीची शेती कसूनच करताना दिसतात. हे त्यांचे शेती कसणेही किती अवघड काम आहे याचे वर्णन करताना मधुकर वाकोडे लिहितात - ' दोन्ही टेकडयांवरील झाडांची बेसुमार कत्तल झालेली. ह्या उजाड टेकडया सन्याशाच्या तासलेल्या डोकीसारख्या भगभगीत दिसतात. टेकडयांच्या घसरगुंडीवर कोरकूंची जीवघेणी मशागत. टेकडयांवरील ही चौकोनी कापासारखी वावरं बर्फीकापांच्या चळतीसारखी दिसतात. सर्कशीच्या तंबूवर फिरणं सोपं पण ह्या टेकडयावर पेरणं कठीणच. ह्या टेकडयांतून कोरकू कोदो.... कुटकी.....ज्वारी काढतात. आणि हंगामावर झेलवाले बेपारी त्यांना झपाटतात.' (पृ.2) कष्ट करूनही शेतातील उत्पन्न तुटपुंजे असते. निकृष्ट दर्जाचे शेतीमुळे कष्टाचाही उपयोग होत नाही. किमान दोन वेळ जेवणाची गरज भागेल इतकेही धान्य मिळत नाही. जे मिळते ते कोरकूंच्या हातून सावकार व्यापारी हिसकावून घेतात.

थोडक्यात - कष्ट करणे, कर्जबाजारी होणे आणि उपाशीपोटी राहणे हेच कोरकूंचे नित्याचे जीवन असल्याचे दिसून येते.

**मासेमारीचे चित्रण ...**

निकृष्ट दर्जाचे शेतीत राबूनही कोरकूंना पुरेसे धान्य मिळत नाही. जे मिळते तेही सावकार, व्यापारी लुबाडडतात. त्यामुळे निसर्गामध्ये उपलब्ध असलेल्या गोष्टीवरच त्यांना आपले पोट भरावे लागते. मासळया पकडण्यासाठी कोरकू अनेक पध्दतींचा वापर करतात. मासे पकडणे हा कोरकूंचा आवडता उद्योग होय. मासळी पकडणे हा कोरकूंचा स्वभावधर्म होय. या कोरकूंच्या स्वभावाचे व मासे पकडण्याच्या त्यांच्या विविध पध्दतीचे उल्लेख वाकोडे यांनी केले आहेत. शंकर

गवळयाच्या शेतातील जागरणाचे काम संपलेले असते. ' सकाळपासनं केरू मासळया पकडण्यासाठी सीपनाच्या काठानं हिंडत होता. कोरकूंचा स्वभावधर्म त्यांच्यात पुरेपूर उतरला होता. दहा रूपये मजुरी जरी दिली तरी कोरकू कामावर जाणार नाही. जर त्याच्या डोक्यात मासळयांचा विचार असला तर. दिवसभर नदीतील डोबा हुसकून बचकभर मासळया आणील पण मजुरी करणार नाही. आणि केरू तर किती तरी प्रकारानं मासळया पकडू शकत होता, कधी हाण्डोरनं..... कधी पालानं.... कधी लुबूनं.... कधी वासानं तर कधी हातगोला फोडूनही..... आज त्यानं थैलीत हातगोले आणले होते. ' (पृ. 94) या वर्णनातून मधुकर वाकोडे कोरकूंच्या मासळया पकडण्याच्या आवडत्या उद्योगाचे दर्शन वाचकांना घडवितात.

थोडक्यात - कोरकूंचा मासळया पकडणे हा स्वभावधर्म होय. त्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची त्यांची तयारी असते.

**अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचे चित्रण ...**

दारिद्रयावस्थेत, विपन्नावस्थेत कोरकू जीवन जगतात हे आपण वर पाहिले. असे हे कोरकू धार्मिक मनोवृत्तीचेही असलेले दिसतात. देवधर्म, जादूटोणा, रूढी, परंपरा अशा गोष्टींवर त्यांचा मोठा विश्वास दिसतो. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा हा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला दिसतो. मधुकर वाकोडे यांनी प्रस्तुत कादंबरीमध्ये कोरकूंच्या या गोष्टींवर विविध प्रसंगातून प्रकाश टाकलेला आहे. जसे - ' गाव शीवेलगत एका चिंचेच्या मोठया झाडाखाली मुंडाचं ठाणं. अवतीभोवती नाग, प्रतिमा. हे नाग....मूंड कोरकूंचे पितर. माथ्यांवर सूर्य प्रतीक... मागच्या बाजूस चन्द्रकोर. लाकडाच्या गाभ्यात घोडयावर स्वार झालेला पितर आणि मुठवाभर नृत्य करणा-या मानवी आकृती कोरलेल्या. ' (पृ.2) या उल्लेखावरून मधुकर वाकोडे यांनी कोरकूंचा जवळून अभ्यास केला आहे याची जाणीव होते. कोरकूंमध्ये मानवाचे मृत्यूनंतर जंगलातून झाड तोडून आणतात व त्यावर घोडेस्वार, व्यक्तीचा कान, धनुष्यबाण, सूर्य, चंद्र कोरतात. त्याची पूजा करतात. याप्रकारचे ठाणे त्यांचे गावाच्या शीवेवर असते. लग्नसमारंभाचेवेळीही या ठाण्याची भूमकामार्फत पूजाविधी करतात. वरील वर्णनातून वाकोडे कोरकूंचा मृत आत्म्यावरील असलेला विश्वास, त्यांच्या रूढी परंपरावर प्रकाश टाकतात.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पूजाविधी, मंत्रतंत्र, मृतात्मे यावर कोरकूंची जशी श्रद्धा दिसते तद्वतच देवीला बळी देण्याच्या प्रथेवरही विश्वास असलेला दिसतो. बैराटची देवी हे कोरकूंचे श्रद्धास्थान. चैत्रातील अमावास्येस देवीचे दर्शन घेण्याची संधी त्यांना मिळणार होती. ऐपत नसताना नवस फेडण्याची, बोकड बळी देण्याची ते तयारी करीत होते. लेखक परिणामकारक शब्दात लिहितात - ' देवीदर्शनासाठी काही कोरकूंनी रहिमसेठकडून पैसे व्याजानं आणले होते. तर कुणी चांदीचे दागिने..... तांब्या-पित्तळेची भांडी खंडेलवालच्या दुकानात गहाण ठेवून पूजेचं सामान आणलं होतं. कुणी अकरा... तर कुणी एकवीस नारळं. ऐपत नसूनही बळी देण्यासाठी एकट दुकट बोकड आता ढाण्यात येवू लागलं होतं. दिवसभर ढोरा..... वासरांत चरणा-या त्या बोकडाला उद्याची फिकीर नव्हती. बोकड बळी जाणार होते कोरकूंच्या हातून...... आणि कोरकू जाणार होते जांगडींच्या हातून.' (पृ.88) या उल्लेखावरून लेखक कोरकूंच्या नवससायासावर असलेल्या विश्वासाचे दर्शन घडवितात. यातून कर्ज काढून सण करण्याची त्यांची वृत्ती दिसते. देवीला बळी दिल्यास तिची कृपादृष्टी आपल्यावर राहील अशी श्रद्धा त्यांच्यात दिसून येते. बळी देण्यासाठी घरातील वस्तू गहाण टाकतात. देवीला केलेला नवस फेडला नाही तर देवीची अवकृपा होईल अशी भिती त्यांना वाटते, त्यासाठी वाट्टेल ते करून केलेला नवस फेडतात. देवीचे देऊळात जावून दर्शन फक्त याच दिवशी घेता येते इतर दिवशी नाही. ही गोष्ट लेखक वाचकांच्या निदर्शनास आणतात. या प्रसंगातून लेखक कोरकूंची अंधश्रद्धा, अंधविश्वास, बळी देण्याची प्रथा यावर प्रकाश टाकतातच, शिवाय त्यांच्या अज्ञानामुळे रहिमशेठकडून ते कसे बळी जातात, कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांच्या कष्टाचा, घामाचा थेंब न थेंब आपल्याला कसा मिळेल यासाठी रहिमशेठ प्रयत्न करतो, जणुकाही तोही या रूपात कोरकूंना बळीच देत असतो, बोकडाप्रमाणे याची जाणीव कोरकूंना नसते, या सर्व गोष्टींचे लेखक वाचकांना दर्शन घडवितात. मालाय देवीदर्शन घेऊन मगच सासरी (हरिसालला) जाणार असते. या उल्लेखावरून लेखक कोरकूंच्या भावूक वृत्तीवर व अंधविश्वासावर प्रकाश टाकतात.

आदिवासींच्या प्रत्येक जमातीमध्ये निरनिराळे ' भूमका ' असतात. यांना ' परिहार ' असेही म्हणतात. याचाही उल्लेख वाकोडे यांनी कांदबरीत केलेला दिसतो. भूमकांना वाघ वश असतात अशी त्यांची समजूत दिसते. त्यामुळे मंत्रतंत्राच्या जोरावर वाघासारखा प्राणी आपण आपल्या ताब्यात (काबूत) आणू शकतो अशी त्यांची समजूत आहे. त्यामुळे ते वाघाला भीत नाहीत. उलट त्यांचा वाघाविषयी भक्तीभाव आढळतो. लेखक लिहितात - ' ह्या जंगलच्या राजाचं खरं प्रेम जंगलच्या राजावर..... वाघावर. वाघ उमदा....शूर....भरवश्याचं जनावर. त्याच्याविषयी

त्याला भक्तिभाव वाटत आला. जादू.... मंतरतंतराच्या जोरावर त्याच्या दाढा आपण बांधू शकतो. वाघमामाकरवी गावचं आखरण करून वस्ती सुरक्षित ठेवू शकतो. हा त्यांना विश्वास होता. पण अस्वलांनी त्यांना अस्वस्थ केलं होतं. ' (पृ.13) या विवेचनावरून लेखक कोरकूंच्या मंत्रतंत्रादर असलेल्या अंधविश्वासाचे दर्शन घडवितात. वाघावर असलेल्या त्यांच्या श्रध्देमुळेच गज्या गवळयाची गाय वाघाने मारली हे ऐकताच कोरकूंना आश्चर्य वाटते. त्यावेळी कोरकूंच्या मनात येते - ' वाघदेवाची पूजा तर पार पडते.... वाघमामा वाघाच्या दाढा बांधतो.... शिवेला आखाण देतो.... पण तरीही वाघानं गाय मारली कशी ? वाघमामाचा मंतर बोथट झाला की दुनियेचा तंतर बिघडत चालला हा गुंता त्यांना मोकळा करता येत नव्हता.' (पृ.55) या विवेचनावरून लेखक कोरकूंची वाघदेवावरील श्रध्दा प्रकट करतातच. शिवाय भूमकाच्या मंत्रतंत्रावरील त्यांचा अंधविश्वासही प्रकट करतात. अज्ञानामुळे, वाघमामाची पूजा तर पार पडते. मग भूमकाचा मंत्र खोटा (बोथट) ठरला की काय ? हा प्रश्न ते सोडवू शकत नाहीत. ही त्यांची संभ्रमावस्था लेखक वाचकांच्या निदर्शनास आणून देताना दिसतात. मधुकर वाकोडे भूमकावरील विश्वाससंबंधी पुढील प्रसंग चित्रीत करतात - मालाय ही बुडाहिराजीची मुलगी. लांबजान्याबरोबर म्हणजेच तिच्या नव-याबरोबर बाजारला जाते. तेथे ती जयस्वालच्या दुकानातील देशी दारू पिते. देशी दारूची नशा तिला चढते व तिची शुध्द हरपते. तिचा लांबजाना सोमा पटेलच्या बंडीत टाकून तिला घरी आणतो. दारूमुळे तिची शुध्द गेली आहे असे कोरकूंना वाटत नाही. ती बेशुध्द होवून खाली पडली याचा अर्थ, कोरकू, मालायला भूताने झपाटले असा घेतात. भूमकास-परिहारास बोलावतात. हा भूमका काय करतो याचे परिणामकारक चित्रण लेखकाने केलेले आहे.. ' भूमका आला. त्यानं नाक डोळे पाहून बुडाहिराजीला सांगितलं, इजीकेन भूत घाईकेन. हिला भूतान झपाटलं आणि भूतापासून तिला सोडविण्यासाठी विचित्र मंत्र बडबडू लागला. तांदळाच्या मुठी फेकू लागला. दारूची नशा उतरल्यावर जेवण राती मालाय शुध्दीवर आली. भूत पळून गेल्याचं सर्वांना समाधान वाटलं. जयस्वाल सारख्या भूतांच्या कच्छपी आपण लागलो हे मात्र त्यांना कळत नव्हतं.' (पृ.22) या प्रसंगातून वाकोडे कोरकूंचा मृत आत्म्यावरील असलेला विश्वास यावर प्रकाश टाकतात. शिवाय या प्रसंगातून कोरकूंना मालाय भूमकाच्या मंत्रामुळे उठून बसली असे वाटते. परंतु मंत्र चालू असतानाच योगायोगाने मालायची नशा उतरते व ती उठून बसते. त्यामुळे कोरकूंचा भूमकांवरील विश्वास अधिकच दृढ होतो. परंतु हे मृत आत्म्याचे भूत नसून जयस्वालच्या दुकानातीलच देशी दारूचे भूत आहे हे कोरकूंना समजत नाही. वाकोडे या चित्रणातून कोरकूंच्या अंधविश्वासाबरोबरच त्यांच्या अज्ञानाचे दर्शन वाचकांना घडवितात.

कोरकूंचा जेवढा विश्वास मंत्रतंत्र, भूमका यावर दिसतो तेवढा दवाखान्यातून मिळणा-या औषध पाण्यावर नसतो. त्यामुळेच जंगलातील वनस्पती, झाडपाला व निसर्गातील इतर वस्तू रोग बरा करू शकतात असा त्यांचा विश्वास असतो. बाजारात कोरकू सावली माशाचे तुकडे विकत घेत होते. कारण ' मुतखडयाचा विकार असलेल्या माणसानं तो खडा उगाळून त्याचं चाटण घेतलं की त्याची लघवी, मोकळी होते. हा कोरकूंचा अनुभव होता. मटणापेक्षा मासळीचा खप अधिक होत होता.' ( पृ.47 ) या उल्लेखातून निसर्गातील वस्तूंमुळे रोग बरे होतात या कोरकूंच्या समजूतीचे, विश्वासाचे दर्शन लेखक वाचकांना घडवितात. आसरामाय समोरील मंचागाभोवती ( पाराभोवती ) विठू, गज्या गवळी, तानू, बलई गप्पा मारीत बसलेले असतात. त्यावेळी अस्वलांवर विलाज जाणणारा रंगू बेलीतील बाणाथोटा अस्वलांना मंत्राच्या सामर्थ्यावर कसा जमा करतो, याविषयीच्या कथा तानू सांगतो. त्याबरोबरच मुलंबाळं होण्यासाठी अस्वलीच्या नाजूक भागाचा तुकडा कापून त्यावर मंत्र कसा टाकतो इ. वर्णने करून तानू गोष्टी सांगतो. तानूच्या तोंडून सांगितलेल्या कथांच्या विवेचनावरून वाकोडे कोरकूंच्या भोळया समजूतींवर प्रकाश टाकतात.

अत्यंत दरिद्री जीवन जगत असूनही हे लोक श्रध्दाशील मनोवृत्तीचे असतात. त्यामुळेच कोरकू दिवाळी, होळी, रांडभवई, पोळा, जिरोजी हे सण साजरे करतात. होळी हा सण कोरकू मोठया थाटाने साजरा करतात. रंगीबेरंगी कपडे घालून स्त्री - पुरूष एकत्र नाचतात. टिमकी, ढोल, झांज, बासरी इ. वाद्ये वाजवितात. फाग (बक्षिसी) मागतात. हे सर्व उल्लेख वाकोडे यांनी कांदबरीत केलेले आहेत. तसेच कोरकूंची होळी, होळीपौर्णिमेच्या दुसरे दिवशी पहाटे पेटते कारण जांगडीसारखी ( नागर लोकांप्रमाणे ) आपणही होळी पेटवावी असे कोरकूंच्या पूर्वजांना वाटले. म्हणून ते लाकडे आणण्यासाठी रानात जातात. दुपारपासून संध्याकाळपर्यंत लाकडे तोडतात. घरी जाताना थकवा आला म्हणून बरोबर नेलेली दारू पितात. दारूची नशा त्यांना चढते. दुसरे दिवशी पहाटे लाकडे घेवून घरी येतात. मुखिया पहाटे होळी पेटविण्याचा आदेश देतो. नंतर त्यांची होळी पेटते. तेव्हांपासून कोरकूंची होळी होळीपौर्णिमेच्या दुसरे दिवशी पेटते. होळीचे वेळी शिकार करतात व ती शिकार सर्वजण मिळून खातात. त्यांच्या या परंपरेवर लेखक प्रकाश टाकतातच शिवाय यातून त्यांच्या शिकारी वृत्तीचेही दर्शन घडवितात. तसेच कोरकू स्त्री - पुरूष एकत्र नाचतात. या प्रथेचेही ते दर्शन घडवितात. दिवाळी सणाला ज्याप्रमाणे नागर संस्कृतीतील लोकांमध्ये नवे कपडे घालण्याची प्रथा

आहे. तद्वतच कोरकू होळी पौर्णिमेला नवे कपडे घालतात. परंतु अतिशय दारिद्र्यावस्थेत जीवन जगत असूनही ते होळी सण साजरा करण्यासाठी नवे कपडे घेतात हेच त्यांचे विशेष होय.

' गोंदण ' हा कोरकूंच्या स्त्री जीवनाचा अविभाज्य भाग होय. या गोंदणाविषयी असलेल्या कोरकूंच्या समजुतीवरही लेखक प्रकाश टाकतात. गोंदले नाही तर परमेश्वर भुताच्या रूपात पुढील जन्मी पृथ्वीवर पाठवून देतो. या कोरकूंच्या समजुतीवर ते लक्ष वेधतात. मृत्यूनंतर पुढील जन्म भुताचा मिळण्यापेक्षा चांगला मिळावा अशीही त्यांची इच्छा व्यक्त होते. यातून लेखक कोरकूंच्या मोक्षाच्या कल्पनेचे व संस्कृतीचे दर्शन घडवितात.

थोडक्यात - अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यावर कोरकूंचा दृढ विश्वास दिसतो. आपल्या परंपरांची, रूढींची जपणूकही ते करतात. यातून त्यांचे अज्ञानही निदर्शनास येते.

**सण समारंभाचे चित्रण ...**

कोरकू दारिद्र्यावस्थेत जीवन जगत असूनही श्रध्दाशील, भावूक, धार्मिक मनोवृत्तीचे आहेत. त्यांचे धार्मिक सण हिंदूंसारखेच आहेत. त्यातील होळी सण ते मोठया प्रमाणात उत्साहाने साजरा करताना दिसतात. प्रस्तुत कादंबरीत मधुकर वाकोडे यांनी कोरकूंच्या होळी सणाचे वाचकांना दर्शन घडविलेले आहे. विपन्नावस्थेत जीवन जगणा-या कोरकूंची होळीपूर्वी, होळीचेवेळी व होळी सणानंतरची अवस्था कशी असते, या तिन्ही अवस्थांचे वर्णन प्रस्तुत कादंबरीत केलेले आहे. त्याचा आता परामर्श घेवू.

पोट भरण्याची भ्रांत असणा-या कोरकूंना सणाचेवेळी कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहत नाही. असे असूनही होळीचे वेध लागताच कोरकू होळी सणाच्या तयारीच्या गप्पा मारू लागतात. याचे परिणामकारक वर्णन वाकोडेंनी केलेले दिसते. जसे ' होळीची चाहूल लागल्यावर संध्याकाळी अंगणात बसणारे कोरकू आता बोलके होत चालले होते. होळीसाठी होणा-या खरेदीची....... विकाव्या लागणा-या मालाची आता चर्चा होऊ लागली होती. ढोल...... पिलमपोवे व्यवस्थित आहेत की नाही याची पाहणी होऊ लागली होती. जेवणरातीपासूनच हौशी तरूण ढोल पिलमपोवे घेऊन मधल्या रस्त्यावर जमत होते. त्यांनी डोलावर चोप देताच त्याचे प्रतिध्वनी उमटत होते. आज जेवणरात टळण्याआधीच केरू आणि त्याच्या दोस्तांनी ढोल बडविण्यास सुरूवात केली.'(पृ.9) या वर्णनातून कोरकू होळीची चाहूल लागताच उत्साही आनंदी होतात, यावर लेखक प्रकाश टाकतात.

कोरकूंजवळ होळी सण उत्साहाने साजरा करण्यास पैसे नसतात. या पैशाची विवंचनाही त्यांना भासते. त्या विवंचनेतून सुटण्यासाठी घरातील कोणकोणत्या वस्तु विकावयाच्या याचीही ते चर्चा करतात. परिस्थितीमुळे सण साजरा करण्यासाठी कोरकू घरातील सर्व वस्तु गहाण ठेवतात, विकतात. तरीही होळी सण उत्साहाने साजरा करण्यास ते तयार होतात. कोरकूंचे पोटात मोहफुलांव्यतिरिक्त काहीही नसते. अशा रित्या पोटाने होळीपूर्वी महिनाभर एकत्र नाचतात. दुःखातही आनंद भोगण्याच्या कोरकूंच्या वृत्तीचे लेखक वाचकांना दर्शन घडवितात. कोरकूंच्या नाचाचे मधुकर वाकोडे यांनी वेधक चित्रण केलेले आहे. ' पिलम पोव्याचे सूर वा-यानं टिपले वसंताला ओ देणा-या पोरी, टिकल्या लावलेले रुमाल.... टपल्या घेवून धावल्या. तरण्या पोरापोरींचा..... बाया माणसांचा घेर वाढत गेला. ढोलक्यांनी ढोल कमरेला बांधले. चोप आणि हाताच्या तळव्यांनी त्यांनी बोल काढले. प्रत्येक ढोलक्यासमोर एक-एक गडी फोक घेवून खाली बसला. डाव्या पानावर ठेका धरून ते चित्रविचित्र लयदार धून छेडू लागले. बायकांच्या फेरात मग आघाडीवर पिलमपोवे मिळाले. फेराबरोबर पिरिं ऽ ग ऽऽऽ नि ऽ रिं ऽ ग ऽऽ निं ऽ ग ऽ चे सूर पाझरू लागले. ती लय साधून कमरेला हेलकावे देत.... कधी वाकून..... कधी उलटसुलट तोंड फिरवून बाया..... पोरी नाचत राहिल्या.' (पृ.10) या वर्णनातून लेखक त्या नाचाचे जसेच्या तसे चित्र वाचकांच्या मनःचक्षूपुढे उभे करतात. तद्वतच कोरकूंच्या एकत्र व लयबध्द नाचण्याच्या पध्दतींचे, त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडवितात.

या सर्व विवेचनातून वाकोडे, होळीपूर्वी कोरकूंची अवस्था कशी असते, याचे दर्शन वाचकांना घडवितात. अनेक अडचणींना तोंड देत कोरकू, होळी सण उत्साहाने साजरा करण्यास कसे तयार असतात यावर लेखक प्रकाश टाकताना दिसतात.

कोरकूंची होळी होळीपौर्णिमेदिवशी पेटत नाही. कोरकूंचे पूर्वज लाकडे आणण्यास रानात गेले होते. ते होळी पौर्णिमेच्या दुसरे दिवशी पहाटे घरी आले होते. तेव्हापासून कोरकूंची होळी होळीपौर्णिमेच्या दुसरे दिवशी पहाटे पेटते. लेखकाने त्यांच्या पूर्वजांच्या या कथेचेही चित्रण प्रस्तुत कादंबरीत केले आहे. होळीपौर्णिमेच्या दिवशी कोरकू रात्रभर चंद्रप्रकाशात मदिरेत धुंद होऊन नाचतात. कोरकू ढाण्यातील म्हातारी माणसंसुध्दा या नाचात उत्साहाने नाचतात. ढोल वाजवितात. फुलय नाचताना शिमगा सिरिंज (गाणे) म्हणते. याचवेळी काही कोरकू रानामध्ये शिकारीसाठी जातात. शिकार करताना रानात खोल खड्डा खणतात. कुत्र्यांच्या साहाय्याने जनावरांचा माग

काढून जनावरांचा कळप खड्डयाकडे वळवितात. खड्डयात पडलेल्या जनावरास लांब काठीच्या फाळाने त्याच्या पाठीत, फ-यांत, पोटात मारतात. नेम साधून भाल्याचा मारा करतात. पहाटे सर्वजण ठाण्यात परत येवून मोहफुलाचं पाणी पितात. वरील विवेचनातून मधुकर वाकोडे कोरकूंच्या रूढी, परंपरा यांचे जतन करण्याच्या कोरकूंच्या वृत्तीचे तसेच शिकारी वृत्तीचे दर्शन वाचकांना घडवितात.

रात्रभर नाचून दुसरे दिवशी पहाटे होळी पेटवतात. नाचून - नाचून दमलेली, घराकडे गेलेली माणसे ताजेतवाने होऊन उत्साहाने पेटलेल्या होळी भोवती जमा होतात. घोळक्याने, जमावाने ढोल पाव्याच्या तालावर सरपंच, ग्रामपंचायती मधील ढाण्यातील प्रतिष्ठित म्हणून गणल्या गेलेल्या माणसांना फाग ( बक्षिसी ) मागण्यासाठी निघतात. फाग मिळताच जमावास आनंद होतो. फाग न देणा-यासही हा जमाव चिडवितो. उदा. ग्रामपंचायतीच्या अंगणात सरपंच, सेक्रेटरी टेमरे गप्पा मारीत बसलेले असतात. जमाव फाग मागण्यासाठी येतो आहे हे लक्षात येताच टेमरे तेथून हळूच निसटून जातो. त्याला पळताना पाहून मालाय गाणं सुरू करते -

" मुर्गा होय तो ठैरो "
मुर्गी होय तो भागे । " आणि पुढचा चरण पुरूषांनी म्हटला.

जांब की जडीयॉवाले
ठैरो मरे साले । (पृ. ५१)

अशाप्रकारे फाग मिळताच खूष होत, फाग न देणा-यास चिडवत ढोलाचे आवाजात गाणी म्हणत दुपारपर्यंत फाग मागत कोरकू हिंडतात. मिळालेला फाग वडिलधा-या माणसाजवळ ( बुडाहिराजीजवळ ) जमा करतात. या फागातून व केलेल्या शिकारीतून जेवणाची पंगत बसवतात. शिकार केल्याची बातमी कोणालाही सांगत नाहीत. शिकार केल्याचा पुरावाही ठेवत नाहीत. या सर्व विवेचनातून वाकोडे होळी सणाचेवेळी फाग मागणा-या कोरकूंच्या प्रथेवर प्रकाश टाकतात. वडिलधा-या माणसावरील कोरकूंचा विश्वास, त्यांचेविषयी वाटणारा आदर, व प्रोजेक्ट टायगरमुळे शिकार करण्यावरील बंदीही वाचकांच्या निदर्शनास आणतात. शिकार करण्याची बंदी असूनही कोरकू शिकार करतात. यातूनच ते आपली परंपरा जपण्याचा प्रयत्न करतात यावर वाकोडे प्रकाश टाकतात.

वरील सर्व विवेचनावरून कोरकू होळी सण कशाप्रकारे साजरा करतात. होळीपूर्वी व

होळीनंतर त्यांची बिकट अवस्था कशी असते त्याप्रमाणेच होळीच्यावेळी त्यांचा उत्साह, आनंद, होळीचे वेळी फाग मागण्याची पध्दत इ. गोष्टी वाकोडे यांनी वाचकांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.

**विवाह पध्दतीचे चित्रण ...**

दैनंदिन जीवनामध्ये कोरकू अनेक रूढी, परंपरांचे पालन करतात. तद्‌वतच सामाजिक जीवन व्यवस्थित चालावे यासाठी काही विवाहविषयक नियम व बंधने पाळतात. त्याचे पालन जमातीतील प्रत्येक घटक करीत असतो. प्रस्तुत कादंबरीत मधुकर वाकोडे यांनी कोरकू जमातीच्या जोडीदार मिळविण्याच्या, घरात घुसणे, लांबजाना होणे, संमती विवाह, व सहपलायन विवाह या पध्दतीचे विवेचन केले आहे. त्याचा आता आपण परामर्श घेऊ. या विवाह पध्दतींचा उल्लेख मधुकर वाकोडे यांनी प्रसंगानुरूप केलेला दिसतो.

होळी पौर्णिमेपूर्वी रात्री चाललेल्या नाचात रमोती येऊन मिसळते. रमोती ही कोरकू ढाण्यातील बाटूची मुलगी असते. रमोतीचे त्या वस्तीतल्या सोमाशी सूत जुळते व ती एका बुधवारच्या रात्री सोमाच्या घरात घुसते. घरात घुसलेल्या स्त्रीस घरातल्यानी कितीही त्रास दिला तरी घरातून ती बाहेर पडत नाही. तिची चर्चा वस्तीत चालू होते, त्यावेळी बाटू पंचायत घेऊन तिच्या घरी जातो. जातपंचायत रमोती सोमास देऊन टाकते. म्हणजेच त्यांचा विवाह होतो. ज्यावेळी सीपना नदीच्या डोहात ( कुंडात ) मासे पकडावयास केरू जातो व कुंडातील कपारीत अडकून मरतो त्यावेळी मालाय ही बातमी फुलयला येवून सांगते. याचवेळी केरूविषयी असणा-या प्रेमामुळे फुलयच्या मनात येते - ' आपण केरूचं घर घुसायला हवं होतं. निपटवलं असतं सारं जातपंचायतीनं.' (पृ.98) वरील सर्व उल्लेखातून वाकोडे कोरकूंच्या घरात घुसणे या विवाह पध्दतीवर प्रकाश टाकतात.

मालाय ही कोरकू ढाण्यातील बुडाहिराजीची मुलगी. नव-याबरोबर माहेरीच असते. होळीनंतर ती हरीसालला सासरी जाणार असते. वाकोडे लिहितात, ' दोन वर्षांपासून नव-यासोबत माहेरीच नांदत होती, येत्या होळीला तिच्या नव-याचे साल...... लग्नाचे कर्ज फिटणार होते. तिचा नवरा लांबजाना होता. नवरीचा हुंडा फिटेपर्यंत तो सास-याच्या घरी कष्ट करून राबणारा घरजावई होता.' (पृ.11) या प्रसंगातून लेखक कोरकूंच्या लांबजाना ( घरजावई ) होणे या विवाहपध्दतीवर प्रकाश टाकतात. फुलय व केरू मासळी पकडण्यासाठी सीपना नदीवर जातात. केरूने आणलेल्या साबणाने अंगावरील लुगडे धुते. निम्मे लुगडे धुवून वाळवते. झंपर धुवून वाळत टाकते. छातीवर हात दुमडून छाती झाकते. तेव्हां केरू हळूच येऊन तिचे लुगडे ओढतो. यावर ती

म्हणते मी काय तुझी बायको आहे ? यावर केरू म्हणतो - " इयान ऽ लांबजाना बान् ऽ हो ना ऽ" आपणास घरजावई व्हावयाचं नाही बरं. (पृ.40) या प्रसंगातून लेखक कोरकूंच्या लांबजाना होणे या विवाह पध्दतीचे दर्शन वाचकांना घडवितात.

घरात घुसणे, लांबजाना होणे या प्रमाणेच कोरकूंमध्ये आईवडिलांचे संमतीनेही विवाह होताना दिसतात.

जासो देढतलाई या गांवची असते. देढतलाईस मुंगा, नातलगाच्या घरी पाहुणा म्हणून आलेला असतो. जासो त्यास गटवते व दोघेही चौ-याकुंड या गावी पळून जातात. जातपंचायत त्यांना आसरा देते. ते दोघे कोरकू ढाण्यात येतात. लेखक लिहितात, ' ढाण्यात आली ..... दोन लेकरं झाली पण लग्नांचा......गावकीचं — जातपंचायतीचं कर्ज अजूनही फेडलं नाही त्यांनी, पोरीच्या मांडवातच आधी लग्न करतील......मग मुलींचं. ' (पृ.64) या प्रसंगातून लेखक कोरकूंच्या सहपलायन या विवाह पध्दतीवर प्रकाश टाकतात. गावकीचे, जातपंचायतीचे कर्ज दिल्याशिवाय कोरकूंमध्ये विवाह होत नाहीत. या प्रसंगातून कोरकूंमध्ये लग्नापूर्वी लैंगिक संबंध ठेवण्याचे स्वातंत्र्य दिसते. विवाहापूर्वी मुले होणे अनैतिक समजले जात नाही याचे दर्शन लेखक वाचकांना घडवितात.

वरील सर्व विवेचनातून वाकोडे कोरकूंच्या विवाह पध्दती व नागर संस्कृतीतील विवाह पध्दती यामध्ये फरक आहे हे निदर्शनास आणून देतात. नागर संस्कृतीतील पुरूषासारखे जोडीदार मिळविण्याचे स्वातंत्र्य कोरकू पुरूषास नाही. त्यामुळेच घरात घुसलेली स्त्री पुरूषास पसंत असो अथवा नसो त्याच्याशी त्याला विवाह करणे भागच पडते. तसेच मुलीचे वडिलांनी मुलास हुंडा देण्याची पध्दती नागर लोकांमध्ये आहे. याउलट परिस्थिती कोरकूंमध्ये दिसते. मुलास मुलीला हुंडा देण्याची ऐपत नसल्यास सासुरवाडीतही जाऊन राहावे लागते. मात्र या सर्व पध्दतींमध्ये जातपंचायत जो निर्णय देईल तोच सर्वांना मान्य करावा लागतो. या सर्व गोष्टी वरील सर्व प्रसंगामधून वाकोडे वाचकांचे निदर्शनास आणून देतात.

**जातपंचायतीचे चित्रण** ...

कोरकूंना जमातीमध्ये राहताना जमातीच्या नियमांचे पालन करावे लागते. त्या नियमांचे उल्लंघन केल्यास कडक शासन केले जाते. कोरकूंच्या जातपंचायतीचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत केले आहे ते आता पाहू.

जातपंचायतीचा निर्णय हा सर्वांना मान्य करावाच लागतो म्हणूनच बाटू रमोतीसाठी जातपंचायत घेवून सोमाचे घरी जातो. पंचायतीचे निर्णयानुसार रमोती सोमास देतो. फुलयलाही रमोतीप्रमाणे आपण केरूचे घरात घुसलो असतो तर बरे झाले असते, बाकीचे जातपंचायतीने निपटून घेतले असते असे वाटते. या सर्व प्रसंगातून मधुकर वाकोडे कोरकूंमध्ये जातपंचायतीचे निर्णयास किती महत्व असते हे निदर्शनास आणून देतात. तसेच या निर्णयांचे बंधन सर्वच पाळतात, म्हणूनच अजूनही या जमातीमध्ये एकीची भावना आहे ही गोष्ट मधुकर वाकोडे वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

आतापर्यंत वर केलेल्या सर्व मुद्यांच्या विवेचनातून मधुकर वाकोडे कोरकू लोकांचे जीवनाचे दर्शन वाचकांना घडवितात. हे लोक कष्टाळू आहेत. पण कष्ट करण्यास त्यांना कामच मिळत नाही. जवळ असलेल्या मालास पुरेशी किंमत मिळत नाही. त्यातच रहिमशेठ, बुईके,कासम मण्यारीवाला यासारखे व्यापारी त्यांना ठकवतात, त्यांना लुबाडत असतात. कोरकूंचे अज्ञानाचा फायदा घेवून त्यांना फसवितात. त्यामुळे शेवटी कोरकूंना कर्जबाजारी होऊनच जीवन जगावे लागते. मोहफुले खाऊन पोट भरावे लागते. दारिद्रय हे त्यांच्या जीवनाचे अंगच बनून जाते. अशा बिकट परिस्थितीतही त्यांची आनंद घेण्याची वृत्ती असते. होळीसणापूर्वी ते रात्रभर नाचतात. होळी सण उत्साहाने साजरा करतात. कर्ज काढून देवीचे नवस फेडतात. आपल्या रूढी, परंपरांची जपणूक करतात. जातपंचायतीचा निर्णय हा अंतीम निर्णय मानतात. दुःखातूनही आनंद घेण्याची त्यांची प्रकृत्ती दिसते. या सर्व गोष्टी लेखक वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

**आदिवासींची सुधारणा करणा-या लोकांचे चित्रण व आदिवासींकडून त्यांना मिळणारा प्रतिसाद ...**

कोरकू हे दरिद्री आहेत. त्याबरोबरच ते अज्ञानी, अडाणी आहेत. रूढी परंपरांची जपणूक करीत आहेत. कोरकूंमध्ये सुधारणा व्हाव्यात, त्यांना शिक्षण मिळावे, दारिद्रय जाण्यासाठी आधुनिक पध्दतीचे ज्ञान देवून त्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा उल्लेख मधुकर वाकोडे यांनी ' झेलझपाट ' या कादंबरीत केलेला आहे. प्रस्तुत कादंबरीत अंगणवाडीच्या बाई, डॉ. टिकेकर या व्यक्ती कोरकूंच्यात सुधारणा व्हावी या हेतूने ढाण्यात आलेल्या आहेत. त्यांचे चित्रण लेखकाने कसे केले आहे ते आता पाहू.

कोरकूंना शिक्षण मिळावे, त्यांचे अज्ञान नाहीसे व्हावे, या उद्देशाने सरकारने ढाण्यात अंगणवाडी (शाळा) काढली आहे. त्या शाळेत शिकविण्यासाठी बाई ( शिक्षिका ) आहेत. त्या

मुलांना शिकवितात. परंतु हे शिक्षण मराठी भाषेतून दिले जाते. त्यामुळे कोरकू मुलांना शिक्षण घेणे कठीण जाते. त्यांचे मन शिक्षणात रमू शकत नाही. कारण त्यांची बोलीभाषा कोरकू तर शिक्षण घेण्याची भाषा मराठी होती. भाषामाध्यमामुळे कोरकूंकडून शिक्षणासंबंधी अंगणवाडीच्या बाईंना म्हणावा तितका प्रतिसाद मिळत नाही. अधिका-यापासून आपले संरक्षण कोरकू करू शकणार नाहीत याचीही तिला खात्री वाटते. संरक्षण तर राहोच उलट एखादी जीप तिच्या दरवाज्यापुढे येवून थांबताच तिच्याकडे ज्या दृष्टीने लोक पाहतात त्या नजराही तिला असुरक्षिततेचीच जाणीव करून देतात. शिक्षणातील भाषामाध्यमाच्या अडचणीमुळे कोरकू शिक्षणात रमत नाहीत. या सर्व गोष्टी लेखक वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

आदिवासींच्या उत्पन्नामध्ये भर पडावी त्यांना आधुनिक ज्ञानाची, गोष्टींची जाणीव करून द्यावी, त्यांचे दारिद्रय काही प्रमाणात का होईना कमी व्हावे, या उद्देशाने ढाण्यात आलेली दुसरी व्यक्ती म्हणजे डॉ. टिकेकर. पुण्याला भारतीय कृषिउद्योग प्रतिष्ठान आहे. तेथून डॉ.टिकेकर ढाण्यात लोकांना संकरित गायींपासून होणारे फायदे, तोटे समजावून देण्यास येतात. परंतु कोरकूंमध्ये ' ऑप्रीसनाले ' सायेब आल्याची बातमी लागते व सर्व कोरकू जंगलात पळून जातात. परिणामकारक शब्दात लेखक लिहितात - ' विकासाच्या योजना.... नवीन उपक्रम वगैरे गोष्टींचा लळा गवळयांना. एरव्ही कोरकू अशा सभांना....... बैठकींना कधी येणार नाही. ढाण्यात त्याच्या झोपडीपर्यंत साहेबानं जाऊन उपयोग नाही.... मागच्या दारातून बायकोसह नवरा जंगलात पसार. त्यांच्या समोरच्या दारातून रात्रंदिवस घुसणारं वारं जसं मागच्या दारातून जंगलात घुसतं तसं कोरकूंचं. ' (पृ.69) या विवेचनातून जंगल वनस्पती, झाडपाला, निसर्गातील वस्तू रोग बरा करू शकतात, यावरील कोरकूंचा विश्वास वाकोडे व्यक्त करतात. डॉक्टर म्हटला की, तो ऑप्रेशन करतो या अडाणी समजुतीमुळे ते डॉक्टरच्या वा-यासही उभे राहत नाहीत. त्यामुळेच डॉ. टिकेकरांनी सभेला बोलावताच ते जंगलत पळून जातात. विकासाच्या योजना समजून घ्याव्यात असे त्यांना वाटत नाही. लेखक लिहितात - ' सभा आणि कुटुंब नियोजन त्यांना एका नाण्याच्या दोन बाजू वाटल्यानं त्यांनी धसका घेतला होता.' (पृ.70). या विवेचनातून कोरकूंना सभा ही फक्त कुटुंब नियोजनासाठीच घेतली जाते या त्यांच्या समजुतीवर लेखक प्रकाश टाकतात. कोरकूंच्या या वर्तनामुळे, स्वभावामुळे सरकारने योजलेल्या नवीन योजना त्यांना समजत नाहीत. सरकारच्या योजनांना प्रतिसाद त्यांचेकडून मिळत नाही. सभेला एकही कोरकू हजर राहत नाहीत. तरीही डॉ. टिकेकरांना आज ना उद्या कोरकूंना संकरित गायींची माहिती जाणून घेण्याची इच्छा होईल, या आशेवर ते ग्रामपंचायतीचे ओसरीवर टेबल मांडून बसतात.

गवळी ढाण्या परसापूरच्या भुलेश्वरी तलावाजवळ हलविला जाणार आहे याची बातमी गवळी ढाण्यास लागते. संकरित गाईचे बियाणे वापरले म्हणूनच आपल्याला या जागेतून हलावे लागत आहे. गो-हाईचा शाप लागला असे त्यांना वाटते. गवळीही हिटवर आलेल्या गाईसाठी वर्दी देईनासे होतात. डॉ. टिकेकरांना गवळयांच्या या अंधविश्वसाचे वाईट वाटते. ते त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांचे प्रयत्नास यश येत नाही. कोरकू तर संकरित गाईची ही भानगड काय आहे हे जाणूनही घेत नाहीत.

वरील सर्व चित्रणातून मधुकर वाकोडे, सरकारकडून कोरकूंच्यात सुधारणा व्हाव्यात या उद्‌देशाने अनेक योजना राबवल्या जातात यावर प्रकाश टाकतात. त्या योजना राबविल्यास येणा-या माणसांना आदिवासींकडून नीटसा प्रतिसाद मिळत नाही. या योजना हे लोक कोरकूंना समजून सांगू शकत नाहीत. त्यामुळे या योजनांपासून कोरकू लांबच राहिलेले दिसून येतात. तरीही अतिशय चिकाटीने हे लोक कोरकूंच्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात. या गोष्टी लेखक वाचकांच्या न्दिर्शनास आणून देतात.

**आदिवासींचे शोषण करणारी माणसे, त्यांचा स्वार्थीपणा, त्यांच्या शोषणाचे स्वरूप** ...

आदिवासींच्यात सुधारणा व्हाव्यात या हेतूने ढाण्यात येवून राहणा-या व्यक्तींचे चित्रण वाकोडे यांनी प्रस्तुत कादंबरीत जसे केले आहे, तद्‌वतच कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेणा-या व्यक्ती ढाण्यात आहेत. त्या व्यक्ती आदिवासींचे शोषण कसे करतात, त्यांच्या शोषणाचे स्वरूप कसे आहे, याचेही चित्रण प्रस्तुत कादंबरीत लेखकाने केले आहे. त्याचा आता परामर्श घेऊ.

' उत्तम ' हा रेव्हेन्यू खात्याचा माणूस असतो. तलाठी म्हणून चारपाच वर्षांपूर्वी तारूबांधास येतो. कोरकूंचे हातून जंगलातून लाकूडफाटा आणतो व सरकारी जागेत घर बांधतो. तो कोरकूंचेकडून कष्ट करून घेतो. त्यांचे कष्टातून व त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तो स्वतःचे घर बांधतो. कष्टाचे मोबदल्यात त्यांना तो काहीही देत नाही कारण तो तलाठी असतो. अधिकारी या नात्याने तो कोरकूंकडून साग, बांबू यासारखा लाकूडफाटा जंगलातून आणतो. त्याठिकाणी त्यांचा घाम गळतो. पण त्या मोबदल्यात कोरकूंना शुल्क मात्र शून्य मिळते. अशात-हेने तो कोरकूंचे शोषण करतो. गौलखेडच्या बाजारला येणारा कासम मण्यारीवाला कोरकू ढाण्यात येतो. कोरकूंकडून पैशाच्या मोबदल्यात मोह,धान,चारोळी घेतो. रूपयाचा माल त्यांना दोन रूपयांना विकतो. या उल्लेखातून कासम कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेतो, त्यांना फसवितो. यावर लेखक प्रकाश टाकतात. तसेच कोरकू

पोरींना माल देताना, घेताना कासम त्यांच्या अंगाशी लगटपणा करतो. व्यसनी व दुर्बल अशा मोपाची मुलगी - फुलय हिच्यावर वाईट नजर ठेवतो. तिच्याशी लगटपणा करून तिचे स्त्रीत्व लुटण्यासाठी योजना आखतो. कोरकूंना लालपरीचे व्यसन लावतो व लालपरीची विक्री करतो. या उल्लेखातून कोरकू स्त्रियांच्या अडाणीपणाचा गरिबीचा फायदा घेऊन त्यांना लुटणा-या, लुटू इच्छिणा-या व्यक्तीही येथे आहेत, यावर लेखक प्रकाश टाकतात. तसेच कोरकूंना व्यसनाधीन करून स्वतःचा धंदा करणा-या या स्वार्थी व्यक्तींचेही चित्रण करतात. कोरकू गौलखेडच्या बाजारला येवून जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करतात. त्यावेळी कोरकूंना रहिमशेठ व्यापारी अनेक प्रकारे फसवितो. उदा. ' या बाजारला सरकारी वजनं माहित नव्हती. ' (पृ.46) या उल्लेखातून व्यापारी बाजारात प्रमाणीत वजनांचा वापर करीत नाहीत व कोरकूंना फसवितात. अडाणी कोरकूंना वजने मापात आपली फसवणूक होते आहे, याची जाणीवही होत नाही. कोरकूंना बाजारभावाची माहिती नसते. या त्यांच्या अज्ञानाचा फायदा रहिमशेठ घेतो. कोरकूंचा माल पडेल भावात विकत घेतो. कधी ओळखीने तर कधी जबरदस्तीने तो कोरकूंच्या मालावर झडप घालतो. अशात-हेने तो कोरकूंचे शोषण करतो. तसेच आदिवासी सहकारी सोसायटीत विक्रीसाठी आलेल्या साडयाही रहिमशेठ खरेदी करतो. पंधरा रूपयाची साडी चाळीस रूपयाला विकतो व स्वतःची तिजोरी भरतो. या उल्लेखातून रहिमशेठ पैशाच्या लोभातून कोरकूंचे शोषण करताना दिसतो. यातून लेखक त्याच्या व्यापारी वृत्तीवरही प्रकाश टाकतात. बाजारात टिनाच्या टपरीत जयस्वाल आपले दारूचे दुकान थाटतो. कोरकूंना लाल घाण पाणी विकतो. त्या पाण्यावर कमाई करतो. कोरकूंना लुबाडतो. कोरकू ढाण्यात खंडेलवाल किराणामालाचे दुकान थाटतो. पुडया बांधता बांधता व तेल ओतता ओतता उधारी वसूल करतो. उधारीत लोकांना फसवितो. या उल्लेखातून लेखक खंडेलवालच्या स्वार्थी, व्यापारी वृत्तीवर प्रकाश टाकतात. या पद्धतीने तोही कोरकूंचे शोषण करतो. फादर, ईसाईंनी कोरकूंच्या धर्मावरच झडप घातली. धर्मांतराचा महामंत्र कोरकूंना दिला. कोरकूंना त्यांच्या धर्मापासूनच अलग करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. या उल्लेखातून फादर व ईसाई कोरकूंच्या धर्माचे शोषण करतात. या गोष्टीचे दर्शन लेखकाने वाचकांना घडविले आहे.

वरील सर्वांकडून कोरकू लुबाडले जातात. त्यामुळे लुबाडणूक हे जणू कोरकूंचे जीवनाचे अंगच बनले आहे. अज्ञानामुळे त्यांना त्याचे काही वाटेनासे झाले आहे. ही गोष्ट लेखक वाचकांचे निदर्शनास आणून देतात. थोडा फार शिकलेल्या केरूला वरील सर्व गोष्टी समजतात. कोरकूंविषयी

त्यास काळजी वाटते. वाकोडे त्याचे मनोगत व्यक्त करतात - " त्यांना एकच चिंता आहे..... ती फक्त पोटाची. " केरूच्या या मनोगतावर लेखक लिहितात - " मुसलमानांचा झेलझपाट...... ख्रिश्चनांचा धर्मप्रसार..... लालपरीची आता दारूला मिळालेली साथ..... सरकारी मोसंबी नारिंगी... टायगर प्रोजेक्ट......ह्या सर्व गोष्टी कोरकूंच्या जीवावर उठल्या आहेत. आजार वेगळे..... उपचार निराळे आणि लोक अडाणी...... गरीब, असा सारा हैदोस आहे. " (पृ.36) अशा परिणामकारक शब्दात कोरकूंची वस्तुस्थिती वाकोडे यांनी चित्रीत केली आहे.

वरील सर्व विवेचनावरून वाकोडे आदिवासींचे नागर लोकांकडून होणारे शोषण, त्याबरोबर नागर लोकांच्या स्वार्थी मनोवृत्तीचे, कोरकूंच्या अज्ञानाचे दर्शन वाचकांना घडवितात.

**केरू व फुलय यांच्या प्रेमकथेचे स्वरूप** ...

मधुकर वाकोडे यांनी **झेलझपाट** या कादंबरीत ज्याप्रमाणे कोरकूंच्या जीवनाचे विविध अंगांनी दर्शन घडविले आहे. तद्वतच केरू व फुलय यांची प्रेमकथाही चित्रीत केली आहे. या प्रेमकथेचे चित्रण (स्वरूप) प्रस्तुत कादंबरीत वाकोडे यांनी कसे केले आहे ते पाहू.

**झेलझपाट** या कादंबरीचा नायक केरू व नायिका फुलय होय. दोघांचेही एकमेकावर प्रेम आहे. फुलयचे केरूवर प्रेम आहे, त्यामुळे रमोतीने सोमाचे घरात घुसून बाटूला (वडिलांना) सोमास देण्यास भाग पाडले, तिने सोमाला जसे जिंकले तसे आपण केरूला जिंकावे असे फुलयला वाटते. होळीचे रात्री ती त्याचेबरोबर नाचते. केरूही तिला तितकाच मनापासून साथ देतो. स्वतःकडे वाईट नजरेने पाहणा-या कासमचा तिला राग येतो. कासम केरूवर लालपरी विक्रीचा खोटा आरोप आणतो, पोलीस त्यास पकडून नेतात. यामुळे केरूवर खोटा आरोप आणणा-या, तसेच त्याचा अपमान करणा-या कासमचा तिला राग येतो. केरू पकडला गेल्यानंतर त्याला सोडविण्यासाठी ती खूप धावपळ करते. या धावपळीतून तिच्या केरूवरील प्रेमाची जाणीव वाचकांना होते.

केरूचेही फुलयवर प्रेम आहे. तो तिला मासे पकडण्यास बरोबर नेतो. होळी-पूर्वीच्या बाजारात तिच्याबरोबर हिंडतो. ठंडार मिठार खातो. फुलयला तिचे लुगडे धुण्यास साबण देतो. लुगडे धुण्यापूर्वी फुलय आळस देते. त्यावेळी केरूस ती अतिशय मोहक वाटते. त्यावेळी त्याच्या मनात येते ' अशीच उचलून पळवावी असं क्षणभर त्याला वाटलं, पण मोपा दहेज मागील आणि जातपंचायत शिडू झिलू.' (पृ.39) या विवेचनातून केरूचे फुलयवरील प्रेम स्पष्ट होते. शिवाय केरू शिकलेला असतो. त्यामुळे हुंडा देण्याची ऐपत आल्याशिवाय तो फुलयबरोबर लग्न करणार नसतो. यातूनच त्याला कुटुंबात वैचारिक स्वातंत्र्य आहे. यावरही लेखक प्रकाश टाकतात.

खंडेलवालचे दुकानात चायपत्ती आणावयास फुलय जाते. केरूला पेपर वाचताना पाहते. फुलयच्या मनात येते - ' आपलं लग्न झालं तर अख्या कोरकू वस्तीत आपलाच नवरा पेपर वाचतो हे ठसणीनं आपण इतर पोरींना सांगू. ' (पृ.35) यातून फुलयला केरूबरोबर लग्न करण्याची अतूट इच्छा असते हे स्पष्ट होते. कासम रात्री फुलयचे घरी जेवावयास होता हे केरूस समजते. तो तिच्याशी बोलेनासा होतो. त्याचवेळी कासमचा आपण कसा काटा काढला हे केरूस सांगण्यास तिच्या मनाची झालेली तळमळ, त्यासाठीचा तिचा प्रयत्न, त्याने घरी यावे, बोलावे यासाठी तिच्या मनाची झालेली उलघाल लेखक अतिशय हळुवारपणे रेखाटतात. या घटनांमधूनच या कादंबरीची प्रेमकहाणी फुलते. केरू बोलत नाही. हे पाहून तिच्या मनात येते - त्याच्यासाठी आपण काय काय नाही केलं, किती त्याग केला व म्हणते - " आपण एकटं राबलो. रपटयावर कामं केली. मोळया वाहता वाहता मान ताठर झाली. मोहफुलांचे ढीग लावले..... आणि ह्या आळशी बापालाही पोसले. केरू भांग पाडणारा...... टोपी न घालणारा म्हणून आपण लुबूचोळी सोडून साडी झंपर घेतलं पण पण... आपल्या बापाच्या आळसानं आपला नाश झाला. " (पृ.94) केरूसंबंधीचा तिचा हा हिशोबही निरागस दिसतो.

केरू व फुलय यांच्या प्रेमाचे अनेक पदर लेखकाने प्रस्तुत कादंबरीत अतिशय हळुवारपणे उलघडले आहेत, खुलविले आहेत. उदा. मालायचा नवरा झाडावर चढलेल्या वेलीचे वाघाटे तोडण्याचं निमित्ताने मालायला घेवून शेंबालूच्या झुडूपाआड जातो. त्या झुडूपाकडे पाहात केरू तिच्या कानात हळूच कुजबुजतो - " फुलय ऽऽ, डोंगोर जुलू लाकेन. " फुलय ऽ डोंगर पेटलाय ग । खरंच का डोंगर पेटला । आपण इकडेतिकडे पाहिलं पण वणवा दिसेना. आणि तिच्यासमोर उकीडव्या बसलेल्या केरूनं काळजावर हात ठेवून भडकलेल्या वणव्याची जागा दाखवली. (पृ.33) या वर्णनातून केरूचे फुलयवरील प्रेमाचे दर्शन घडतेच. त्याबरोबर फुलयच्या निरागस वृत्तीवरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. केरूचे प्रेम फुलयवर असतेच पण केरूला लांबजाना होणे आवडत नाही. केरू व फुलय सीपना नदीकाठी गेले असता, केरू कुंडात उडी टाकतो. तो लवकर वर येत नाही हे पाहून ती आकांत करते, घाबरते, ओरडते. केरू वर येतो व तिला म्हणतो, कशी फसलीस ? या चित्रणातून केरू व फुलय यांच्यातील अतूट, निरागस, निष्पाप व निर्व्याज प्रेमाचे दर्शन घडते.

केरूच्या मृत्यूची बातमी ऐकताच फुलयच्या मनात विचारांचे काहूर उठते. केरू ज्या डोहात अडकलेला असतो, तेथे अनवाणी पायांनी दगडांना ठेचकाळत जाते. झुडूपांना चुकवत, पायाखालचा पाचोळा तुडवीत डोहाकडे जाते. रात्रीची भिती तिला वाटत नाही. विचारतंद्रीत ती

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

कुंडाकडे जाते. केरू कुंडातून वर आल्याचा व पुन्हा त्याने उडी मारल्याचा भास तिला होतो. ती कुंडात उडी टाकते व मृत्यूला कवटाळते. हे सर्व प्रसंग लेखकाने परिणामकारक रितीने रेखाटले आहेत. हे रेखाटन करत असतानाच कोरकूंच्या जीवनातील अनेक वैशिष्टयांवरही वाकोडे यांनी प्रकाश टाकला आहे. त्यामुळेच विश्वेश्वर सावदेकर म्हणतात - ' मधुकर वाकोडे यांची ' झेलझपाट ' ही कादंबरी केवळ प्रेमकहाणी नाही. अनेक पदरी कथानकातील तो केवळ एक पदर आहे.'[1] विश्वेश्वर सावदेकरांचे हे मत बरोबरच वाटते.

**व्यक्तिचित्रणाचे स्वरूप ...**

प्रस्तुत कादंबरीत वाकोडे यांनी कोरकू जीवनाचे चित्रण केले आहे. या कादंबरीचा नायक केरू व नायिका फुलय होय. या दोघांभोवती अनेक व्यक्ती येतात. त्या व्यक्तींचे चित्रणही प्रस्तुत कादंबरीत केले आहे. ती व्यक्तिचित्रणे आता पाहू.

**केरू ...**

केरू ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तीरेखा आहे. प्रस्तुत कादंबरीचा तो नायक होय. कोरकू ढाण्यातील तुमला पटेलाचा तो मुलगा. इतर कोरकूंप्रमाणे तो धोतर नेसत नाही. पायजमा व शर्ट घालतो. उंच व शेलाटया अंगाचा केरू भांग पाडतो. तुकतुकीत काळा रंग, बोलके डोळे, बसके नाक, पसरट चेहरा, भुवयांच्या मधली टिळयासारखी मस, हनुवटीवर चार-पाच केसांचा पुंजका, असा केरू इतर कोरकूंप्रमाणे टोपी घालत नाही. चिंचोण्याच्या आश्रमशाळेत तो मॅट्रिकपर्यंत शिकलेला असतो. त्याने वडिलांकडून अनेक कला शिकलेल्या आहेत. बासाच्या कमच्यांपासून अनेक वस्तु बनवणे, गुल्लरचा अचूक मारा करणे, मासळया पकडण्यासाठी विविध पध्दतींचा वापर करणे या सर्व कलांमध्ये तो वाकबगार आहे.

कोरकू जमातीविषयी त्यास सतत चिंता वाटते. कोरकूंच्या अज्ञानाची त्यास कीव येते. तो चौकसवृत्तीचा असतो त्यामुळेच आदिवासी सोसायटीतून दोन रूपये घेवून अंगठा उठवून जाणा-या स्त्रिया तो पाहतो. त्यासंबंधी चौकशी करतो. कोरकूंना लालपरीचे व्यसन लावणा-या, बायकांशी लगटपणा करणा-या कासमचा त्याला तिरस्कार येतो. फादर, ईसाई आपल्या धर्माचा प्रचार करत आहेत. धर्मांतराचा डोस कोरकूंना पाजत आहेत. ही वर्तमानपत्रातील बातमी वाचून त्यास अतिशय दुःख होते. " कुछ दिनोंबाद या कुछ सालोंबाद यह ऐसाही चला तो कोरकू जात दवा को भी नही मिलेगी. " (पृ.36) या खंडेलवालच्या म्हणण्यामुळे कोरकू जमातीविषयी त्याला काळजी वाटते. या विवेचनातून कोरकू जमातीची सद्याची अवस्था लेखक वाचकांच्या नजरेस आणतात. कोरकूंना जमातीपेक्षा

पोटाचीच काळजी अधिक आहे हे पाहून त्याचे मन उद्विग्न होते व तो पुटपुटतो - " मुसलमानांचा झेलझपाट..... ख्रिश्चनांचा धर्मप्रसार..... लालपरीची आता दारूला मिळालेली साथ..... सरकारी मोसंबी नारिंगी...... टायगर प्रोजेक्ट...... ह्या सर्व गोष्टी कोरकूंच्या जीवावर उठल्या आहेत. आजार वेगळे..... उपचार निराळे आणि लोक अडाणी......गरीब, असा सारा हैदोस आहे. " (पृ.36) यातूनच जमातीमध्ये येवून धंदा करणारे व्यापारी व धर्मप्रचारक कोरकू जमात पोखरून काढीत आहेत, त्यांचे शोषण करीत आहेत. याची जाणीव त्यास होते. सरकार मात्र उपाय म्हणून टायगर प्रोजेक्ट सारख्या योजना राबवत आहे. या उपचाराचा काहीही उपयोग नाही याची त्यास जाणीव होते. त्यात आपल्या लोकांचा अज्ञानपणा त्यास जाणवतो. त्यातून त्याला जमातीविषयी वाटणारी चिंता स्पष्ट होतेच, शिवाय त्याची वैचारिक वृत्ती लक्षात येते.

कोरकू जमातीतील फुलयवर त्याचे प्रेम आहे. त्यामुळेच होळीपौर्णिमेच्या बाजार दिवशी तो फुलयबरोबर बाजारात हिंडतो. पहाडी ढोल छेडतो. तिच्याबरोबर रात्रभर नाचतो. मासळया पकडण्यास तिला बरोबर घेऊन जातो. फुलयला तिचे लुगडे धुण्यास साबण देतो. तिला पळवून नेणे शक्य असूनही पळवूनही नेत नाही. लांबजाना होणे त्यास आवडत नसते. ऐपत आल्याशिवाय लग्न करू नये असे त्यास वाटते. त्याच्या सुशिक्षित विचारांची जाणीवही यातून आपणास होते. कासम लालपरी विक्रीचा खोटा आरोप त्याचेवर आणतो. या प्रकारानं तो अतिशय खजिल होतो. त्याचवेळी कासम फुलयकडे जेवायला व मुक्कामाला होता हे त्यास कळते. फुलयविषयी त्याचे मनात गैरसमज होतो. तो फुलयला पुन्हा भेटत नाही. शंकर गवळयाकडे दोन रूपये मजुरीत रात्रंदिवस जागरण पत्करतो. तेथे भेटावयास आलेल्या फुलयला झिडकारतो. तिचे म्हणणेही ऐकून घेत नाही.

वैशाखाची पावलं पडताच केरू सीपना नदीच्या काठाने मासळया पकडण्यासाठी जातो. फुलयला तो आपल्याबरोबर घेत नाही. बोलावत नाही. हातबॉम्ब फोडून डोहाच्या मध्यभागी तरंगणा-या मासळया पकडण्यास डोहात उडी मारतो. तो पुन्हा वर येतच नाही.

थोडक्यात - फुलयवर निरागस, निष्पाप, निर्व्याज प्रेम करणारा तसेच रहिमशेठ, कासम मण्यारीवाला यासारखे व्यापारी कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेत आहेत हे समजणारा, शिकलेला, फुलयवर प्रेम करणारा व ज्याचा दुखान्त झालेला आहे असा केरू, वाकोडे यांनी रेखाटला आहे.

**फुलय ...**

फुलय ही या कादंबरीची नायिका आहे. कोरकू ढाण्यातील मोपाची ती मुलगी. मोपा सतत दारूत धुंद असे. तो कोणताही कामधंदा करीत नसे. आईला अस्वलाने खाल्ल्याने तरूणवयातच

SHIVAJI UNIV... LIBRARY

घराची सर्व जबाबदारी फुलयवर येऊन पडते. मोपालाही तीच सांभाळते. " थोडासा उजळ पण काळसर पाणीदार चेहरा, पिळदार पोट-या.....उभ्भट स्तनं ..... किंचित बसके नाक. कपाळावर ... हनुवटीवर गोंदणाचा निळसर ठिपका. काळसरपणात हरपलेला. डोळयात वणव्याच्या ज्वाळा... गळयात हिर्व्यालाल मण्यांची माळ केसांचा बुचडा बांधलेला. " (पृ.3) अशी फुलय मोहफुलं गोळा करते. रानातून मोळया आणते. रपटयाच्या कामावर जाते व प्रपंच चालवते. यातूनच तिच्या कष्टाळू स्वभावाची ओळख होते.

कोरकू ढाण्यातील तुमला पटेलचा मुलगा केरू, याचेवर तिच प्रेम असते. केरू शिकलेला आहे. अनेक कला त्यास अवगत आहेत. मासळया पकडण्यातही हुशार आहे. त्यामुळे ती त्याच्याकडे आकर्षित होते. तो इतर आदिवासींसारखा पोशाख करत नाही. म्हणून फुलय त्याचेसाठी इतर आदिवासी स्त्रियांप्रमाणे लुबूचोळी ऐवजी साडी-झंपर घालते. जमातीचे रिवाजानुसार केरूचे घरात ती घुसू शकली असती. पण केरूला ते आवडणार नाही. म्हणून ती केरूचे घरात घुसत नाही. केरूच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर तिला केरूचे घरात घुसायला हवे होते असे वाटते. यावरून तिचा प्रेमासाठी वाटेल ते करण्याचा स्वभाव दिसतो.

कासम केरूवर लालपरी विक्रीचा आरोप आणतो. पोलीस त्यास पकडून नेतात. त्यावेळी ती अस्वस्थ होते व त्याला सोडविण्यासाठी प्रयत्न करते. केरूचा अपमान करणा-या कासमचा फुलयला राग येतो. कासम तिच्याशी लगटपणा करतो. या त्याच्या लगटपणाचा तिला राग येत असतो. कासमचा काटा काढण्याचे ठरवते. ती मध्यरात्री देवीच्या कुंडाकडे जाते. तेथे मेलेल्या वाघाच्या मिशीचे केस आणते. बाजारदिवशी कासम तिचे घरी जेवायला येतो. तेव्हा ती ते मिशीचे केस कासमला मटणातून खावू घालते. त्यास खंगून मरावयास भाग पाडते. तिला कासमच्या मृत्यूची बातमी कळते. आपण त्याचा खून कसा केला, हे केरूस सांगण्यास ती उत्सुक असते. पण कासम तिच्या घरी मुक्कामास होता हे समजल्यामुळे केरू फुलयबरोबर बोलत नसतो. त्यामुळे कासम मेला, त्याला आपण कसे मारले हे केरूस सांगावयास ती शंकर गवळयाच्या शेतात जाते. केरू शंकर गवळयाच्या शेतात कामावर असतो. फुलयला पाहताच तो तिचा अपमान करतो. तिला झिडकारतो. त्याच्या त्या अपमानाने फुलय दुखावते. आपण केरूसाठी किती तरी केले. पण तो मात्र आपणाला समजून घेत नाही. याचे तिला वाईट वाटते. तो बोलल्याशिवाय आपणही बोलायचे नाही असे ती ठरवते. यावरून तिचा मानी स्वभाव दिसतो. मासळया गोळा करण्यास केरूबरोबर जावे असे तिला वाटते. पण तो बोलावत नाही म्हणून ती त्याचेबरोबर जात नाही.

शंक-या गवळयाचे रानात केरू तीन दिवस जागल्याचे काम करतो. ते काम संपल्यानंतर तो मासळया पकडण्यास कुंडाकडे जातो. मासळया पकडण्याचा कोरकूंचा स्वभावधर्म केरूमध्ये पुरेपूर उतरला होता. स्वाभिमानी फुलय तो बोलाल्याशिवाय आपणही बोलत नाही. मालाय फुलयला केरू कुंडात बुडाल्याची बातमी सांगते. ती बातमी ऐकून ती सुन्न होते. ही बातमी ऐकल्यानंतर तिच्या मनात अनेक विचार येतात. आपण केरूबरोबर असतो तर तो बुडाला नसता. ' मोपान कासमला लाडावलं नसतं..... घरी मुक्कामाला त्याला ठेवलं नसतं तर केरूच्या मनात आपल्याविषयी संशयच निर्माण झाला नसता. आणि त्यानं आपणाशी अबोल धरला नसता. ' (पृ.96) असाही विचार तिच्या मनात डोकावून जातो. त्यानंतर ती जागची उठते. तुंब्यातली शिडू पिते. मोहफुलानं उत्तेजित होते. झोपलेल्या मोपाच्या तोंडात ती घोटभर दारू ओतते. शीवेवरच्या नागप्रतिमेवर तुंब्यातली सगळी दारू ओतते. अनवाणी पायांनी दगडांना ठेचकाळत केरू बुडालेल्या डोहाकडे जाते. कुंडात (डोहात) केरू उडी मारतोय असा तिला भास होतो. ती त्याच्या पाठोपाठ कुंडात उडी घेते. सीपना नदीच्या कोरडया पात्रात ' लाहोरी फसी गई राम ऽऽ

शिकारीने फूंदा डाले ऽऽ । (पृ.99) हे सूर थरथरतात.

अशा-हेने दिसावयास देखणी, कष्टाळू, स्वाभिमानी, केरूवर नितांत प्रेम करणारी, केरूवरील प्रेमाशी एकनिष्ठ राहणारी व शेवटी केरूतच एकरूप होवून आपले आयुष्य संपवणारी अशी फुलय मधुकर वाकोडे यांनी प्रस्तुत कादंबरीत चित्रीत केली आहे.

**मोपा ...**

कोरकू ढाण्यातील मोपा हा फुलयचा बाप होय. त्याची पन्नाशी उलटलेली आहे. ' मोपा पटेल खुज्या शिंदीच्या झाडासारखा. त्याच्या उघडया पोट-यावर फांज-यांचे ओरखडे उमटले होते. काळयापाटीवरील रेघांसारखे, डोळे खोल. नदीच्या काठावर वाढलेल्या अणकुचीदार वांबूच्या बेटासारखी ओठावर मिसूर. गालावर केसांची पांढरी धसकटं कडबा सोंगलेल्या वावरातील फनकटासारखी. ' (पृ.5) लेखक या वर्णनातून मोपा ही व्यक्ती कशी दिसते, त्याचे हुबेहूब चित्र वाचकांचे डोळयापुढे उभे करतात. मोपा सतत दारूच्या नशेत धुंद असतो. दारूसाठी तो किती लाचार झालेला असतो याचे परिणामकारक वर्णन लेखक करतात - ' जेवणा-या माणसासमोर बसलेला कुत्रा जसा जेवणा-या माणसानं ताटात हात घातला की खाली पाहतो नि तोंडात घास टाकला की वर पाहतो तसा विठूनं कप भरला त्यावेळी मोपा खाली आली कपाकडे पाहत होता. (पृ.7) तसेच लालपरीचे त्याला व्यसन आहे. लालपरी व दारूसाठी कासम मण्यारीवाल्यास आपल्या घरी

UNIVERSITY * KOLHAPUR *

जेवायला बोलावतो. या व्यसनांमुळे मोपास, कासमची आपल्या तरूण पोरीवर - फुलयवर वाईट नजर आहे हे ही कळत नाही. फुलयचे रीतसर लग्न ठरवावे असे त्यास वाटत नाही. तिच्या लग्नानंतर आपले कसे होईल ? याचीच त्यास अधिक काळजी वाटते. त्यामुळे म्हाता-या वयातही दुस-या लग्नाचा विचार त्याच्यात डोकावत असतो. तो कोणताही कामधंदा करीत नाही. मुलीने दिलेले ऐतखाऊसारखे खातो व दारूत धुंद होवून पडतो.

व्यसनी, दुर्बल, लाचार, मुलीच्या लग्नाची विशेष चिंता न करणारा, स्वार्थी असा मोपा वाकोडे यांनी चित्रीत केला आहे.

**कासम मण्यारीवाला** ...

प्रस्तुत कादंबरीचे खलनायकत्व कासमकडे जाते. तो गौलखेडला बाजाराला जातो. कुंकू, चुना, हेअरपिना, रूमाल, टिकल्या, गंध, काजळाच्या हलक्याफुलक्या डब्या, पावडरचे डबे इ. फुटकळ वस्तुंची विक्री करतो. या सर्व मालाची ने आण घोडयावरून करतो. गौलखेडला जाता जाता कोरकू ढाण्यात थांबून या वस्तुंची विक्री करतो. रूपयाचा माल दोन रूपयास विकतो. यातून त्याची व्यापारी वृत्ती दिसते. विक्री करीत असताना कोरकू बायकांशी लगटपणा करतो. व्यसनी व दुर्बल मोपाच्या असहाय्यतेचा फायदा घेतो. फुलयवर वाईट नजर ठेवतो. अशा कासमचे वर्णन लेखक करतात - ' घोटयाच्यावर लांडा पायजमा. आकाशी रंगाचा अंगात झब्बा. त्याच कापडाची डोक्यावर उंच दिवालची टोपी. चंद्रकोरीसारख्या दाढीवर त्यांचं टरबुजासारखं तोंड ठेवलेलं दिसत होतं. कानाच्या पाळीवर केसांचे बुचके ताठरलेले होते. निमगो-या तोंडावरील त्याची काळीशार दाढी आग्यामोहोळाच्या पोळयासारखी दिसत होती. ' (पृ.17) या वर्णनातून लेखक कासम मण्यारीवाला वाचकांच्या मन:चक्षूपुढे साक्षात उभा करतात.

कासम फुटकळ वस्तुंच्या विक्रीबरोबरच ढाण्यात लालपरीची विक्री करीत असतो. केरूला त्याचा याबाबत संशय येतो म्हणून कासम पोलिसांशी संगनमत करतो व केरूवर लालपरी विक्रीचा खोटा आरोप आणतो. त्यास पकडून देतो. कादंबरीच्या नायक नायिकेशी दुश्मनी धरणा-या कासमचा शेवट कादंबरीची नायिका फुलय हिच्या हातून होताना दिसतो. फुलय कासमला जेवणातून वाघाच्या मिशीतले केस खाऊ घालते. तो खंगून खंगून मरतो.

अशात-हेने व्यापारी वृत्तीचा, स्त्रीलंपट, कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांना लुबाडणारा कासम मण्यारीवाला मधुकर वाकोडे यांनी चित्रीत केला आहे.

**मालाय ...**

मालाय ही कोरकू ढाण्यातील बुडा-हिराजीची मुलगी होय. ती फुलयची मैत्रीण असते. आपल्या नव-याबरोबर माहेरीच राहते. कारण मालायच्या वडिलांना हुंडयाची रक्कम देण्याची तिच्या नव-याची ऐपत नसते. त्यामुळे हुंडयाचे कर्ज फिटेपर्यंत तो सासुरवाडीत कष्ट करणार असतो. होळीला ते कर्ज फिटणार असते. त्यानंतर ती आपल्या नव-याबरोबर हरीसालला जाणार असते. नव-याबरोबर बाजारला जाते. तेथे जयस्वालचे दुकानातील देशी दारू पिते. त्यामुळे तिची शुध्द हरपते. होळीसणाचे बाजार दिवशी लुगडं खरेदी करते. चैत्रामध्ये देवीदर्शन घेऊन मग ती सासरी जाणार असते. केरू तुझ्याशी बोलत नाही, कारण कासम तुझ्या घरी मुक्कामास असतो. याचा केरूला संशय अला आहे. हे सर्व ती फुलयला सांगते. नंतर केरू सीपना नदी काठच्या कुंडात अडकून मेला ही बातमी ती फुलयला येवून सांगते.

शुध्द जाईपर्यंत बाजारदिवशी दारू पिणारी, फुलयची विश्वासू मैत्रीण मालाय ही व्यक्तीरेखा वाकोडे यांनी चित्रीत केली आहे.

**अंगणवाडीच्या बाई ...**

कोरकू ढाण्यात असलेल्या अंगणवाडीत या बाई आहेत. दिसावयास देखण्या आहेत. लेखक या बाईंचे वर्णन करताना लिहितात - ' बाई गोरीपान. उंच सडपातळ. किंचित घारे डोळे. लांबट मुखोटा. लांब सडक लांब वेणी..... बाईच्या उजव्या गालावर तिळाचा ठिपका होता. गालावरच्या खळीत सापडलेला तो तीळ डोहातील भोव-यात गरगरणा-या माणसासारखा दिसत असे. ' (पृ.26) अशा दिसावयास सुंदर असलेल्या बाईंना एकशे पन्नास रूपये पगार मिळत असे. सरकारी अधिकारी तिच्यावर पूर्ण हक्क सांगतात. बिडीओला खुश करण्यास सर्व अधिकारी तिचा उपयोग करून घेतात. याबाबत तिने नकार देताच तिची आडगावी बदली करण्याच्या धमक्या तिला देतात. त्या धमक्यांना न भिता शेवटी या गोष्टीस ती नकार देते.

गवळी ढाण्यात संकरित गाईंविषयी ढाण्यातील लोकांना माहिती देण्यास डॉ.टिकेकर येतात. त्यांचेविषयी तिचे मनात प्रेम निर्माण होते. आपणही संसार करावा असे तिला वाटते. डॉ.टिकेकरही आपली सुप्त इच्छा तिच्यापुढे व्यक्त करतात. तेव्हा बाईंची मन:स्थिती वाकोडे यांनी परिणामकारक शब्दात लिहिली आहे. ' वा-यानं दारातून एक तरंगणारी बुट्टी खोलीत शिरली. ती समोरच्या भिंतीला टेकली. तरंगत वर वर गेली. आढयाला टेकता टेकता खोलीभर फिरली. पुन्हा हवेच्या झोतानं अधांतरी गरगरली आणि अचूक दाराचा नेम साधून क्वार्टर बाहेर सटकली. बाहेरच्या

वातावरणात पाहता पाहता अदृश्य झाली. " (पृ.92) ही निसटून जाणारी बुट्टी आलेल्या संधीच प्रतिक आहे. पण आपले ताट खरकटे आहे याची बाईंना जाणीव होते. त्या दुःखी होतात. पण नव्या भावनांनी तरंगत राहतात.

अशात-हेने स्वतःच्या भावनांना मुरड घालणारी, बदलीच्या धमकीस न भिणारी, अधिका-यांना नकार देणारी, संसार करण्याची इच्छा निर्माण झालेली अंगणवाडीची बाई वाकोडे यांनी चित्रीत केली आहे.

या व्यक्तीरेखांबरोबरच या कादंबरीतील कथानकास अनुरूप अशा अनेक व्यक्तीरेखा या कादंबरीत येतात. कादंबरीतील उपकथानकांना त्या पुढे नेतात. त्या व्यक्तीरेखा पाहू.

**डॉ. टिकेकर** ...

डॉ. टिकेकर हे ढाण्यातील लोकांना संकरित गाईंचे महत्व पटवून देण्यासाठी, पुण्यातील भारतीय कृषि उद्योग प्रतिष्ठान मधून आलेले आहेत. संकरित गाईंमुळे ढाणा सोडून जावा लागणार अहे असे लोकांना वाटते. त्यांचा हा गैरसमज दूर करण्याचा डॉ.टिकेकर प्रयत्न करतात. अंगणवाडीच्या बाईंजवळ आपली सुप्त इच्छा प्रकट करतात. कोरकूनांही संकरित गाईविषयी माहिती मिळावी असे त्यांना वाटते. त्यांच्या या गोष्टीस ढाण्यातील लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळत नाही. तरीही आज ना उद्या त्यांना याचे महत्व पटेल, या आशेवर ते ढाण्यात ठाण मांडून बसतात. असे सेवाभावी, चिकाटीने काम करणारे, अंगणवाडीच्या बाईंजवळ आपली सुप्त इच्छा प्रकट करणारे डॉ.टिकेकर वाकोडे यांनी या कादंबरीत चित्रीत केले आहेत.

**रहिमशेठ** ...

रहिमशेठ कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेतो. पडेल दरात कोरकूंच्या मालाची खरेदी करतो. कोरकूंना वजन-मापामध्ये फसवतो. स्वतःची तिजोरी भरतो. अशा रहिमशेठचे वर्णन लेखक करतात - " ठेंगणासा .... काळासावळा रहिमशेठ फार धूर्त होता. मलमलचा नेहरू शर्ट .... टेरिकॉटचा पोटाच्या अर्धढिरीवर चढविलेला पायजमा. उजव्या हातातील दोन बोटात दोन सोन्याच्या अंगठया.... डाव्या हाताच्या मनगटावर सोन्याची चेन असलेलं रिस्टवॉच आणि समोरच टक्कल पडलेलं असल्यानं तीन दिशांना मागे लोटलेले विस्कटलेले केस. त्याच्या गोल गुळगुळीत चेह-यावर सारी गोलमाल करणारी हास्याची उकळी. नेहरू शर्टाच्या खिशातून त्यानं कडक चारमिनार सिगरेटचं पाकीट काढलं.... वुईकेसमोर पाकीट ठेवून त्यानं सिगरेट पेटवली; तेवढयात केरूनं दुकानात पाय टाकला. तक्क्याला रेटलेल्या रहिमशेठनं आपले दोन्ही पाय मस्त पसरून एक झुरका मारला. "(पृ.30) या वर्णनातून लेखक रहिमशेठचे पात्र वाचकांचे मनःचक्षुपुढे उभे करतात. तद्वतच त्याच्या श्रीमंतीचे

दर्शन घडवितात. त्याबरोबरच तो मुत्सद्दी, अहंकारी, धूर्त, कावेबाज आहे ही बाब लक्षात येते. प्रत्येक कृती, हालचाल ही त्याच्या श्रीमंतीचे दर्शन घडविते. बाजारला आलेल्या बुडाहिराजीचा माल तो वरचेवर घेतो व प्रथम कर्जवसुली करून घेतो. यातून त्याची व्यापारी वृत्ती दिसते. आदिवासी सोसायटीतील साडया पंचवीस रूपयास एक याप्रमाणे खरेदी करतो. त्याच साडया कोरकू बायांना चाळीस रूपयाला एक याप्रमाणे विकतो.

असा श्रीमंत, धूर्त, व्यापारी वृत्तीचा, कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण करणारा, स्वार्थी, अहंकारी रहिमशेठ लेखकाने चित्रीत केला आहे.

**खंडेलवाल...**

कोरकू ढाण्यात खंडेलवालने किराणा मालाचे दुकान थाटले आहे. ढाण्यात येऊन त्याला दहा-पंधरा वर्षे झाली आहेत. कोरकूंना तो उधारीने माल देतो. होळीसणानंतर कोरकूंजवळ दमडीही शिल्लक राहात नाही, हा त्याचा आतापर्यंतचा अनुभव असतो. त्यामुळे उधारीने माल मागणा-याकडून प्रथम तो त्यांचेकडून उधारी वसूल करण्याचा प्रयत्न करतो. कोरकूंची भांडीकुंडी गहाण म्हणून ठेवून घेतो. त्याबदली कोरकूंना जीवनावश्यक वस्तु देतो. त्याची मुले अमरावतीला शिकत असतात. त्यामुळे घर मोकळेच असते. त्या घरात गहाणवटीची भांडी ठेवतो. कोरकूंनी ही भांडी दिवाळीपूर्वी सोडवून नेली नाहीत तर नंतर ती भांडी खंडेलवालची होत. त्याच्या या व्यवहारी स्वभावासंबंधी लेखक लिहितात, तो ' वल्लभचा वल्लभदास झाला होता. ' (पृ.34) म्हणजेच अतिशय थोडे पैसे घेऊन कोरकू ढाण्यात तो आला होता. पण आता तो श्रीमंत झाला होता. अशात-हेने व्यवहारी वृत्तीचा, कोरकूंची भांडीकुंडी गहाणवट म्हणून घेऊन त्यांना लुबाडणारा, फसविणारा, स्वार्थी खंडेलवाल वाकोडे यांनी या कादंबरीत चित्रीत केला आहे.

**जयस्वाल ...**

जयस्वालने गौलखेडच्या बाजारात दारूचे दुकान थाटले आहे. कोरकूंना लाल घाण पाणी पिण्यास देवून तो कमाई करतो आहे. लाल घाण पाणी कोरकूंना पिण्यास देणारा, त्यांचे शोषण करणारा तो एक शोषित होय, असे वाकोडे यांनी त्याचे चित्रण कादंबरीत केले आहे.

**बुडाहिराजी ...**

बुडाहिराजी कोरकू ढाण्यातील मालायचा बाप होय. मालायचा नवरा लांबजाना झालेला असतो. बुडाहिराजी कोंबडया पाळणे हा दुय्यम व्यवसाय करतो. तो होळीसणाला मालाय व लांबजाना यांना कपडे आणण्यासाठी बाजारला जातो. तेव्हा रहिमशेठ त्याचा माल वरचेवर घेतो.साठ

रूपयाची त्याचेकडून कर्जवसुली करतो. राहिलेले पैसे त्याचे हातावर ठेवतो. त्यामुळे तो लांबजान्यास कपडे घेवू शकत नाही, उदास होतो. परंतु रहिमशेठला प्रत्युत्तर देत नाही. असा बुडाहिराजी या कादंबरीत आहे.

तसेच या कादंबरीत इतर व्यक्तिरेखांमध्ये गावचा तलाठी **उत्तम** व त्याचा भाऊ **विठू** आहे. आदिवासी सेवा सहकारी सोसायटीच्या बांधकामाच्यावेळी चौकीदार म्हणून काम पाहणारा **संपत** आहे. संपतला दारूचे व्यसन आहे. कोरकूंना रहिमशेठ, टेमरे, वुईके फसवत आहेत हे त्याला समजते. त्यामुळे बायका दोन रूपये घेवून अंगठा उठवून जात आहेत, याचे खरे कारण तो केरूस सांगतो. त्याला कोरकूंविषयी कळवळा वाटतो. त्याच्या ख-या बोलण्यामुळे, सांगण्यामुळे त्याला जिवास मुकावे लागते. संपत नागर संस्कृतीतील (जांगडी) असूनही, कोरकूंविषयी सहानुभूती वाटणारा आहे. आदिवासी सोसायटीतून निवडून आलेला, सोसायटीचे सेक्रेटरीपद मिळाल्यानंतर साहेब बनलेला **वुईके** आहे. ग्रामपंचायतीचा सेक्रेटरी **टेमरे** आहे. सरळ स्वभाव असल्यामुळे रहिमशेठने पंधरा रूपयाची साडी पंचवीस रूपयास विकत घेतली आहे हे तो केरूस सांगतो. तसेच वुईके आमदाराविषयी केरूस कल्पना देतो व मच्छरानं हत्तीशी टक्कर देवू नये, असा सल्लाही केरूस देतो. गवंडीकामावरील बायकांच्या अंगास स्पर्श करणारा **गवंडी** आहे. केरूस रताळूच्या रानात जागरणास ठेवणारा, रताळूंचा व्यापार करणारा व गवळयांना गवळी ढाणा उठणार आहे याची माहिती देणारा **शंकर गवळी** आहे. तसेच डॉ.टिकेकरांबरोबर चर्चा करणारे, गवळी ढाणा उठणार हे समजताच चिंतेत पडलेले **अनेक गवळी** आहेत. याबरोबरच सोमाच्या घरात घुसून, त्याची बायको होणारी **रमोती** आहे. तसेच देढतलाईची **जासो** ही फुलयच्या आईची मैत्रीण असते. मुंगाबरोबर लग्न न लावता तिला दोन लेकरं झाली आहेत. गवंडयाने अंगास स्पर्श केला तरी त्याचे तिला काही वाटत नाही. अशी स्वच्छंदी स्वभावाची, फुलयच्या आईला अस्वलाने पकडले हे सांगणारी जासोही कादंबरीत आहे. या व्यक्तिरेखा प्रस्तुत कादंबरीत वाकोडे यांनी चित्रीत केलेल्या आहेत.

सारांश - वरील सर्व व्यक्तीचित्रणांचे आधारे मधुकर वाकोडे त्या त्या व्यक्तींचे वैशिष्ट्यपूर्ण स्वभाव, वृत्ती याचे चित्रण करतातच. त्याबरोबर कोरकू जमातीचे रितीरिवाज, परंपरा, समजुती, आदिवासींचे नागर संस्कृतीकडून होणारे शोषण सरकारच्या योजना व त्यास कोरकूंकडून मिळणारा प्रतिसाद, कोरकूंचे अज्ञान, सद्यकालीन विसंवादी, भ्रष्टाचारी जीवनपध्दतीचे अंत:प्रवाह यावर ते प्रकाश टाकतात.

**स्त्री - पुरूष संबंधाचे चित्रण ...**

प्रस्तुत कादंबरीत मधुकर वाकोडे यांनी कोरकूंच्या रूढी, परंपरा, समजुती, अंधश्रध्दा,

मंत्रतंत्रावरील व भूमकावरील विश्वास, होळीचा सण साजरा करण्याची पद्धती, त्यांचे अज्ञान, नागर संस्कृतीकडून त्यांचे होणारे शोषण, फसवणूक, सरकारी योजना व कोरकूंकडून त्याला मिळणारा प्रतिसाद यांचे चित्रण केले आहे. या सर्व प्रसंगांना अनुरूप अशी व्यक्तिचित्रणे रेखाटलेली आहेत. तद्वतच कोरकू जमातीतील स्त्री-पुरूष स्बंधाचे चित्रणही केले आहे. त्याचा आता परामर्श घेवू.

कोरकू जमातीतील स्त्री-पुरूषांचे संबंध खेळीमेळीचे दिसतात. जसे कोरकू होळी हा सण उत्साहाने साजरा करतात. होळीपूर्वी महिनाभर रात्रभर नाचतात. नाचाचेवेळी स्त्री व पुरूष एकत्र व हव्या त्या जोडीदाराबरोबर नाचतात. फुलय केरूबरोबर नाचते. त्या नाचात केरूही तिला साथ देतो. या उल्लेखातून लेखक कोरकूंचे स्त्री-पुरूष संबंध खेळीमेळीचे असतात, हे वाचकांच्या निदर्शनास आणून देतात. तसेच युवक युवती विवाहापूर्वी उघड उघड संबंधही ठेवताना दिसतात जसे - फुलय केरूबरोबर रानात जाते, केरू फुलयला मोळया बांधण्यास मदत करतो. मासळया पकडण्यासाठी दोघे एकत्र जातात. होळीसणापूर्वी भरलेल्या बाजारात दोघे फिरतात व ठंडार मिठार खातात. या उल्लेखातून लेखक कोरकू स्त्री-पुरूषांचे संबंध खेळीमेळीचे,सहकार्याचे असतात यावर प्रकाश टाकतात. नागर संस्कृतीमध्ये युवक-युवतीनी विवाहापूर्वी एकत्र फिरणे, संबंध ठेवणे, हे अनैतिक समजले जाते. कोरकूंमध्ये युवकयुवतींचे हे उघड उघड फिरणे अनैतिक समजले जात नाही.या उघड उघड संबंधातून, बाजारामध्ये होणा-या ओळखींमधून त्यांचे विवाह ठरतात. कोरकू युवती आपल्याला पसंत असलेल्या युवकाचे घरात घुसते. युवकास मुलगी पसंत असो अथवा नसो, त्यास जातपंचायतीचे निर्णयानुसार तिच्याशी विवाहबद्ध व्हावेच लागते. जसे रमोती ही कोरकू ढाण्यातील बाटूची मुलगी. ती कोरकू ढाण्यातील सोमा पटेलाच्या घरात घुसते. जातपंचायतीचे निर्णयानुसार रमोती व सोमा यांचा विवाह होतो. कोरकूंमध्ये विवाहापूर्वी युवक-युवती लैंगिक संबंध ठेवू शकतात. अशा संबंधातून संतान होणे गैर समजले जात नाही. जसे - जासो देढतलाई या गावची असते. मुंगा देढतलाईस सहा सात वर्षापूर्वी अपल्या नातलगाकडे गेलेला असतो. तेथे जासो त्यास गटवते. दोघेही चौ-या कुंडला पळून जातात. लेखक लिहितात - ती दोघेही ' ढाण्यात आली.... दोन लेकरं झाली पण लग्नांचा..... गावकीचं - जातपंचायतीचं कर्ज अजूनही फेडलं नाही त्यांनी, पोरीच्या मांडवातच आधी लग्न करतील..... मग मुलींचं. ' (पृ.64) या विवेचनातून युवक-युवतींनी लग्नाचं, गावकीचं, जातपंचायतीचं कर्ज फेडणे हे विवाहबद्ध होण्यापेक्षाही महत्वाचे मानले जाते. थोडक्यात कोरकूंमध्ये विवाहपूर्व लैंगिक संबंध ठेवणे अनैतिक समजले जात नाही. कोरकूंमध्ये मुलाने मुलीला हुंडा देण्याची

पध्दत आहे. मुलाची हुंडा देण्याची ऐपत नसल्यास त्याला लांबजाना (घरजावई) व्हावे लागते. जमातीने ठरवलेला हुंडा फिटेपर्यंत सासुरवाडीत कष्ट करावे लागतात. सासुरवाडीत कष्ट करावे लागतात म्हणून जावई खाटटू होत नाही. तो ती कामे आनंदाने करतो. आपल्या पत्नीवरही मनापासून प्रेम करतो. फुलय, केरू, मालाय व तिचा लांबजाना डोंगरातून मोळी आणण्यास जातात. तेव्हां 'मालायचा नवरा झाडावर चढलेल्या वेलीचे, वाघाटे तोडण्याचे इराद्याने मालायला घेऊन शेंबालूच्या झुडूपाआड गेला. त्या झुडूपाकडे पाहात केरू तिच्या कानात हळूच कुजबुजला " फुलय ऽऽ, डोंगोर जुलू लाकेन " फुलय ऽ डोंगर पेटलाय गं - । ' (पृ.33). या उल्लेखातून लेखक मालाय व तिचा लांबजाना या पती पत्नीचे प्रेममय संबंधावर प्रकाश टाकतात. तद्वतच फुलय व केरू यांचे विवाहपूर्व निष्पाप व निरागस प्रेमही वाचकांचे निदर्शनास आणतात. मालाय व लांबजाना बाजारात जातात. मालाय जयस्वालचे दुकानात देशी दारू पिते. दारूची नशा तिला चढते. ती बेशुध्द पडते. त्यावेळी लांबजान्याचे मन दु:खी होते व तो बेचैन होतो. या उल्लेखातून लांबजाना सासुरवाडीत कष्ट करीत असतो. त्याला सासुरवाडीत काम करावे लागते. तरीही त्याचे पत्नीशी संबंध मात्र अतिशय प्रेमाचेच दिसतात.

थोडक्यात - कोरकूंमधील स्त्री-पुरूष संबंध खोळीमेळीचे, सलोख्याचे, निष्पाप, निरागस व सहकार्याचे असतात.

फुलयचे वडील मोपा. मोपा कोणतेही कष्ट करीत नाही. फुलयने कमावून आणलेल्या कमाईवर तो आपले पोट भरतो. यात त्याला गैर वाटत नाही. फुलयच्या लग्नाची त्यास चिंता वाटत नाही. या उल्लेखातून कोणतेही कष्ट न करता, स्त्रीच्या कष्टावर जगणारे ऐतखाऊ कोरकू आहेत. मुलीचे लग्न झाले तर आपल्याला भाकरी कोण घालणार ? याचीच त्यास चिंता वाटते. फुलय कष्ट न करणा-या ऐतखाऊ बापास कष्ट करून खाऊ घालते. त्याने केरूसाठी तुमला पटेलला मागणी घालावी असे तिला वाटते. या विवेचनातून फुलयचे तिच्या वडिलांवरील प्रेम हे निर्व्याज तर वडिलांचे मुलीवरील प्रेम हे स्वार्थी स्वरूपाचे आहे असे दिसते. तर उलट कोरकू ढाण्यातील बुडाहिराजीची मुलगी मालाय, दारू पिवून बेशुध्द पडते. तेव्हा बुडाहिराजीला तिची काळजी वाटते. लग्न झालेल्या मुलीवरही पूर्वीसारखेच प्रेम करणारा बुडाहिराजी दिसतो. रमोती कोरकू ढाण्यातील सोमा पटेलाच्या घरात घुसते. बाटूस (वडिलास) हे कळते. जातपंचायतीस तो तेथे घेवून जातो व रमोती सोमास देवून टाकतो. या सर्व विवेचनातून बापाचे मुलीवरील प्रेम निर्व्याज स्वरूपाचे असते हे लेखक वाचकांचे निदर्शनास आणून देतात.

कोरकू ढाण्यात, व्यापारानिमित्त, कामानिमित्त आलेल्या जांगडयांचे ( नागर लोकांचे ) कोरकू स्त्रियांशी योग्य संबंध नाहीत असे दिसते. कासम मण्यारीवाला किरकोळ वस्तुंची विक्री करण्यास ढाण्यात येत असतो. कासम कोरकू पोरींना या वस्तु देताना व घेताना त्यांच्याशी लगटपणा करतो. व्यसनी, दुर्बल अशा मोपाची मुलगी फुलय, हिच्यावर तो वाईट नजर ठेवतो. या विवेचनातून लेखक त्याच्या कामुक वृत्तीवर प्रकाश टाकतात. गवंडी काम करताना आपल्या हाताखाली काम करणा-या स्त्रियांच्या अंगास जाणूनबुजून स्पर्श करतात. लेखक परिणामकारकपणे लिहितात - ' ही गवंडयाची जातच मुळी बिलंदर ? कोणत्याही गवंडयाला हाताशी म्हातारी चालत नाही. तरण्यापोरी......बाया त्यांना चालतात. आणि सर्वांची नजर कावळयासारखी. पोरींच्या अंगचटीला येता येता टोचणीही मारतात हे डोमकावळे. ' (पृ.77) या विवेचनातून गवंडी कोरकू स्त्रियांशी अश्लिलपणे वर्तन करतात या गोष्टीवर लेखक प्रकाश टाकतात. सरकारी अधिकारी अंगणवाडीच्या बाईना हक्काची मालमत्ता समजतात. तिचा उपभोग घेतात, कधी गोडीने तर कधी बदलीची धमकी देवून. या सर्व विवेचनातून लेखक नागर लोकांचे कोरकू स्त्रियांशी वागणे कामुकवृत्तीचे व अश्लिल असते. कोरकू स्त्रियांचे शारीरिक शोषण करण्याची वृत्ती दिसते. या सर्व गोष्टी लेखक वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

सारांश - कोरकू जमातीतील स्त्री - पुरूषांचे संबंध सलोख्याचे, प्रेमाचे, निर्व्याज सहकार्याचे दिसतात. परंतु नागर लोकांचे कोरकू स्त्रियांशी असलेले वर्तन अश्लिलतेचे दिसते.

**वातावरणनिर्मितीचे स्वरूप ...**

मधुकर वाकोडे यांनी **झेलझपाट** या कादंबरीमध्ये कोरकू जीवनाचे चित्रण केले आहे. कोरकूंचे जीवन नागर संस्कृतीपेक्षा वेगळे दिसते. हे वेगळेपण सांगण्यासाठी त्यांच्या वस्तीचे आसपासच्या परिसराचे, सणसमारंभांचे, शिकारीचे, मासेमारीचे, त्यांच्या सुधारणेचे, फुलयची आत्महत्या या प्रसंगाचे चित्रण वाकोडे करतात. या सर्व चित्रणातून अनुकूल वातावरणनिर्मिती वाकोडे यांनी कशाप्रकारे केली आहे, त्या त्या प्रसंगाचे नेमके चित्र वाचकांच्या नजरेसमोर कसे उभे केले आहे. त्याचा वाचकांच्या मनावर कसा कसा परिणाम होतो. त्या चित्रणातून लेखकाचा दृष्टिकोन कसा कसा व्यक्त होतो याचा परामर्श घेवू.

कोरकूंचे जीवन नागर संस्कृतीपेक्षा वेगळे आहे, याचे मधुकर वाकोडे वाचकांना दर्शन घडवितात. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाचे, वस्तीचे तपशीलाने वर्णन करताना दिसतात. त्यांच्या वस्तीचे वर्णन करण्यापूर्वी त्या वस्तीच्या आजुबाजूच्या परिसराचे वर्णन करतात. कोरकू ढाण्याकडे जाताना प्रथम एकझिरा लागतो. त्यानंतर समोरच पळसाचे झाडांनी झाकाळलेली टेकडी दिसते.

तद्नंतर पुढे सलोन्याला जाणारा रस्ता दिसतो, तो तारूबांद्याचे दोन भाग करतो. ' भांगानं जसं केसाचं जंगल दुभागलं जावं तसं तारूबांदा दोन ढाण्यात विभागलं. दोन्ही टेकडयांवरील झाडांची बेसुमार कत्तल झालेली. ह्या उजाड टेकडया संन्याशाच्या तासलेल्या डोकीसारख्या भगभगीत दिसतात. टेकडयांच्या घसरगुंडीवर कोरकूंची जीवघेणी मशागत. टेकडयांवरील ही चौकोनी कापसारखी वावरं बर्फीकापांच्या चळतीसारखी दिसतात. सर्कशीच्या तंबूवर फिरणं सोपं पण ह्या टेकडयावर पेरणं कठीणच. ह्या टेकडयांतून कोरकू कोदो......कुटकी....ज्वारी काढतात. आणि हंगामावर झेलवाले बेपारी त्यांना झपाटतात. तरीही कोरकू जगतात.... आनंदानं नाचत राहतात. ' (पृ.2) या चित्रणातून कोरकूंच्या शेतीचे दर्शन वाकोडे घडवितात. ही शेती त्यांच्या वस्तीत प्रवेश करण्यापूर्वी लागते पण ती वस्तीपासून फार दूर नसते. उजाड टेकडीवर जीवघेणी मशागत करून कोरकूंना शेतातून धान्य किती मिळत असेल याची कल्पना येते. या मिळालेल्या उत्पन्नावर व्यापारी डोमकावळयासारखे डोळा ठेवून असतात. धान्य निघताच व्यापारी प्रथम आपले कर्ज फेडून घेतात. मुळातच शेतातून मिळणारे उत्पन्न कमी, त्या उत्पन्नावरही व्यापारी झपाट मारतात. यातून किती उत्पन्न कोरकूंचे वाटयाला येत असणार ? तरीही कोरकू आनंदाने नाचतात, जगतात. तुटपुंजे उत्पन्न असणा-या कोरकूंच्या वस्तीची कल्पना वाचकांना कोरकूंच्या शेतीचे वर्णन वाचताच येते. वाकोडे यांना या चित्रणातून कोरकूंच्या दारिद्र्यावर प्रकाश टाकावयाचा आहे. त्यांच्या या दारिद्र्यास निकृष्ट शेती हे कारण आहेच. तद्वतच व्यापारी वर्गही त्यांच्या दारिद्र्यात अधिकच भर घालीत आहेत. हे वाचकांच्या दृष्टीस लेखकास आणून द्यावयाचे आहे असे दिसते.

टेकडीवरील शेतामधून पुढे जाताच कोरकू ढाण्याची शीव (वेस) लागते. ' गाव शिवेलगत एका चिंचेच्या मोठया झाडाखाली मुंडाचं ठाणं. अवतीभोवती नाग, प्रतिमा. हे नाग.... मूंड कोरकूंचे पितर. माथ्यावर सूर्य प्रतीक..... मागच्या बाजूस चंद्रकोर. लाकडाच्या गाभ्यात घोडयावर स्वार झालेला पितर आणि मुठवाभर नृत्य करणा-या मानवी आकृती कोरलेल्या. ' (पृ.2) या चित्रणातून कोरकूंच्या देवदेवनांचे, त्यांच्या रूढी-परंपरांचे दर्शन होते. एखाद्या गावात प्रवेश करण्यापूर्वी गावाच्या वेशीवर मारूतीचे मंदीर असते. त्या मंदीरावरून त्या गावाची जशी आपण कल्पना करतो तद्वतच वेशीतील या देवदेवतांवरून कोरकूंच्या ढाण्याची कल्पना येते. घराची कळा अंगण दाखविते तद्वतच कोरकूंच हे ढाणं, कोरकूंची वस्ती कशाप्रकारची असेल याची कल्पना हे चित्रण वाचताच वाचकांना येते. या चित्रणातून वाकोडे कोरकूंच्या अंधश्रध्दा मृतआत्म्याविषयी त्यांच्या कल्पना या गोष्टी वाचकांच्या निदर्शनास आणून देतात. शिवाय कोरकूंची वस्ती, राहणीमान व त्यांचे निसर्गनिष्ठ जीवन कसे असेल याची वाचकांना पूर्व कल्पनाही देतात.

अशाप्रकारे वाकोडे वस्तीचे वर्णन करण्यापूर्वी वस्तीच्या आजुबाजूचा परिसर कसा आहे याचे चित्रण करून कोरकूंच्या वस्तीचे वर्णन करण्यासाठी अनुकूल वातावरणनिर्मिती करतात.

ही वस्ती कशी दिसते ? याचेही तपशीलाने चित्रण वाकोडे करतात. ' माथ्यावरचा कोरकू ढाणा म्हणजे तीसचाळीस गवती झोपडयांच्या अमोरासमोर दोन रांगा, मधोमध खूप रूंद रस्ता, सागाची पानं.... गवत यांनी शाकारलेल्या झोपडयांना मागेपुढे अशी दोन दोन दारं होती. झापांनी बंद करता येण्यासारखी. कडीकोयंडा..... कुलूपकिल्ली यांचा विटाळ झोपडयांना असल्यानं माणसावरील भरोसा कायम होता. प्रत्येक झोपडीसमोरील आंगणवजा ओटा शेणाचा गिलावा केल्यानं सुबक दिसत होता. चोपडा गरगरीत ओटा आणि समोरच्या दोन्ही बाजूंना उभ्या खुंटावर आडवे सागांचे गोल टाकून त्याचे बाकडे केलेले होते. अंगणात एखादी बासाच्या तट्टयांची बाज आणि समोर सोडलेल्या शिंगाडया... फटाडया बंडया. ' (पृ.4) हे चित्रण वाचल्यानंतर वाचकांचे मनःचक्षुपुढे कोरकू ढाणा जसाच्या तसा उभा राहतो. तीसचाळीस झोपडया. या झोपडया समोरासमोर बांधलेल्या आहेत. मध्ये खूप रूंद रस्ता. कडी कुलुप नसलेल्या, सागाची पाने व गवत यापासून बांधलेल्या झोपडया. झोपडी समोरील अंगण चोपून गुळगुळीत केलेले, शेणाने सारवलेल्या अंगणामध्ये दोन्ही बाजूस सागाचे गोल बुंधे टाकून बनवलेले बाकडे. अंगणात एखादी बाज तीही बासाच्या तट्टयांपासून बनवलेली, अंगणासमोर बाजारला जाण्यास तयार केलेली बंडी (बैलगाडी) असे हे दृश्य वरील चित्रण वाचता वाचकांचे मनःचक्षुपुढे येते. यावरून कोरकू निसर्गामध्ये मिळणा-या वस्तुंचा वापर करून ऊन वारा पाऊस यापासून संरक्षण होईल अशी झोपडी बनवतात. चोपून व शेणाने सारवून तयार केलेले अंगण सागाचे बाकडे, बाजले, बंडी या सर्व वस्तु त्यांनी निसर्गामध्ये मिळणा-या वस्तुंपासून तयार केल्या आहेत. हे ही वाचकांच्या लक्षात येते. यातून लेखक कोरकूंची कलात्मकता व सौंदर्यदृष्टी वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

आदिवासी जीवनाचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी मधुकर वाकोडे कोरकू ढाण्याबरोबर गवळीढाणा रेखाटतात. गवळी ढाण्याचे वर्णन करून कोरकू ढाणा चित्रित करण्यासाठी ते वातावरण-निर्मिती करतात. याचे उदाहरण म्हणून आपल्याला पुढील गोष्टी पाहाता येतील. सूर्य अस्तास चाललेला होता रानातून इंधनासाठी आणलेल्या मोळया व मोहफुलाच्या पाटया अंगणात ठेवून कोरकू बायका पाण्यासाठी विहिरीकडे धावतात. तत्पूर्वी गौळणी विहिरीवर पाणी भरण्यासाठी आलेल्या होत्या. लेखक वर्णितात ' गौळणींच्या तुपकट वासाने थिजलेला वारा कोरकू बायकांच्या घामट वासानं चेन्काळला होता. वसरासारखा हुंदडत ढाण्यात चौखूर उधळत होता. ' (पृ.3) हे तुलनात्मक चित्रण वाचल्यानंतर नागर जीवन व कोरकू जीवन यांच्यातील वेगळेपण वाचकांचे लक्षात येते. गौळणी विहिरीचे पाणी सूर्यास्तापूर्वी भरतात, पण कोरकू स्त्रियांना रानातून मोळया व मोहफुलं

वेचून आणण्यास संध्याकाळ होते, त्यामुळे अंधार पडतेसमयी त्या पाणी भरतात. रानातून आल्यामुळे घामाने त्यांची शरीरे भिजतात. कष्टप्रद जीवन त्यांना जगावे लागते. वा-यालाही त्याची जाणीव होते व तोही नागर जीवन व कोरकू जीवन यातील वेगळेपणाची ओळख करून देतो. हे वाचकांच्या लक्षात येते. लेखक कोरकू स्त्रियांचे कष्टप्रद जीवन वाचकांचे निदर्शनास आणून देतात. तसेच 'एकाच डोईवरील केसांना भांग विभागून टाकतो, डावा.....उजवा तारूबांदा गाव असचं विभागलं... गवळी ढाणा सर्वच बाबतीत उजवा तर कोरकू ढाणा सर्वच बाबतीत डावा. गवळी ढाण्यात दुधातुपाचा धमकारा तर कोरकू ढाण्यात दारूचा भपकारा. एकीकडं अंधाराशी कुस्ती खेळणारं काळेपण तर दुसरीकडं सोन्याला सुस्ती आणणारं पिवळेपण. एकीकडं लक्ष्मीची उघडी लाज तर दुसरीकडं तिला चढलेला साज आणि तरीही कोरकूंना दिशा सापडत नव्हती. दशा संपत नव्हती. ' (पृ.21) असे गवळी ढाण्यातले लेखक वर्णन करतात व त्या पार्श्वभूमीवर तुलनात्मक दृष्टीने कोरकू ढाणा चित्रित करतात. गवळी ढाण्यात सर्व गोष्टींची सुबत्ता आहे. लक्ष्मी येथे पाणी भरताना दिसते. गवळी पशुपालनाचा व्यवसाय करून भरपूर उत्पन्न कमवीत आहेत. उलट कोरकू ढाण्यात दारिद्रय हे चोवीस तास पाणी भरताना दिसते. नागर लोकांचे अनुकरण करून आपणही आपले दारिद्रय घालवू शकतो हा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही. त्यामुळे आहे या परिस्थितीत जीवन जगणे, रूढीने परंपरेने जे उद्योग आहेत तेवढेच उद्योग करणे, यामुळे कोरकू दारिद्रयामध्ये पिचत राहतात. हे वाचकांच्या निदर्शनास येते. कोरकूंच्या दारिद्रयावस्थेचे (गरिबीचे) दर्शन लेखक वाचकांना घडवितात. त्यासाठी लेखक गवळी ढाण्याची पार्श्वभूमी रेखाटतात व अनुकूल वातावरणनिर्मिती करतात. कासम फुलयचे घरी जेवण्यास थांबतो. फुलयच्या हातात ग्लास देताना तो तिच्या हातास स्पर्श करतो. त्यावेळी फुलयच्या मनात येते - ' ह्या मोहरमच्या वाघानं अजून जंगलचा वाघ पाहिला नाही का ? केरूला कळलं तर ? कुठं माझा जंगली वाघ आणि कुठं हा सरडा? ' (पृ.24) या चित्रणातून लेखकाने कोरकूंमध्ये असलेल्या शक्तीचे, साहसाचे मार्मिक वर्णन केले आहे. त्याबरोबर कासम मण्यारीवाला या जांगडीशी कोरकूंची तुलना केली आहे. या तौलनिक व विरोधात्मक चित्रणातून दोन्ही वस्तीतल्यावातावरणात असणारा फरक लेखक वाचकांच्या लक्षात आणून देतात.

वरील चित्रणातून लेखक आदिवासींचे जीवन नागर संस्कृतीपेक्षा वेगळे कसे आहे याचे वाचकांना दर्शन घडवितात. त्यासाठी आसपासच्या परिसराचे म्हणजे गवळी ढाण्याचे चित्रण करतात व गवळी ढाण्याचे वर्णन करून तुलनात्मक अशी अनुकूल वातावरणनिर्मिती करतात. तसेच कोरकूंचे जीवनाचे वेगळेपण अधिकाधिक परिणामकारकपणे चित्रीत करतात.

ज्याप्रमाणे लेखक गवळी ढाणा व कोरकू ढाणा यांच्यामध्ये तुलना करून कोरकूंचे वेगळेपण निदर्शनास आणतात तद्वतच या दोन्ही ढाण्यांमध्ये विरोध दाखवून कोरकू ढाण्याचे परिणामकारक चित्रण करण्यासाठी अनुकूल वातावरणनिर्मिती करतात. ' कोरकूढाण्याच्या परीस गवळी ढाणा अब्रू सांभाळून होता. दह्यादुधाच्या वासानं कृष्ण बासरीवर धून छेडत होता. त्या सुरावर भाळलेली लक्ष्मी गवळी ढाण्यात रमली..... दारूच्या वासानं वेधलेली अवदसा कोरकू ढाण्यात कायमची विसावली. ' (पृ.61) या चित्रणातून दारूमुळे कोरकू ढाण्यात दारिद्र्य कसे विसावले आहे याचे चित्रण केले आहे. दारूच्या व्यसनामुळे कोरकूंना विपन्नावस्था प्राप्त झाली आहे हे लेखक वाचकांच्या लक्षात आणून देतात.

नैसर्गिक वातावरणनिर्मिती करून लेखक कोरकू जीवनाचे वेगळेपण स्पष्ट करतात. जसे ' सू ऽ सू ऽऽ वाहणारा वारा कच-याची कोय करून कोरकू ढाण्यात डिग्गर खेळत होता. इकडचा पालापाचोळा तिकडे आणि तिकडचा केरकचरा इकडे फेकून बायकांचे पदर खेचत होता. वाडग्यात गोव-या थापणा-या गौळणींच्या कानात हा वारा बांबूची सुरावट ओतत होता. त्या तंद्रीत त्यांचा पदर वक्षाखाली ओढत होता. ' (पृ.73) या चित्रणातून निसर्ग देखील कोरकू ढाण्यावर कसा रूष्ठ होता हे लेखक वाचकांच्या लक्षात आणून देतात.

सारांश वरील सर्व चित्रणातून लेखक आदिवासी जीवनाचे (नागर संस्कृतीपेक्षा) वेगळेपण चित्रीत करतात व त्यासाठी अनुकूल वातावरणनिर्मिती करतात.

फुलयला केरूच्या मृत्यूची बातमी कळते त्यानंतरचे वातावरण लेखकाने अतिशय परिणामकारकरित्या चित्रीत केलेले दिसते. ' बाहेर मंद चांदण्यात गवळी ढाण्यातील गाईंच्या टापरांचा आवाज विर्घळला होता. एकटं दुकटं कुत्रे भुंकत होतं. गावशिवेलगत चिंचेच्या झाडाजवळून जाताना ती नागप्रतिमेकडं वळली. तुंब्यातील सारी दारू त्या प्रतिमेवर ओतली. तुंबा तिथेच टाकून ती कुंडाच्या रस्त्यानं लागली. बाहेरच्या मोकळया हवेनं तिला उत्साह वाटला. दारूची झणझणी जाणवली. अनवाणी पायांनी दगडांना ठेचकाळत.... पाला पाचोळा तुडवीत..... झुडुपांना चुकवत ती सीपनाकडं निघाली. तिला कशा कशाचं भान नव्हतं. सीपनाच्या काठानं टिटव्यांनी टिवटिवाट केल्याचं तिच्या कानावर पडलं. कुंडाच्या रस्त्यानं रात्री जनावरं फिरकतात असं लोक म्हणतात. कुठं गेली ती जनावरं ? का त्यांची अजून वेळच झाली नाही ? या विचाराच्या तंद्रीत ती कुंडाजवळ केव्हा आली हे देखील तिला कळलं नाही. दगडांवर पांढुरट.....हिरवट धब्बे तिला चांदण्यात जाणवले. पण पाणी स्थिर..... शांत.... काळेभोर होते. कपारीच्या काठावर येताच कुंडात कुणी उडी मारल्यासारखा आवाज तिच्या कानावर पडला.

आणि सारी शक्ती एकवटून ती आकांतानं ओरडली, " डोगे ऽऽ गाडान चिपोळ टाखा " उडी मारल्याचा आवाज झाला त्या ठिकाणी पाण्यातून सुरकांडी मारून वर आलेल्या केरूनं, " इयांन ऽ पार मालूम....'' म्हणून तिला खिजवलं. हे सत्य का भास याचं भान तिला राहिलं नाही आणि डु ऽ डूबू ऽऽ असा पाण्यात आवाज झाला. पाण्याच्या उडालेल्या शिंतोडयांनी कपारीचे कोरडे दगड ओले झाले. क्षणभर पाणी हेलकावलं.... पुन्हा पाण्यात हालचाल झाली.... पाणी हेलकावलं आणि पाणी स्थिर होता होता जणू आसरांच्या ओठावर शब्द फुटले,

लाहोरी फसी गई राम ऽऽ

शिकारीने फूंदा डाले ऽऽ । सीपनाच्या कोरडया पात्रात सूर वा-यावर थरथरले. ' (पृ.98) या वर्णनातून आपल्या प्रियकराच्या मृत्यूची बातमी ऐकताच फुलयची झालेली मनोवस्था, केरूला भेटण्यास त्याचेकडे जाण्यास तिचे तयार झालेले मन रस्त्यातील जनावरांना, काळोख्या रात्रीलासुध्दा कसे भीत नाही, केरूच्या मृत्यूस्थळी येताच तिला त्याचा झालेला भास, शेवटी स्वतःला त्या कुंडात झोकून देणे या सर्व गोष्टींचे चित्रण लेखक वाचकांच्या मनःचक्षूपुढे जसेच्या तसे उभे करतात.

सारांश - वरील सर्व विवेचनावरून मधुकर वाकोडे यांनी कोरकू जीवनाचे चित्रण केले आहे ते चित्रण करताना कोरकूंचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी, त्यांच्या वस्तीचे, आसपासच्या परिसराचे चित्रण केले आहे. सणसमारंभाचे,शिकारीचे, मासेमारीचे, कोरकूंच्या शोषणाचे, फुलयच्या आत्महत्येचे चित्रण केले आहे. हे चित्रण परिणामकारक होण्यासाठी अनुकूल प्रसंगानुरूप वातावरण-निर्मिती केलेली दिसते. प्रभावी वातावरणनिर्मितीमुळे कादंबरीतील घटना, प्रसंग, कथानक यांची तीव्रताही त्यामुळे वाढली आहे. परिणामकारक वातावरणनिर्मितीसाठी विविध पध्दतींचाही त्यांनी अवलंब केलेला आहे. परिणामकारक प्रभावी वातावरणनिर्मितीमुळे त्यांच्या लेखनाचे विशेषही प्रकट होतात. त्यामुळे लेखकाच्या या चित्रणास वाङ्मयीन गुणवत्ताही आलेली दिसते.

**निसर्गाचे चित्रण** ...

प्रस्तुत कादंबरीत मधुकर वाकोडे यांनी ज्याप्रमाणे परिणामकारक प्रभावशाली व प्रसंगानुरूप वातावरणनिर्मिती केलेली आहे. तद्वतच निसर्गाचे चित्रणही केलेले दिसते. हे निसर्गवर्णन कादंबरीत प्रतिमा व प्रतिकांद्वारे चित्रीत केलेले आहे. कोरकू जीवनाच्या विविध अंगांचे चित्रण करताना वाकोडे यांनी निसर्गाची विविध रूपे चित्रीत केली आहेत. त्याचा आता परामर्श घेवू.

निसर्ग हा कोरकूंच्या जीवनातील अविभाज्य घटक होय. विविध प्रतिमांच्या माध्यमातून निसर्गाचे वेधक व यथार्थ चित्रण करताना लेखक मधुकर वाकोडे लिहितात -

' माघापासूनच उन्हाचा पूर चढत होता. झाडाची पानं पिवळी धम्म झालेली. गळणारी पानं वा-यासंगं भिरभिरत जमिनीवर विसावत होती. सळसळ करीत दरीतील झाडांच्या बोडख्यावर बसत होती. त्यांनी मान झटकली की पायालगत साचत होती. माघाच्या प्रांरभी झालेल्या गारपीटीनं पानांच्या फर्दळया झाल्या होत्या. चिंध्यात लपेटलेल्या फाटक्या माणसासारखी झाडं होती पण आता अस्थिपंजर.... उदासवाणी उभी होती. नागवल्या गेलेल्या माणसावानी • आणि त्याचवेळी पळस फुलारत होते. अठरापगड जातींचं वैभव एकाच जातीत साठवलं जावं तसं पळसाचं वैभव वाढत होतं. बोडख्या डोंगरावरील हे फुलारलेपण अधिकच उठून दिसत होतं. ' (पृ.1) माघ महिन्यात दिसणारे निसर्गसौंदर्य मानवी जीवनाचे जणुकाही दर्शनच देत आहे, माणसाची अवस्था जणुकाही तो आपल्या रूपात दाखवित आहे असे वर्णन वाकोडे करतात. झाडाची पाने गारपीटीने फाटतात. फाटक्या माणसाच्या जीवनाची उपमा गारपीटीने फाटलेल्या विदीर्ण झालेल्या पानांना देतात. नागवला गेलेल्या संपूर्णपणे लुटल्या गेलेल्या माणसाची उपमा झाडांना देतात. प्रतिमा व प्रतिके या माध्यमातून निसर्गाचे चित्रण केले आहे. ' काळपट पांढरवट चटटेपटटे असलेल्या काही झाडांच्या उघडया मुळया वेटोळे घातलेल्या अजगरासारख्या दिसत होत्या.... धुळवडीच्या दिवशी एखाद्याच्या कपाळावर भरपूर गुलाल फासल्यावर त्याच्या पायाखालचा फफुटा जसा लालसर दिसतो तसा पळसपरिसर दिसत होता. ' (पृ.1) 'खटयाळ पोरीनं धुळवडीला पसाभर माती अंगावर फेकूनपळ काढावा तशी वावटळ त्याच्या अंगावर मातीकचरा उधळून गेली. ' (पृ.15) ' वा-यावर डोलणा-या रानफुलाला गोणपाटाच्या पडद्याआड दडलेली घाण माहीत नसते.... राघूसोबत भरारी मारणा-या मैनाकडे डोमकावळयानं पहावं तसा कासम फुलयकडं पाहत राहिला..... पाण्याच्या आधारानं फिरस्त्यांनी आपली पालं थाटावी तशी खेकडयांनी डवक्यांच्या आजूबाजूला माती पोखरून आपली बिळं थाटली होती. ' (पृ.18) उन्हाळयात कोरडया पडलेल्या सीपना नदीचे वर्णन करताना वाकोडे लिहितात - ' भर पावसाळयात सुसाट वाहणारी सीपना आता कोरडी पडली होती. पावसाळयातील तिच्या जोरकस धारेनं कितीतरी दगडांना चित्रविचित्र आकार दिले होते. काळाशार प्रचण्ड...... विस्तीर्ण दगडावर तिनं पन्हाळीसारख्या नक्षी उठवल्या होत्या तर काळ्या पाषाणांना कोरून त्यात मडकी घडविली होती. ' (पृ.20) या निसर्ग वर्णनातून लेखकाच्या सौंदर्यदृष्टीचे दर्शन घडतेच तद्वतच लेखक निसर्ग सौंदर्याचे मोहक दर्शन वाचकांना घडवितात. नदीला त्यांनी कलाकाराची उपमा दिली आहे. चैत्रपूर्व पालवीचे वर्णन लेखक करतात - 'फागाच्या पावलांचा आहाट झाडाझुडपांना जाणवला. कडेकपारीतील झाडांची पालवी रंगरूपांनी चकाकू लागली.

त्या लुसलुशीत पानांच्या विविध रंगच्छटांनी रान मोहरू लागले. चैत्रात ह्या रंगरूपांना अधिक आकार येणार होता. कॅनव्हासवर चित्र काढणा-या कलावंताने रंगारंगाचे कुंचले एखाद्या फडक्याला पुसल्यावर त्या रंगलाल फडक्यानंच अधिक दिमाख मिरवावा त्याप्रमाणे चैत्रापूर्वीच ही रानपालवी अधिक मिजास मिरवू लागली होती. ' (पृ.25) अशी मोहक निसर्गवर्णने वाकोडे यांनी चित्रीत केलेली आहेत. हे वर्णन होळीची चाहूल लागताच आनंदाने धुंद होऊन जाणा-या कोरकूंची मानसिक अवस्था स्पष्ट करते. ' झाडांनी देखील पायांना चटके बसल्यानं क्षणभर आपल्याच सावल्यांच्या वहाणा आपल्या पायाखाली घेतल्या. ' (पृ.51) याप्रमाणे दुपारी झाडाजवळ पडणा-या सावलीचे वास्तवपूर्ण वर्णन लेखक करतात. फुलय अपरात्री वाघाचे मिशीतील केस आणण्यास जाते. या प्रसंगी अपरात्रीचे वर्णन करताना लेखक लिहितात - ' फिकट चन्द्रप्रकाशात हलणा-या झाडांच्या सावल्या भेसूर दिसत होत्या आणि त्या सावल्यात एक सावली मिसळत होती...... पानांची सळसळ ..... सीपनाच्या काठानं चाललेली टिटव्यांची टवाळकी.... अवेळी पाखरांचं चित्कारणं..... एखाद्या सरपटणा-या जिवाणूनं पाचोळयांत केलेली वळवळ.....रातकिडयांचा धिकृधिक् आवाज '.... (पृ.57) अशी अनेक निसर्गवर्णने वाकोडे वास्तवपूर्ण व चित्रमय रेखाटतात. ही वर्णने त्या त्या प्रसंगास योग्य अशीच आहेत. अंगणवाडीच्या बाई व डॉ. टिकेकरांची ओळख होण्यापूर्वी डॉक्टरांचा ढाण्यातील प्रवेश, अंगणवाडीच्या बाईचे मन फुलून येणे हे प्रसंग रेखाटण्यापूर्वी लेखकांनी चैत्राचे केलेले वर्णन मोहक व यथार्थ वाटते जसे - ' चैत्राच्या चैतन्याची कळा आता रानभर पसरली होती. मोहाच्या पानांना लालचुटूक पानांचा साज चढत होता. तो कोवळी लुसलुशीत पानं वा-यावर हलताना उघडझाप करणा-या बाळमुठीसारखी दिसत होती. जांभूळाच्या झाडांना हिरवट तोरम दिसू लागले होते. सीपनाकाठच्या झाडाच्या गर्दीत भटकणा-या शिंदीला खजुरासारखे शेंदरी घोस टुमकवत होते.' (पृ.73) पुढील प्रसंगाची वातावरणनिर्मिती निसर्गचित्रणातून होताना दिसते.

निसर्गातील प्रत्येक घटकाशी कोरकूंचे जवळचे नाते होते. कोरकू ढाण्याजवळील रानात असणारा वाघ-अस्वलांचा संचार, मोहाच्या झाडाची फुलं गोळा करण्याचा हंगाम, मोहफुलांचा जमीनीवर सडा, त्याचा मादक उग्र दर्प (वास), इंधनासाठी मोळया व मोहफुलाचा संचय करून ठेवण्यास मोहफुलं घेऊन जाणा-या बायका, मोहाची दारू, चैत्रपालवी, चैत्री अमावस्येपासून देवीदर्शनास निघालेल्या कोरकूंच्या बंडया, सीपना नदीच्या डोहात चालणारी मासेमारी, कपारीत असणा-या सातीआसरा या सर्व उल्लेखातून कोरकू स्त्री-पुरूषांचा जीवनक्रम निसर्गाशी पक्का बांधला गेला आहे. याचे दर्शन लेखक वाचकांना घडवितात. या न्सिर्गाच्या साक्षीतच कोरकूंच्या जीवनातील सा-या घडामोडी घडत असतात.

प्रसंगानुरूप घटनांना अनुरूप, व्यक्ती व तिच्या भावना व्यक्त करण्यास वाकोडे जसे निसर्गातील प्रतिमा व प्रतिकांचा वापर करतात व वर्णन करतात तद्‌वतच त्यांना आकारही देतात. मासोळयांच्या मागे धावणा-या केरूला डोह आपल्या कवेत घेतो. तर मोहाची दारू प्याल्यावर धुंद तरूण-तरूणींना तो एकत्र आणतो. जंगलातला वाघ मार्गात आलेल्या गाईचा बळी घेतो. तर मोहाची फुले खाणा-या अस्वलांना फुलयच्या आईचे अतिक्रमण सहन होत नाही. अस्वलाची मादी कामातुर होऊन पुरूषाला नको ते करायला भाग पाडते. सावली माशाच्या डोक्यातील गारेचा खडा उगाळून त्याचे चाटण खाल्ल्यास मुतखडयाचा विकार जातो. अस्वलीच्या नाजूक भागाचा तुकडा मंत्र टाकून तोंडात ठेवला तर समागम करताना अचाट शक्ती येते. यासारखे समजही कोरकूंच्या निसर्गमय जीवनाची जाणीव करून देतात.

वरील सर्व वर्णनातून निसर्गातील विविधता समृध्दता वाचकांच्या नजरेत भरते. आतापर्यंत निसर्गाचे चित्रण कथा कादंब-यातून उप-या स्वरूपातच येत होते. पण या कादंबरीतील निसर्ग येथील माणसांच्या जीवनाचा एक भाग म्हणून येतो. या सर्व चित्रणातून निसर्गसौंदर्याचे दर्शन मधुकर वाकोडे घडवितात. अनेक घटना, प्रसंग भाव-भावना, कोरकूंच्या समजुती, रूढी-परंपरा यांचेही दर्शन निसर्गातील विविध प्रतिमांच्या माध्यमातून लेखक वाचकांना घडवित आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखनाचे विशेषही यातून प्रकट होतात. अशा चित्रणामुळे, वर्णनामुळे त्यांच्या लेखनास वाङ्‌मयीन गुणवत्ताही आलेली आहे.

**सारांश ...**

प्रस्तुत प्रकरणात मधुकर वाकोडे यांच्या **झेलझपाट** या कादंबरीचा परामर्श घेतला आहे. वाकोडे यांनी कादंबरीत कोरकू जीवनाचे, तेथील दारिद्रयाचे नागर लोकांकडून होणा-या त्यांच्या शोषणाचे नागर लोकांशी संबंध आल्याने कोरकूंच्या जीवनात होणा-या बदलांचे, केरू व फुलय यांच्या प्रेमकथेचे चित्रण केले आहे.

फुलयच्या कुटुंबात तिचा वडील (मोपा) दारूडा असल्याने कुटुंबाची सर्व जबाबदारी ती सांभाळते. केरूच्या कुटुंबात वडील (तुमला पटेल), आई काम करत आहेत. त्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती बरी आहे. कोरकूंची अन्न, वस्त्र, निवारा या तीन प्राथमिक गरजा नीट भागतील अशी परिस्थिती नसते. त्यातच दारूचे व्यसन त्यांच्या दारिद्रयामध्ये अधिकच भर घालते. दारिद्रय हा त्यांच्या जीवनाचा एक भागच बनून गेलेला दिसतो. कष्ट करणे, कर्जबाजारी होणे आणि उपाशीपोटी राहणे हेच त्यांचे नित्याचे जीवन असल्याचे दिसते. याचे त्यांना काही वाटत नाही.

मासेमारी हा कोरकूंचा आवडता छंद दिसतो. त्यासाठी ते अधिक मिळणा-या मजुरीकडे दुर्लक्ष करताना दिसतात. अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यावर कोरकूंचा विश्वास दिसतो. परंपरांची, रूढींची जपणुकही ते करताना दिसतात. होळी हा सण उत्साहाने साजरा करतात. त्यासाठी घरातील मोह, धान इ. वस्तु विकतात. होळीचेवेळी शिकार करतात. यातून त्यांची शिकारीवृत्तीही निदर्शनास येते. घरात घुसणे, लांबजाना होणे इ. अनेक पध्दतीने कोरकू जोडीदार मिळवितात. मुलाने मुलीस हुंडा देण्याची पध्दत दिसते. कोरकूंमध्ये जातपंचायतीने दिलेला निर्णय सर्वबाबतीत अंतीम समजला जातो. पंचायतीने दिलेल्या निर्णयाचे, ठरवलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास त्यास वाळीत टाकले जाते. जांगडीकडून (नागर लोकांकडून) कोरकूंची फसवणूक होते. जांगडी कोरकूंच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांचे शोषण करतात. कोरकूंना त्याचे काहीही वाटत नाही. नागर लोकांकडून होणारे शोषण हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भागच बनलेला दिसतो.

आदिवासींच्यात सुधारणा व्हाव्यात यासाठी सरकार अनेक योजना राबवताना दिसते. परंतु कोरकूंच्या अज्ञानामुळे या योजनांना कोरकूंकडून म्हणावा तितका प्रतिसाद मिळत नाही असे दिसते. तरीही कोरकूंमध्ये सुधारणा करावयास आलेले अधिकारी लोक अतिशय चिकाटीने, कसोशीने प्रयत्न करताना दिसतात. कोरकूंना शिक्षण घेण्याची आवड निर्माण होण्यास त्यांच्याच भाषेत पुस्तके काढणे गरजेचे आहे असे दिसते.

वाकोडे यांनी कादंबरीत केरू, फुलय, मालाय, रहिमशेठ, कासम मण्यारीवाला, अंगणवाडीच्या बाई, डॉ. टिकेकर इत्यादीं व्यक्तीचित्रणे रेखाटलेली आहेत. या व्यक्तिचित्रणांचे आधारे लेखक त्या त्या व्यक्तींचे वैशिष्टयपूर्ण स्वभाव, वृत्ती यांचे परिणामकारक चित्रण करतातच. शिवाय कोरकूंचे अज्ञान, सद्यकालीन विसंवादी भ्रष्टाचारी जीवनपध्दतीचे अंतःप्रवाह याचेही दर्शन वाचकांना घडवितात. कोरकूंमधील स्त्री-पुरूष संबंध खेळीमेळीचे, सलोख्याचे, निष्पाप, निरागस व सहकार्याचे असलेले दिसून येतात. या सर्व घटना प्रसंगांचे कोरकूंच्या रूढी, परंपरा, त्यांचे शोषणाचे चित्रण, सरकारी योजना या सर्वांचे चित्रणाबरोबर केरू व फुलय या नायक-नायिकेच्या प्रेमाचे अनेक पदरही लेखकाने अतिशय हळुवारपणे उलघडले आहेत, खुलविले आहेत. त्यामुळे ही कादंबरी अधिक रोचक होते. आदिवासींच्या संदर्भातील अनेक वास्तववादी पैलू (विशेष) लेखकाने अतिशय कौशल्याने चित्रीत केलेले आहेत.

मधुकर वाकोडे कोरकूंचे वेगळेपण स्पष्ट करण्यास त्यांच्या वस्तीचे आसपासच्या परिसराचे सणसमारंभाचे, शिकारीचे, मासेमारीचे, कोरकूंच्या होणा-या शोषणाचे, फुलयच्या आत्महत्येचे चित्रण करतात. हे चित्रण परिणामकारक होण्यास प्रसंगानुरूप यथार्थ अशी वातावरणनिर्मितीही त्यांनी केलेली आहे. त्यामुळे कादंबरीतील घटना, प्रसंग, कथानक यांची तिव्रताही वाढली आहे. परिणामकारक वातावरणनिर्मिती होण्यासाठी विरोध व लय, तौलनिक पध्दती अशा विविध पध्दतींचा वापरही केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाचे विशेषही प्रकट होतात. वाङ्मयीन गुणवत्ताही त्यामुळे चित्रणास आलेली दिसते.

निसर्ग हा कोरकूंच्या रोमरोमात भरलेला आहे. ज्यांचे जीवनच निसर्गाशी निगडीत आहे त्यांचे जीवनाचे चित्रण करताना वाकोडे निसर्गाचे चित्रणही करतात. चित्रीत केलेला निगर्स हा तेथील माणसांच्या जीवनाचा एक भाग म्हणून येतो. त्यामुळे ओढून ताणून निसर्गाचे चित्रण केले आहे असे वाटत नाही. निसर्ग चित्रणातून लेखक निसर्ग सौंदर्याचे दर्शन घडवितातच त्याबरोबरच कोरकूंच्या जीवनाचे वेगळेपण त्यांची संस्कृती, त्यांच्या रूढी, परंपरा यांचेही यथार्थ दर्शन घडवितात. उपमा, उत्प्रेक्षा या अलंकारांचा वापर करून निसर्गातील प्रतिमा व प्रतिके यांचे माध्यमातून कोरकूंचे जीवन-चित्रण वाकोडे यांनी अतिशय वास्तव व परिणामकारकपणे चित्रीत केले आहे.

शंकर सारडा मधुकर वाकोडे यांच्या **झेलझपाट** कादंबरी बद्दल म्हणतात - ' बदलत्या कोरकू समाजजीवनाचे एक अस्सल, विश्वासार्ह बृहद्दर्शन ही कादंबरी घडवते. अनावश्यक पसारा न मांडता, विशेष घोळ न घालता घडवते.[2] ' शंकर सारडा यांच्या या विवेचनावरून मधुकर वाकोडे यांनी कोरकू समाजाचे वास्तव चित्रण यथायोग्य, पाल्हाळ न लावता, परिणामकारक केले आहे. शंकर सारडा वाकोडे यांच्या झेलझपाट या पुस्तकाची ओळख (परिचय) करून देताना लिहितात - ' कोरकू या आदिवारी जमातीच्या पार्श्वभूमीवरील झेलझपाट ही कादंबरी सरळरेषेत जाणारी साधी प्रेमकथा आहे; परंतु कोरकूंच्या समाजजीवनाचे आणि मूल्यप्रणालीचे प्रामाणिक आणि विश्वासार्ह दर्शनही ती घडवते. पारंपारिक आदिवासी जीवनपध्दतीला टायगर प्रोजेक्ट, सहकारी संस्थातील भ्रष्टाचार, शासकीय अधिका-यांची अरेरावी, बाहेरून आलेल्या लबाड व्यापारी वर्गाची लुबाडणुकीची वृत्ती या सर्वांमुळे धोका निर्माण होतो, आणि तिला तडे जाऊ लागतात - याचे एक सर्वंकष चित्र उभे राहते.[3] ' शंकर सारडा यांनी केलेल्या या विवेचनावरून वाकोडे यांनी कोरकू जीवनाचे सद्यस्थितीचे सर्वंकष चित्रण वास्तव स्वरूपात चित्रीत केले आहे असे दिसते.

प्रमोद मुनघाटे प्रस्तुत कादंबरीबद्दल लिहितात - या कादंबरीमध्ये ' काही कोरकू कुटुंब व त्यांच्या भोवतीच्या इतर पात्रांच्या नमुनेदार चौकटीला एका सुडौल कथानकाचे रूप प्राप्त झाले आहे. सूक्ष्म निरीक्षणातून आलेले व्यक्तिदर्शन आहे. निवेदनातून भावनात्मक प्रत्यय पुरेपूर येतो. कोरकूंचे निसर्गनिष्ठ जीवन, बदलत्या सामाजिक, आर्थिक स्थितीत नागर समाजाशी येणारा संबंध, सहकारी व सरकारी योजनांचे प्रयोग हे कादंबरीतील मुख्य प्रतिपाद्य असून या सर्वांचा आविष्कार ' डाक्युमेंटरीवजा ' न होता कथात्मक अनुभवात व्यक्त करण्यात लेखक यशस्वी झाला आहे.[4] ' या विवेचनावरून मधुकर वाकोडे यांनी कोरकू जीवनाचे यथार्थ व वास्तव चित्रण या कादंबरीत केले आहे.

या मतांचे विवेचनावरून व आपण घेतलेल्या या कादंबरीच्या परामर्शावरून मधुकर वाकोडे यांची ही कादंबरी आदिवासी जीवनाचे सर्वंकष चित्रण करण्यात यशस्वी ठरली आहे. आदिवासींचे जीवनातील अनेक पैलू केरू व फुलय यांच्या प्रेम कथेमधून साकार झाले आहेत.

xxxxxxxxxxxx

## संदर्भ टीपा


1. विश्वेश्वर सावदेकर, कोरकूंच्या जीवनाची कहाणी : झेलझपाट , **युगकर्ता** , बा. ह . कल्याणकर (संपा.), जुलै ते डिसें. 1989, पृ.29.

2. शंकर सारडा, झेलझपाट , **ग्रंथविशेष** , मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे 1991, पृ. 28.

3. शंकर सारडा , ओळख पुस्तकांची , **महाराष्ट्र टाईम्स** , रविवार 4 आक्टो. 1992, पृ. 11.

4. प्रमोद मुनघाटे , आदिवासींवरील दोन कादंब-या , **समाज प्रबोधन पत्रिका** , राजेंद्र व्होरा, रेखा इनामदार, सुहास पळशीकर (संपा.), जाने-मार्च 1992, पृ. 21.


xxxxxxxxxxxx